म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र ११११२
IRBK-0101112
IRBK-0101112
IRBK-0101112

दा. क्र. ११११२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

ग्रं. सं. ठाणें
नं.



**गजरा:**— महाराष्ट्राच्या काशीला गेलं, विटेवरचा विश्वनाथ मी पाहिला. [पृष्ठ ८९]

# संगीत पतितोद्धार

## नाटक

IRBK-0101112

लेखकः—

**नरहर राजाराम ढोले,**

बी. ए. एलएल्. बी.

[ मधुर-मीलन व पदवी-ग्रहण इत्यादि नाटकांचे कर्ते. ]

वा. क्र. ९७७२ नों. दि
वि. नाटक

सन १९३२ ] प्रथम मुद्रण [ किंमत १ रुपया.

प्रकाशक:—
सदाशिव लक्ष्मण कोकाटे,
३०० सदाशिव पेठ, पुणें.

सर्व हक्क स्वाधीन.

मुद्रक:—
लक्ष्मण भाऊराव कोकाटे,
हनुमान प्रेस, ३०० सदाशिव पेठ, पुणें.

ग्रा. गौ. १०३२

# ऋणदर्शन

त्रिखंडविख्यात झालेले कविवर्य रविंद्रनाथ टागोर यांचे वाङ्मयाशीं थोडा-बहुत परिचय झाल्यामुळें, नाट्यसृष्टींत प्रवेश करण्याची मला बुद्धी झाली. 'पतितोद्धार' हातावेगळा करतां आला तो ह्या गुरुप्रसादामुळेंच. माझ्या शब्द-संसारांत जर कांहीं गुणलव असला तर त्याचें सारें श्रेय माझ्या गुरूचें; इतर भागाचा अर्थात् मीच वारस; असो.

नितांतसुंदर अभिनयपटु म्हणून ज्यांनीं रंगभूमीवर नांव कमाविलें त्या रा. बी. ए. बेंजामिन यांच्या नाट्यनिशाण नाटक कंपनीनें माझ्या नाटकाचा मुहूर्ताचा पहिला प्रयोग पुणें येथील किर्लोस्कर थिएटरमध्यें करून दाखविला; माघ कृष्ण १३ शके १८५३ ( ता. ५ मार्च १९३२ ) ह्या महाशिवरात्रीची जोड माझ्या प्रयोगाला लाभली. माझे फार दिवसांचे प्रेमळ स्नेही पुण्याचे सुप्रसिद्ध वकील रा. काकासाहेब गाडगीळ, हे ता. ४।३।३२ ला अचानकपणें तुरुंगांतून बाहेर आले व प्रयोगाला हजर राहून व अध्यक्षाच्या शुभासनीं बसून माझ्या कृतीचा थोर मनानें त्यांनीं गौरव केला. हें प्रेमाचें ऋण फेडण्याच्या नसत्या भानगडींत मी कांहीं पडत नाहीं. तसेच अल्पपरिचय असतांना देखील प्रो. श्री. नि. चाफेकर, एम्. ए., एल्एल्. बी., यांनीं आपला बहुमोल वेळ खर्चून, माझ्यासारख्या अज्ञात इसमाच्या पुस्तकाला प्रस्तावना दिली याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें.

दे. भ. लक्ष्मण बळवंत ऊर्फ अण्णासाहेब भोपटकर, सर्व्हंटस् ऑफ इंडिया सोसायटीचे प्रेसिडेन्ट श्री. रा. रा. गोपाळ कृष्ण देवधर व बारामतीचे श्रीयुत रा. रा. सदाशिवराव वासुदेव करंदीकर वकील वगैरेसारखी थोर मंडळी प्रयोगाला हजर राहिल्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक आभार मानतों.

ज्या मित्रमंडळींनीं मला या कामीं मदत केली त्यांचे आभार मानणें हें माझें कर्तव्यच होय. नाटकांतील बरींच पदें रा. सदाशिवराव रिसबुड यांनीं करून दिलीं व चाली रा. अनंतराव ओंकार यांनीं दिल्या. प्रूफतपासणीचें दगदगीचें काम रा. रा. ज. काळे यांनीं आपलेपणानें करून दिलें. रा. हसबनीस, रा. शंकरराव दानवे व मालक मि. बेंजामिन साहेब, यांनीं पहिला प्रयोग यशस्वी करण्याकरतां

जिवापाड मेहनत घेतली—ह्या सर्व मंडळींचा मी फार आभारी आहें. पुस्तक-छपाईचें काम हनुमान प्रेसचे मालक रा. ल. भा. कोकाटे यांनीं उत्तम रीतीनें करून दिलें याबद्दल मी त्यांचा आभारी आहें. तसेंच फोटोग्राफर मि. नामदेवराव सरपोतदार यांनीं आपले स्टुडिओंत मेहनतीनें फोटो काढण्याचें काम करून दिलें व अल्पावधींत रा. पोतनीस यांनीं ब्लाक्स तयार करून दिल्याबद्दल मी त्यांचे आभार मानतों.

पहिल्या प्रयोगाचे वेळीं पुढील प्रमुख नटांनीं कामें केलीं.

**पुरुष–पात्रें.**

भैरव— मि. गणपतराव जोशी
हिम्मत— ,, पेंडसे
चंदन— ,, भंडारे
वामदेव— ,, काळे
गुंजारव— ,, गोरे
राघव— ,, सहस्रबुद्धे
पो. ऑफिसर-,, हसबनीस

**स्त्री–पात्रें.**

गजरा— मिस् मैनाबाई
चरणी— ,, मुक्ताबाई
रमणगौरी— रा. धारवाडकर
दुर्मुखा— मा. कृष्णराव कवठेकर
सावित्री— रा. आपटे

ह्या सर्वांचे मी आभार मानतों. तसेच कंपनीचे जनरल मॅनेजर माझे मित्र मि. पी. के. पाठक यांनीं सहानुभूतिपूर्वक केलेल्या मदतीबद्दल मी त्यांचा मनःपूर्वक आभारी आहें. अखेर ज्या जगन्नियंत्याच्या कृपेमुळें हें सर्व घडून आलें त्याची प्रार्थना करून हें ऋणदर्शन मी पुरें करीत आहें.

पुणें, पेठ नारायण
ता. ५।३।३२.

**नरहर राजाराम ढोले.**

श्री.

# संवादाचे चार शब्द.

" तुटे वाद, संवाद तो हीतकारी ॥"–श्रीसमर्थ रामदास.

शिक्षणकार्याच्या "क्षेत्रांत" हल्लींचे दिवस म्हणजे ऐन "हंगामाचे" चे दिवस ! किंवा धार्मिक दृष्ट्या म्हणावयाचें म्हणजे, 'व्रतबंधा' चे व 'लग्नघाई'चे दिवस ! अशा वेळीं, प्रत्यक्ष स्वतःसमोर असलेल्या कार्याखेरीज इतर गोष्टींकडे लक्ष द्यावयालाच वस्तुतः फुरसत नसते किंवा तशा गोष्टींविषयीं शांत व सांगोपांग विचार करण्याइतकी मनाची अव्यग्र स्थितिही नसते ! तथापि आपल्या येथें कार्य असलें व तत्संबंधाच्या घाईत जरी आपण असलों, तरी त्याच सुमारास आपल्या इष्टाप्तांच्या येथें किंवा शेजाऱ्यापाजाऱ्यांकडेहि जर तसेंच एखादें कार्य असेल आणि त्यानें आपल्यास हेतुपूर्वक अगत्यानें निमंत्रण केलें असेल तर आपण मित्रत्वाच्या कर्तव्यबुद्धीनें वेळांतवेळ काढून, तेथें पानसुपारी घेण्यास जातोंच आणि यजमानास उभ्या उभ्या भेटून, आपली हजिरी लावण्याची आणि त्याच्याहि मनाचा संतोष राखण्याची संधि साधतों. त्याचप्रमाणें सध्यां, कॉलेजांतील अभ्यासाचे विषय संपविण्याची आणि प्रश्नपत्रिका वगैरे काढण्याची मनास अत्यंत व्यग्रता असूनहि बारामतीचे रा० रा० न. रा. ढोले वकील यांच्या आग्रहपूर्वक इच्छेनुसार, त्यांच्या नुकत्याच रंगभूमीवर आलेल्या 'पतितोद्धार' नटकासंबंधीं हे चार 'संवाद' पर शब्द लिहीत आहे. 'संवादाचें' हा जो शब्द सहेतुकपणें घातला आहे, त्याचें मर्म रसिक वाचकांच्या ध्यानांत चटकन् येईलच !

दैनिक वर्तमानपत्रांमध्यें जशी "ताज्यांत ताजी बातमी सर्वांच्या अगोदर कोण देतो किंवा इतरांपेक्षां नवी आकर्षक टूम कोण काढतो" याविषयीं नेहमीं स्पर्धा व अहमहमिका लागलेली दिसून येते तशीच स्थिति आपल्या [मराठी] काय किंवा गुजराथी, ऊर्दू वगैरे नाटक मंडळ्यांची काय, झालेली दिसते. ताजांतला ताजा प्रचलित विषय नाटकद्वारा प्रेक्षकांपुढें अगोदर कोण सादर करितो यांविषयीं नाटक मंडळ्या जणूं काय डोळ्यांत तेल घालून, टपत असल्यासारख्या व आतुर झालेल्या दिसतात ! आणि सध्यां सर्वच बाबतींत व व्यवसायांत चालू असलेल्या जीवनकलहाच्या अभूतपूर्व अशा उग्रतेच्या दृष्टीनें आणि साधारण जनसमाजांतही, घरीं दारीं प्रचलित गोष्टींचीच चर्चा करण्याविषयीं दिसून येत असलेल्या विलक्षण उत्सुकतेच्या दृष्टीनें, नाटक मंडळ्यांची

ही तशीच प्रवृत्ति होणें अगदीं साहजिक व अपरिहार्य आहे. म्हणून, राजकीय व सामाजिक या दोन्ही क्षेत्रांत सध्यां अत्यंत जिव्हाळयाचा व महत्त्वाचा होऊन बसलेला असा जो अस्पृश्योद्धाराचा–व तदनुषंगानें, मंदिरप्रवेशाचा–प्रश्न त्याचें दिग्दर्शन रा० ढोले, वकील यांनीं आपल्या पतितोद्धार नाट्यकृतीद्वारा रंगभूमीवर करण्याचा जो प्रयत्न केला आहे, तो फार समयोचित असून प्रस्तुत नाटकांत त्यांनीं या प्रश्नाची जी मांडणी केली आहे, तीही फार कुशलतेनें, व उदात्त भूमिकेवरून केली आहे असें, हें नाटक पहाणाऱ्या किंवा वाचणाऱ्या कोणाही विचारी माणसास वाटल्यावांचून रहाणार नाहीं, अशी माझी खात्री आहे.

'प्रचलित' प्रश्नांचें स्वरूप 'प्रचलित' च! तें प्रसंगविशेषीं, कांहीं आगंतुक कारणांमुळें, मूळ सत्य व हितकर गोष्टीशीं विसंगत असण्याचा संभव असतो, इतकेंच नव्हे तर, मूळ सत्य व हितकर गोष्टीचा त्या-योगानें घातही होण्याची दुर्धर आपत्ति कधीं कधीं ओढवते! तसेंच, निरनिराळ्या प्रश्नांचीं 'प्रचलित' स्वरूपें जरी परिस्थित्यनुसार वेळोवेळीं कितीही बदलत गेलीं, तरी त्यांच्या आंत किंवा त्यांच्या बुडाशीं असणारीं,–त्यांचीं आधारभूत तत्त्वें हीं नेहमीं शाश्वत व अबाधित स्वरूपाचींच असतात. म्हणून, प्रश्नाच्या 'प्रचलित' स्वरूपाचा विचार करितांना, त्याच्या आगंतुक बाह्यांगाला नसतें फाजील–व घातुकही महत्त्व न दिलें जाईल याविषयीं, त्या त्या प्रश्नाच्या पुरस्कर्त्यांनीं विशेष खबरदारी घेतली पाहिजे आणि या बाबतींतील स्वतःवर असणारी नाजूक व अत्यंत जिव्हाळ्याची जबाबदारीही ओळखली पाहिजे. तसेंच, एखाद्या प्रश्नाचें 'प्रचलित' स्वरूप स्वतःच्या पूर्वापार संस्कारानुसार कितीही अप्रिय, अनिष्ट, व अकल्पित उद्भवलेलें किंवा उपस्थित झालेंसें वाटलें तथापि, तें ज्या अंतर्जागृतीचें द्योतक असूं शकेल त्या जागृतीकडे, वतनदारीवजा चढेल वृत्तीनें किंवा कूपमंडूकसदृश आकुंचित दृष्टीनें, किंवा स्वतःचें डोकें रेतींत खुपसून, बाह्यजगाची जाणीव व फिकीर नसल्याची आढ्यता आणणाऱ्या आत्मघाती 'शहामृगी शहाणपणा' नें दुर्लक्ष करण्याचाही अविचार "सनातन"–अर्थात् शाश्वत व अबाधित तत्त्वमय–धर्माच्या अभिमान्यांनीं आपल्या हातानें न होऊं देण्याविषयीं जपलें पाहिजे व अपरिहार्य गोष्टींचा आत्मौपम्य दृष्टीनें व आनंदीवृत्तीनें आदरयुक्त स्वीकार करण्याची आर्य-वृत्ति दर्शविली पाहिजे. हेंच व्यापक व उदात्त ध्येय रा. ढोले यांनीं प्रस्तुत

नाटकांतील " मंदिरप्रवेशा " च्या प्रश्नाची मांडणी करितांना आपल्यापुढें ठेवल्याचें स्पष्ट दिसून येतें आणि एकंदर नाटक वाचून किंवा पाहून झाल्यावर हाच इष्ट व ' संवादी ' संस्कार वाचकांच्या व श्रोत्यांच्या मनावर ठळकपणें बिंबल्यावांचून राहणार नाहीं. हीच आमच्या मतें प्रस्तुत नाटकाची अभिनंदनीय फलश्रुति होय. या दृष्टीनें पाहूं गेल्यास, नायिका रमणगौरी ही विख्यात आधुनिक नाटकांतील नायिकांच्या प्रमुख पंक्तींत हक्कानें बसण्यास व उज्वल शोभेनें आपल्या सोज्वल रसिकांच्या सादर व सकौतुक गौरवास पात्र होईल असें म्हणण्यांत अवास्तव विधानांचा किंवा अतिशयोक्तीचा दोष होईल असें मला वाटत नाहीं. " गजरा " व तिचें " भैरवा " च्या भैरवी विश्वासघातकी वर्तनामुळें झालेलें करुणाजनक चरित्र हाहि प्रस्तुत नाटकांतील एक ललितरम्य व हृदयस्पर्शी भाग असून तद्वारा सार्वजनिक हिताच्या बाबतींत सर्वस्वी लक्ष देणाऱ्या लोकांनीं स्वतःच्या गृहव्यवस्थेकडे व स्वतःच्या अपत्यकल्याणाकडे दुर्लक्ष केल्यास कसा घोर परिणाम ओढवतो याचें मोठें बोधप्रद व मार्मिक चित्र रा. ढोले यांनीं विचारवंत पुढाऱ्यांस " इशाऱ्या " दाखल सादर केलें आहेसें वाटतें. अलिकडच्या रंगभूमीवरील कार्यविभागाच्या मनूस अनुसरून, नाटकांतील ' प्राप्ती 'चा तसाच ' व्याप्ती ' चा अर्धा वांटा, विनोदविषयक कथानकानें आत्मसात् केला आहे. परंतु हा विनोद मुख्य कथासूत्रास मारक अथवा ' मज्जक ' न होतां, उलट ' सावित्री ' ' चरणी ' ' वामदेव ' वगैरे विनोदी पात्रांचा स्वभावपरिपोष होण्यास चांगली मदत झाली आहे. भाषणादिकांची शैली चांगली कमावलेली व परिणामकारक वठली असून, नाटकांतील विनोद व शाब्दिककोट्या सहजरम्य व आल्हाददायक साधल्या आहेत.[उ. अं. १ प्र. ४; शिवाय,सावित्री, चरणी, वामदेव, वगैरेंचे प्रवेश, पुढें कोर्टाचा प्रवेश. ] एकंदरीनें, ' पतितोद्धार ' हें अलीकडे प्रसिद्ध झालेल्या निरनिराळ्या सामाजिक प्रश्नांचें दिग्दर्शन करणाऱ्या नाटकांमध्यें, नाट्यकलादृष्ट्या व विचारप्रदर्शनाच्या संवादानुकूल व मार्मिक शैलीच्या दृष्टीनें यशस्वी व उच्च प्रतीचें झालें असून त्याबद्दल मी रा० ढोले यांचें मनःपूर्वक अभिनंदन करितों व त्यांच्यापासून आणखी अशीच रम्य व उद्बोधक नाट्यसेवा होत राहो असें इच्छितों.

पुणें, शनिवार, फाल्गुन शुद्ध पंचमी
शके १८५३ [ता. १२-३-३२]

**श्री. नि. चापेकर.**

# अर्पणपत्रिका.

राजाराम पिता धरि जनि प्रभुच्या प्रेम मङ्गला नामा ।
अर्पी पतितोद्धारा तच्चरणीं स्मरुनि परम गुरुधामा ॥

॥ ॐ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

लेखक.

८८७८
ना. नो. १४७३२ ६९

श्री.

# पतितोद्धार.

—:०:—

## अंक १ ला.

### मंगलाचरण.

विविध भाव मान निगम देव कळा ।
मनुज अद्य नेणती, गणिति स्वजन
अशुभकारी ॥
भवासि पतनीं खर बुडवी पंकिं तिमिरीं ॥ ध्रु० ॥
क्रमित वाम मार्ग अचर-। वेद धर्म वदति ब्रह्म ।
परि न त्राण, वृत्ति हीन । प्रभु.करि ही धर्मग्लानि विलय ॥१॥

### प्रवेश १ ला

स्थळः—देवळापुढील पटांगण

[ हिम्मतराव व चंदन प्रवेश करतात. ]

**हिम्मतराव**— भोळ्या रामाच्या देवळांत आज एकदां का अतिशूद्रांना सार्वजनिक प्रवेश मिळाला कीं मला मूठभर मांस चढल्यासारखं होणार आहे. चंदन, तूं हिंदुसमाजाच्या पायदळीं पडलेल्यांचा नामांकित प्रतिनिधि आहेस; क्रांति होत असलेल्या सनातनी धर्माच्या इतिहासांत तुझं नांव अजरामर झाल्याशिवाय रहाणार नाहीं.

**चंदन**— जरा व मरण वस्तूवस्तूला लागू आहे; त्यांतून कोणाचीच सुटका नाहीं. मग माझ्यासारख्या पामराच्या नांवाची काय किंमत आहे ? हिम्मत, अजरामरत्व हा गुण एकट्या परमेश्वराचा होय.

**हिम्मत०**— असेल–एकटा परमेश्वरच अजरामर असेल; पण त्याच्या विश्व-योजनेंतील पतितोद्धाराचें कार्य पार पाडायला, चंदन, तुझ्यासारखे पुण्यवंत जन्माला यावे लागतात.

**चंदन**— जातबांधवांच्या हालअपेष्टा दूर करण्यासाठीं देह झिजला नाहीं, आजच्या अभागी पण उद्यांच्या भाग्यशाली मायदेशाचा पांग फेडण्यासाठीं जर जीव कारणीं लागला नाहीं व परकीयांचा परकेपणा घालवून विश्वबंधुत्वाच्या गोड स्वप्नाला सत्यसृष्टींत आणतांना हृदयस्थ आत्मारामाचें आत्मार्पण झालें नाहीं तर हिम्मत, जीव जन्माला आला काय नि न आला काय दोन्ही सारखींच.

**हिम्मत०**— आजतागाईत ज्यांना अपवित्र समजून आम्ही स्वतःला श्रेष्ठ समजणारांनीं गांवाबाहेर ठेवलं त्यांना सर्वसाधारण समाजांत, शिक्षणसंस्थांत व देवालयांत बरोबरीचे हक्क देण्याऐवजीं जर आम्ही नामानिराळे राहूं लागलों तर विरोधाचा वैराग्नि पेटून त्यांत सनातनी हिंदुसमाज जळून खाक होऊन जाईल !

**चंदन**— व ती आपत्ति टाळण्याकरतां आम्हीं आजपर्यंत जसे अपमान सोसले, तसे आणखीही सहन करायला तयार आहोंत. हिम्मत, तूं जर मला आधार दिला नसतास, शिक्षण दिलं नसतंस व सामाजिक बंधनं दूर करून जवळ केलं नसतंस, तर या चंदनाचं आयुष्य गांवाबाहेर फेकून दिलेल्या उकिरड्यापेक्षां अधिक मोलाचं केव्हांही झालं नसतं.

**हिम्मत०**— आणि म्हणूनच हें गांवाबाहेर टाकलेलं खत सनातनी धर्माच्या बागेमधल्या खुरटून वाळून गेलेल्या अनेक रोपरोपड्यांना घातल्याशिवाय व त्यावर आपलेपणाच्या मायाममतेचा भरपूर जलवर्षाव केल्याशिवाय हिंदूंना जगांत ‘ हिंदू ’ म्हणून जगायला दुसरी जागाच नाहीं. आणि तेवढ्याकरतां जाहीर डांगोरा पिटून भोळ्या रामाच्या देवळांत पतितांच्या प्रवेशाचा समारंभ करावयाचा आहे.

**चंदन**— भोळ्या रामाचें देऊळ म्हणजे तर सनातनीयांचा बालेकिल्ला ! हिम्मत, तूं स्वतः सनातनी आहेस. माझ्यासारख्या अनेक अस्पृश्यांना बरोबर घेऊन जर तूं देवालयांत शिरूं लागशील, तर संतापलेल्या व शापवाणी प्रसवणाऱ्या ब्रह्मतेजांत तूं भस्म होऊन जाशील कीं काय अशी मला भीति वाटते. शराइतकंच शापाचं महत्त्व नाहीं काय ?

**हिम्मत०**— खऱ्याखुऱ्या पुण्यवंत धार्मिकांच्या तोंडांतून शापवाणी स्रवत नसते; आणि दांभिक धर्ममार्तंडांच्या दुबळ्या शापांत निर्जीव शब्दांच्या फोलकटापलीकडे अधिक सत्त्व तें काय असणार आहे ? चंदन, शिव्याशापांना भिणारा जर हा तुझा स्नेही असता, तर पतितोद्धाराच्या चळवळींत तुझ्या खांद्याला खांदा भिडवून लढायला तयारच होताना !

**चंदन**— आणि खुद्द जगद्गुरूंच्या अध्यक्षतेखालीं आमचा देवालयप्रवेश होणार—ह्या नुसत्या कल्पनेनंच मला आनंदाचं वेड लागूं पहात आहे. हिम्मत, श्रींचा आसरा आम्हां पतितांच्या चळवळीला मिळवून दिलास— —तुझं उतराई व्हायचं तरी कसं ?

**हिम्मत०**— पतित म्हणून स्वतःला बिलकूल म्हणवून घेऊं नकोस यापुढें; आम्ही श्रेष्ठ सनातनी आजपर्यंत तुम्हांला तसल्याच नांवानं हिणवीत आलों तें पुरं झालं नाहीं का ? आम्हीच वास्तविक पतित; हिंदुधर्माच्या उच्च ध्येयाला सोडून देणारे आम्ही ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य व तत्सम स्वतःला श्रेष्ठ समजणारे लोकच पतित आहोंत. तुमच्या उद्धाराला मदतीचा हातभार लावतांना, आम्ही आपल्या स्वतःचा खराखुरा उद्धार करून घेत आहोंत !

**चंदन**— तूं असं बोलायला लागलास कीं मेरुमंदारासारख्या अचल निश्चयाचा पाठीराखा देवानं आमच्या चळवळीला दिला म्हणून मला केवढा आधार वाटतो तें कसं सांगूं ?

**हिम्मत०**— साऱ्या सात्त्विक चळवळींचा, एक परमेश्वरच पाठीराखा असतो. माझ्यासारख्या दुबळ्या मानवाची दीन मदत कितीशी उपयोगी पडणार हें मी जाणून आहें. चंदन, भोळ्या रामाचं देऊळ ‘ खाजगी ’—सार्वजनिक नाहीं, असा तंटा उपस्थित करून पुजारी भैरवनाथ कोणत्या पुण्याईची जोड करीत असेल तें त्याचं त्यालाच ठाऊक !

**चंद्न**-- वेदमंत्रांनीं भोळा राम प्राणप्रतिष्ठित झाला; अतिशूद्रांची त्यावर छायादेखील पडतां उपयोगी नाहीं असा भैरवनाथ पुजाऱ्याचा अट्टा-हास आहे.

**हिम्मत०**— ह्या हेकटपणामुळें शुद्ध सनातनी धर्माचं हंसं मात्र होत आहे, सर्वांचा सारखा व प्रत्येकाचा सखा ( Common to all and special to each) झालेल्या पुराणपुरुषाजवळ कसलाही दुजाभाव नाहीं. कोणाच्याही छायेचा त्याला विटाळ नाहीं; अनादि–अनंताच्या मायेचा थांग लागत नाहीं. मग जें विटाळचंडाळाचं तत्त्व, ना वेदांत ना पुराणांत, तें जर आधुनिक–अर्धवटांच्या सनातनी नांवाखालीं नाच करूं लागलं तर त्याला पायबंद घालण्याचा उपक्रम तुम्ही अतिशूद्रांनींच करावा हें योग्य होय.

**चंद्न**— उपक्रम आम्ही करूं; पण कांट्यानंच कांटा निघतो; सनातनी वेडावर, सनातनी वेडाच्या सालींचंच पलिस्तर असल्याशिवाय हा शिवाशिवीचा धर्म माघार घेणार नाहीं. तुझ्यासारख्या प्रेमळ सनातनीयांची मदत व खुद्द श्रींचा आशिर्वाद असल्यावर हिम्मत, आम्हांला कसली भीति उरली आहे?

( पूजापात्र घेऊन वामदेव प्रवेश करतो. )

**वामदेव**— म्हणे कसली भीति उरली आहे! भोळ्या रामाचं देऊळ म्हणजे बिनवारशी मालमत्ता नव्हे. हिम्मतराव, आम्हीं सनातनी धर्माचे जन्मजात वारस—साऱ्यांनींच कांहीं अजून 'राम' म्हटलेलं नाहीं. सबगोलंकार करून भोळ्या रामाची भाबडी मूर्ति भ्रष्ट करायला सजलांत—महारमांगांना देवाच्या गाभाऱ्यापर्यंत आणूं पहातां, कोणत्या रौरवाची ही तयारी?

**हिम्मत०**— वामदेव, तुझ्या वेडाची मला कींव येते, राग मात्र येत नाहीं. महारमांगांना व अतिशूद्रांना, आजपर्यंत देवळाबाहेर ठेवलं, व त्यामुळें देवांतलं देवपण नाहीसं होऊन, फक्त दगडी मूर्ति डोळ्यांपुढं राहिली. वामदेव, अस्पृश्यांचा देवालयांत प्रवेश म्हणजे रौरवाची तयारी नसून, दयेची अमृतपरिपूर्ण भरलेली झारी हातीं घेऊन हिंदुधर्मावरचा कलंक धुवून टाकण्याकरतां निघालेली उद्यांच्या धर्मवीरांची मंगल स्वारी होय!

**चंद्न**— महाराज, आम्हीं हिंदु आपलेच ना? इस्लामी धर्माच्या उन्हा-

तान्हांत आजपर्यंत आम्ही होरपळून निघालों, ख्रिस्ती धर्माच्या मुसळधार पावसांत चिंब भिजून गेलों; निवाऱ्याकरतां सनातनीधर्माच्या घरांत आज येतों आहोंत—त्या आम्हां सर्वांना, महारमांगांना, अतिशूद्रांना दूर लोटून देऊं नका. आमच्याच धर्मबांधवांनीं जर आपलेपणाचा आसरा दिला नाहीं, तर आम्ही आतां पहायचं तरी कोणाच्या तोंडाकडे ?

**वामदेव**— आमच्या तोंडाकडे पहा—ब्राह्मण म्हणजेच भूदेव. तेवढ्यासाठीं ही दांडगाई, तें देवळांत घुसणं ही पाहिजेत कशाला ? तुम्हांला तरी काय दोष द्यायचा ? हे आमचे कुऱ्हाडीचे ( हिम्मतला उद्देशून ) दांडे—आमच्या सनातनी धर्माचे काळ, जर तुम्हांला घेऊन देवळांत घुसायला लागले तर आतां ' भोळ्या रामानं ' देखील ' राम ' म्हटलेलं बरं.

**हिम्मत०** — तेंही खरं; अतिशूद्र जर ह्यापुढं देवमूर्तीपासून दूर ठेवायचे असतील तर त्या तसल्या राममूर्तींनीं ' राम ' म्हटलेलं कांहीं वाईट नाहीं.

**वामदेव**—सारी दुनिया कांहीं अद्याप बाटली नाहीं हिम्मतराव ! बाटलीबाजांच्या राज्यांत डोकं बहकून गेल्यामुळं तुम्हीं हिंदुधर्माचा खेळखंडोबा आरंभलात. उघड्या डोळ्यांनीं तें आम्हांला कसं पहावणार ? भोळ्यारामाच्या देवळावर भैरवनाथ पुजाऱ्याची सत्ता आहे, हें लक्षांत ठेवून वागा. असले चाळे तो केव्हांही चालूं देणार नाहीं.

**चंदन**— आम्हीं कांहीं देवळाचे दगड पाडून नेत नाहीं, देवापुढं येणारं उत्पन्न मागत नाहीं; फक्त देवदर्शनाचे आह्मी भुकेले !

**वामदेव**— पण ही तुमची वाट चुकते आहे. भैरवनाथाच्या वाटेला जाऊं नका व भोळ्या रामाच्या देवळांत दांडगाईनं घुसण्याचा प्रयत्नही पण करूं नका. ह्यांतच तुमचं कल्याण आहे.

**हिम्मत**—चंदन, चल आपली वाट वेगळी. ह्याच्याबरोबर हुज्जत घालून वेळ कशाला दवडायचा ? अतिशूद्रांचा देवालयप्रवेश झालाच पाहिजे—मग शेंडी तुटो नाहीं तर पारंबी तुटो ! ( हिम्मत व चंदन जातात. )

**वामदेव**— महारमांग भोळ्या रामाच्या देवळांत कसं पाऊल टाकतात तें आम्हीही पण पहातों. दांडगाईनं महारमांगांना देवळांत आणणारांच्या तंगड्या

मोडल्या नाहींत तर जानवं तोडून डोक्यावरची शेंडी उतरून देईन ! जरूर पडली व हट्टाला पेटलों तर मिशाही पण उतरीन. ह्या कामांत इरेला पडून प्राण देईन पण भोळ्या रामाला महारड्यांचा विटाळ होऊं देणार नाहीं ! ( जातो. )

---

## प्रवेश २ रा.

[ **स्थळः**—भोळ्या रामाचे देवळासमोरचा गंगाकांठ बांधलेल्या घाटाचा देखावा. भैरवनाथ संध्या करीत बसला आहे. ]

**भैरव**– मावळत्या सूर्यनारायणाचं अर्घ्यप्रदान संपतं न संपतं तोंच उगवत्या ताऱ्यांनीं आपल्याकडे माझी दृष्टि वेधून घेतली. आकाशाच्या अंगणांत नक्षत्रांचा सडा शिंपून छप्पन टिकल्यांच्या या चांदण्यांची सांजवात लावल्यावर चटोर चंद्राबरोबर छपापाणी खेळण्याकरतां ही रजनी पहा कशी उत्सुक झालेली दिसते !

पद

**समर प्रचुर शामला यामा ।**
**तम लीला करि नाना ।**
**प्रेम राशि ती लीना ॥ ध्रु० ॥**
**मोद देइ कान्ता, शशिरमणा ।**
**दीपज्योति ती गगना ।**
**करि प्रदीप्त जणु रामा ॥ १ ॥**

स्वतःच्या शीलाची जर काळजी असती तर या निशादेवीनं शीतभानूच्या हातांत, सप्तपदी झाल्याशिवाय आपला हात केव्हांही दिला नसता.

(गजरा प्रवेश करते.)

**गजरा**–– पण माझा हात मीं आपल्या देवाच्या हातीं दिला—तो दगडाखालीं सांपडला असं नाहींना होणार ?

**भैरवः**––कोण गजरा ? तूं इथं कशी ? तिनीसांज टळून गेली; या वेळेला

मोडल्या नाहींत तर जानवं तोडून डोक्यावरची शेंडी उतरून देईन ! जरूर पडली व हट्टाला पेटलों तर मिशाही पण उतरीन. ह्या कामांत इरेला पडून प्राण देईन पण भोळ्या रामाला महारड्यांचा विटाळ होऊं देणार नाहीं ! (जातो.)

---

## प्रवेश २ रा.

[ **स्थळः**—भोळ्या रामाचे देवळासमोरचा गंगाकांठ बांधलेल्या घाटाचा देखावा. भैरवनाथ संध्या करीत बसला आहे. ]

**भैरव**– मावळत्या सूर्यनारायणाचं अर्घ्यप्रदान संपतं न संपतं तोंच उगवत्या ताऱ्यांनीं आपल्याकडे माझी दृष्टि वेधून घेतली. आकाशाच्या अंगणांत नक्षत्रांचा सडा शिंपून छप्पन टिकल्यांच्या या चांदण्यांची सांजवात लावल्यावर चटोर चंद्राबरोबर छप्पापाणी खेळण्याकरतां ही रजनी पहा कशी उत्सुक झालेली दिसते !

पद

**स्मर प्रचुर शामला यामा ।**
**तम लीला करि नाना ।**
**प्रेम राशि ती लीना ॥ ध्रु० ॥**
**मोद देइ कान्ता, शशिरमणा ।**
**दीपज्योति ती गगना ।**
**करि प्रदीप्त जणु रामा ॥ १ ॥**

स्वतःच्या शीलाची जर काळजी असती तर या निशादेवीनं शीतभानूच्या हातांत, सप्तपदी झाल्याशिवाय आपला हात केव्हांही दिला नसता.

(गजरा प्रवेश करते.)

**गजरा**–– पण माझा हात मीं आपल्या देवाच्या हातीं दिला–तो दगडा-खालीं सांपडला असं नाहींना होणार ?

**भैरवः**––कोण गजरा ? तू इथं कशी ? तिनीसांज टळून गेली; या वेळेला

म.ग्रं.सं. ११९३२

तू घरीं नाहींस असं पाहून, गजरे, तू पळून गेलीस असं तुझे बाबा तुला म्हणतील.

**गजरा**— होय; बाबा फक्त मी पळून गेलें असं म्हणतील; तर जग मी पतित आहें असं-अस्सं समजेल. लोकनिंदेनं काळवंडलेलं हें माझं तोंड नंतर अमावास्येच्या कुट्ट काळोखांत देखील दडवतां यायचं नाहीं.

**भैरव**— पण काय ग गजरे, पतितांचा उद्धार करायला तुझे बाबा सज्ज झाले आहेत म्हणून ऐकतों; महारमांगांना भोळ्या रामाच्या देवळांत ते आणणार आहेत म्हणे! माहीत नाहीं का तुला हा त्यांचा बेत?

**गजरा**— बाबांच्या बेताशीं मला काय करायचं आहे भैरव? आई गेल्यापासून बाबांचा सारा संसार—मुलंबाळं, गुरंढोरं—सारं सारं माझ्या गळ्यांत पडलं. माझ्या लग्नाची बाबा आठवण देखील विसरले!

**भैरव**— तुझ्या गळ्यांत मंगळसूत्र अडकवायला तुझे बाबा विसरले पण सूत्राशिवाय स्वतःच मंगल करून त्यांची चूक तू दुरुस्त केलीस!

**गजरा**— देवाब्राह्मणासमोर हातांत हात घातल्याशिवाय, चारचौघांनीं डोक्यावर अक्षता उधळल्याशिवाय व मंगलाष्टक म्हटल्याशिवाय, बाई मंगलं लग्न झालं असं म्हणायचं तरी कसं? आणि भैरव, तसलं लग्न झाल्याशिवाय कसला आला आहे हो संसार? बाबांना न कळवितां मी स्वतंत्रपणें वागलें, भैरव, तुमच्यावर विश्वासलें. माझा पाय घसरला असं तर नाहीं ना होणार यांत?

**भैरव**— गजरे, बायकांची जातच भित्रट त्याला तू तरी अपवाद कशी होशील!

**गजरा**— पण आतां जनापवाद तरी मीं किती दिवस सोसायचे? भैरव, तुमची लपून छपून भेट घेण्याचे दिवस लांबवून या गरीब गाईचा उगीच अंत काय म्हणून पहातां? गजरेच्या परमेश्वरा, तिला दयेचा हात द्या; वयातीत कुवारणींच्या कोंडवाड्यांतून सोडवा व पत्नीपदावर चढवा.

पद

विभुवर सावरि ही योषा ।
विधु नच आम्हा रुचिर हो भूषा ॥ ध्रु० ॥

शील पुनित शृंगाराचि साचे ।
दावा मंगल जीव शिवा ।
अविरत रमे विनय रत वेषा ॥ १ ॥

**भैरव**— ' उतावळी नवरी आणि झाली लग्नापायीं बावरी; ' गजरे, इतकी उतावीळ होऊं नकोस. चारचौघांत लागणारं लग्न म्हणजे नुसता लग्नाचा लोकाचार–भटाभिक्षुकांच्या कमाईचा तो एक बाजार !

**गजरा**— पण बाई लोकांत राहयचं तर भलभलते चार करून कसं भागेल ? मन मिळालं म्हणजे लग्न लागलं असं कांहीं जग समजत नाहीं.

**भैरव**— कारण जगाला कांहीं समजत नाहीं. गजरे, तुझं माझं लग्न केव्हांच झालं; आठवण कर– ती वेळ लक्षांत आण; पहांटेच्या फुलत्या प्रहरीं उषेचा अंतरपाठ धरून, भोळ्यारामाला साक्षी ठेवून, गजरे, आपण दोघं मनोमय विवाहग्रंथींनं एकजीव झालों नाहीं काय ? आपल्या लग्नाचा नुसता डांगोरा पिटायचा तेवढा उरला आहे !

**गजरा**— मनाचं लग्न म्हणजे कांहीं बाई जनांतलं नव्हे. व्हायच्या गोष्टी झाल्याच पाहिजेत. लपंडाव पुरे करायचा, आणि संसाराचा साधा डाव रंगवायचा होता गडे आतां !

पद

मोहिनी मूर्च्छना सारा । जगीं या सार संस्कारीं
विकारी प्रेमपंथातें । कराया दिव्य साकारी·
विदारी अंगना, प्रेमवृंदा, पीयुष विष होई ।
नटवा लौकिक सुखचारी ॥
रंगवा हा खेळ रुचिरा, पुण्यगामी
गोड संसारी ।
फुलवि विनयें सुख भारी ॥ १ ॥

मी येतें हो आतां भैरव. अवेळ झाला, बाबा माझी वाट पहात असतील.

(गजरा कळशी भरून जाते.)

**भैरव**— जिवाला रंजविणाऱ्या बुलबुला, तुझ्या भुलावणींत असाच मला

अडकून ठेव. नाहींतर–नाहींतर काय? पण नको. नसता विचार आतांच कशाला? हिम्मतराव, तूं गजरेचा बाप, तिची वाट पहात बसला असशील. वेळेवर तिच्या लग्नाची काळजी केली नाहींस; मुलीचें पाऊल कोणच्या वाटेवर पडलें आहे याची फिकीर तुला कशाला असेल? अतिशूद्रांचा उद्धार करायला सजून गांवच्या पतितांना भोळ्या रामाच्या देवळांत आणून तूं लोकनायक व्हायला पहातो आहेस, पण घरांतल्या पतितांकडे पहायला तुला डोळे नाहींत! दिव्याखालीं अंधार हेंच खरं! देवासमोर दिवा लावून मला लवकर गेलं पाहिजे. लग्नाआधी शीलाची सांजवात पेटवून गजरा नाहीं का गेली? लगीनगांठ नसली तरी तिला भेटायला हरकत थोडकीच आहे मला."

पद

**का विषमा जानें सौख्य ना ।**
**सुशिल गुगुला विधिविना ॥ ध्रु० ॥**
**सारसा परिसोनि बाला, समरस**
**लोकीं माना ॥ १ ॥**

( जातो. )

---

## प्रवेश २ रा.

[ **स्थळ**—भोळ्या रामाकडे जाणारा रस्ता.

शालजोडी पांघरलेली सावित्रीबाई प्रवेश करते. ]

**सावित्री**—सारी रात्र सरली, डोळयाला डोळा नाहीं. घोडनवरी घरांत उरावर असल्यावर झोंप तरी कशी यायची? कारटीचं दैवच झोंपलं आहे झालं; नाहीं तर थोडीं कां स्थळं मी पहातें आहें! कुठें–कुठेंच कसं जमेना? पोरगी उजवावी म्हणून नवससायास, व्रतवैकल्य, देवदेवऋषी, सारं सारं मी करतें आहें. भोळ्या रामाचं दर्शन घेतल्याशिवाय मी तोंडांत पाणी देखील घालीत नाहीं; आणि एकुलत्याएक मुलीचं लग्न होईना म्हणून रडून रडून माझ्या

डोळ्यांतलं पाणी देखील आटलं. माझ्या चरणीला नवरा कोण योजून ठेवलास नि तो किती योजनं लांब आहे हें देवा रामा तुलाच एक ठाऊक.

( वामदेव प्रवेश करतो. )

**वामदेव**— मला ठाऊक आहे! सावित्रीबाई, नवरामुलगा कांहीं दूर नाहीं पण त्याला वरायला वधूच मिळेना. पण तुम्ही निघालांत कुठें?

**सावित्री**— कुठें म्हणून काय विचारताहांत? देवदर्शनाला मी निघालें; भोळ्या रामाला पाहिल्याशिवाय तोंडांत थेंब देखील घालायचा नाहीं हा माझा नेम माहीत नाहीं वाटतं तुम्हांला? तरी बरं सारीं हविष्यं कविष्यं मी तुमच्या हातून करतें वामदेव.

**वामदेव**— सावित्रीबाई, आज तुम्ही माझंच दर्शन घ्या; ब्राह्मण म्हणजेच देव ना? आणि देव म्हणजेच ब्राह्मण. आणि नवऱ्याच्या नांवानं देवब्राह्मण घालतां तेव्हां तरी माझ्यासारख्या सत्पात्र ब्राह्मणाच्याच पायावर डोकं ठेवतां— होय ना?

**सावित्री**— मी कुठं नाहीं म्हणतें; पण भोळ्या रामाला जायचा नेम मी उगीच काय म्हणून मोडायचा?

**वामदेव**— महारमांग देवळांत घुसणार आहेत म्हणून भैरवानीं प्रवेशद्वाराला कुलूप ठोकलं व मागचं दार बंद केलं. म्हणून म्हणतों कीं आज कांहीं राम तुम्हांला दिसायचा नाहीं!

**सावित्री**— धन्य आहे तुमच्यापुढें! अग बाई राम का असा कोंडायचा? आज दर्शन तरी कुणाचं घ्यायचं, आणि माझ्या नेमाचं काय होणार? चरणीच्या लग्नाला सारखे अपशकुन होताहेत वामदेव. इतक्यांत म्हणालांत स्थळ आहे म्हणून; सांगा कीं हो तें!

**वामदेव**— सांगतों; अशी घाई करूं नका. लग्नाचं काम आहे. लगीनघाई लग्नाच्या आधीं केव्हांही करतां कामा नये. पण—

**सावित्री**— 'पण' काय? बोला ना, सांगा ना स्थळ माझ्या चरणीला; मी तुमच्यापुढें पदर पसरतें; गरीब बहिणीचं कराच हो एवढं काम. सांगा ना स्थळ?

**वामदेव**— चरणीचं लग्न यंदा मीं जमविलं म्हणून समजा; येत्या वैशाखांतल्या अगदीं पहिल्या तिथीला बार—बोला शुभ लग्न सावधान!

**सावित्री**— तुमच्या आईच्या तोंडांत साखर पडो नि हें अस्सं घडो. पण खरं ना असं करून दाखवणार वामदेव ? जीव मेला वेडा असतो. जें ध्यानीं मनीं, तेंच जर कानीं पडलं तर आनंदाला अस्मान ठेंगणं होतं !

**वामदेव** — चरणी तुमची ठेंगणी ठुसकी आहे होय ना सावित्राबाई ?

**सावित्री**— जशी कांहीं तुम्ही तिला कधीं पाहिलीच नाहींत असं विचारताहांत ! नवल आहे बाई तुमच्या बोलण्याचं !

**वामदेव**— अनेक वेळां मीं तुमच्या चरणीला पाहिली असेल; पण लग्नासाठीं निवडायची नवरी या दृष्टीनें मीं कशाला तिला पाहिली आहे ? ती देखणी आहे, तिचा आवाज तोत्रा नसून खणखणीत आहे—खरं ना सावित्राबाई ?

**सावित्री**—अहो खरं, पण स्थळ सांगा ना कोणतं तें ? तिची कसून पहाणी होऊं दे. मला नाहीं त्याची काळजी. माझ्या चरणीचे डोळे पाणीदार आहेत हो. वाटेच्या वाटसरांनीं जरी पाह्यलं तरी पसंत होण्यासारखी ती मुलगी आहे.

**वामदेव**— पास आहे मला तुमचं सांगणं, पण हें पहा सावित्राबाई, माझ्यासाठीं एक स्थळ शोधून काढा. एकटं रहाण्याचा आतां आपल्याला कंटाळा आला आहे.

**सावित्री** — बोलतां तरी काय हें ? तुम्हांला स्थळ शोधूं म्हणतां ? या वयांत तुमचं लग्न ? वामदेवाला वेड लागलं आहे असं लोक म्हणतील !

**वामदेव**— वेड्या लोकांच्या म्हणण्याशीं मला काय कर्तव्य ? बाकी मला लग्नाचं वेड लागलं आहे हें प्रांजलपणें मी तुमच्याजवळ कबूल करतों.

**सावित्री**— पण बाई माझ्या चरणीच्या लग्नाचं काय ? तें जमवून द्यायचं केलंत ना कबूल हें इतक्यांत !

**वामदेव**—तोच चरण पुन्हा कशाला म्हणतां ? माझ्या चांगला लक्षांत आहे तो. मग शोधतां ना मला नवरी ? मोठं सनंग पाहिजे.

**सावित्री**— ‘ माझंच घोडं नि जाऊं द्या पुढं—’ खासा प्रकार चालवलात वामदेव. मी ह्या वेळची काकुलती येतें आहें, कीं पोरगी उजवायला मदत करा म्हणून. बघतेंच आहें मग तुम्हांला एक मोठं सनंग—नाहीं का म्हणतें मी ?

**वामदेव**—चरणीचं राहूं द्या हो सध्यां बाजूला; पुढच्या वर्षी पाहतां येईल मला कांहीं आतां बायकोशिवाय दम धरवत नाहीं. 'झालेली' मुलगी कसंही करून शोधा, धरा नि मला चतुर्भुज करा. सावित्राबाई, या शालजोडीची चौपदरी मी तुमच्यापुढें धरतों ( तसें करतो ) 'ओम् भवति' म्हणतों, मला बायकोची 'माधुकरी' घाला.

**सावित्री**— हा चारगटपणा कीं निलाजरेपणा ? हें हो काय वामदेव ? काय वाटेल तें झालं तरी चरणी यंदा उजवलीच पाहिजे. तुमचं राहूं दे बाजूला; चरणीला नवरा आणा, तिच्या डोक्यावर लग्नाच्या अक्षता टाकतांना शुभ मंगल सावधान म्हणा. असं अगोदर केलंत म्हणजे तुमच्यासाठीं सनगाला हो काय तोटा—केव्हांच देतें जमून कुठेंतरी—अगदीं पळत्या पावलीं तुम्हांला मी नवरी शोधीन.

**वामदेव**— अगोदर वामदेवाचं लग्न—मग चरणीची बात बोला !

**सावित्री**— चला, माझी चरणीच अगोदर उजवायची नि नंतर वामदेवांची लगीनगांठ एका चांगल्या पोक्त नवरीबरोबर बांधायची !

**वामदेव**— तसं होणं नाहीं सावित्राबाई !

**सावित्री**—मग असंही घडणं नाहीं वामदेव !

**वामदेव**— मग चरणीला नवरा शोधशोधून मिळत नाहीं म्हणून खुशाल रडा. वामदेवाचे चार हात झाल्याशिवाय चरणीच्या लग्नाची पंचाईत त्याला सांगितली आहे कुणी ? सावित्राबाई, मी जातों, अगोदर मला नवरी—

**सावित्री**— अडलं आहे माझं खेटर अगोदर तुम्हांला नवरी शोधायला. पाहिल्या प्रथम चरणीच्या हातांत भरलेला पाहीन लगीनचुडा आणि वामदेव, मग तुम्ही खुशाल बोहल्यावर चढा ! नाहींतर बायको मिळत नाहीं म्हणून जन्मभर रडा—हाच माझा विधवेचा आशिर्वाद. [ दोघें दोहींकडून जातात ].

---

## प्रवेश ४ था.

[ **स्थळ**—रस्ता. चरख्याच्या आकाराची वीणा हातीं घेऊन खादीवेषांत गुंजारव देशस्तुति गात येतो. ]

**पद.**

**होई ललाम महिला । हरि देशदैन्य माला**
**निज लोकजागृतीला । दे जीव शीव सारा ॥ ध्रु० ॥**
**गृह मानि बंदिशाला । जगतांत धन्य झाला**
**हो वंदनीय रिपुला । नमु मोहनापदाला ॥ १ ॥**

**गुंजारव**— देशस्तुति म्हणजेच ईशस्तुती. या दोहोंचा एकजीव झाला कीं मनाला कसं समाधान वाटतं. हृदयवीणेच्या या तारा छेडतांना मी इतका तल्लीन होऊन गेलों कीं, हा माझा साडेतीन हातांचा चालताबोलता इमला रमणगौरीच्या हवेलीपासून चार हातांवर आला, हें मला कळलं देखील नाहीं. या शुभ्र शीलाच्या इमारतीची शोभा अधिक कीं त्याच्या मालकीणीचं शील त्याहूनही शुभ्र, याचा भ्रम यावेळीं माझ्या मनाला पडला आहे. पण मी हा असा वेड्यासारखा इथेंच किती वेळ घुटमळणार ? कोण आहे तिकडे ? मालक घरीं आहेत ना ?

( दुर्मुखा रागानें येते. )

**दुर्मुखा**— कोण ? कोण आहे तें ? अष्टोप्रहर, सदान्‌कदा, भिकारडे, गोसावडे नि खादीवाले रामदासी ! कसा बाई अगदीं सुळसुळाट झालाय् यांचा. काय हो तुमचं इथें काम ? असं वेड्यासारखं काय मला न्याहाळतां ?

**गुंजारव**— बाई अशा रागावूं नका, मी कांहीं पहिल्यांदा इथें आलों नाहीं; तुम्ही मात्र नवीन दिसतां ! या तुमच्या हुद्दयाच्या जागेवर पूर्वी तो एक राघव म्हणून असे.

**दुर्मुखा**— आल्यागेल्याची वर्दी पोहोंचवायचं काम त्याचं—त्यानंच दारावर असायचं, पण कुठें गेलाय् मुलुखागिरीवर ठाऊक तरी कसं पडायचं ? तुम्ही ओरडलांत—हातचं काम हातीं टाकून मला धांवत यावं लागलं.

(राघव येतो.)

**राघव**—अशी मालकिणीसारखी काय गरजते आहेस? आणि गुंजारव, तुम्हांलाही आंत सोडीत नाहीं कीं काय? हव्या त्या माणसाला दारावर अड-वायची दुर्मुखे, तुझी खोड कांहीं चांगली नाहीं.

**गुंजारव**—तसं कांहीं मला त्यांनीं अडवलं नाहीं. मी गोसावडा आहें असं त्यांना वाटलं!

**दुर्मुखा**—लाज वाटायला हवी तुला राघव, परक्या पुरुषासमोर मला बोलायला.

पद.

**अधरिं धरि मधुर वच–ना ॥ ध्रु० ॥**
**कलहिं या, वायां मज दूषण।**
**परि न पाहि निंदका वंचका।**
**धर्म रीति नच नीतिबंधका।**
**अनादरें बोलसी कुमति ॥ १ ॥**

**राघव**—म्हणजे, मला घरचा पुरुष करून, घरधनी बनवूं पहातेस होयें दुर्मुखे? वेळीं अवेळीं माझ्यामागें जर हात धुवून लागशील तर मी बाईसाहे-बांच्या कानावर ही गोष्ट घालीन समजलीस?

**दुर्मुखा**—म्हणे घरधनी—नूर पहा यांचा—दुसऱ्याच्या दारीं चाकरी करतां करतां जन्म चालला आहे! नाहीं स्वतःचं घर, ना जवळ धन. असल्या नादा-नाला घरधनी करण्यापेक्षां सातजन्म कुवार राहिलेलें काय वाईट?

**गुंजारव**—अरे बापरे! हें यांचं प्रकरण हातघाईवर आलं! अगदी रण पडायची वेळ आली.

**राघव**—दुर्मुखे, तोंड संभाळून बोल. माझी बायको नाहींस ती नाहीं आणि वर माझी अमर्यादा करतेस?

**दुर्मुखा**—( हंसते ) अहाहा! बायको–बायको नसलेली बायको, बायको असलेली बायको. या बायल्या राघवाला बायकोचं वेड भरलं आहे वरं का पाहुणे. एकवेळ बालब्रह्मचारी मारुतिराय यांचं देखील लग्न होऊन संसार थाटेल;



**गुंजारव:**— आधुनिक महात्मा बुद्धांच्या सांप्रदायांतील एक भिक्षुकी माझ्यापुढें उभी आहेसं वाटतं.

[ पृष्ठ १५ ]

पण या राघवाची बायकोची होस कशी बाई फिटायची. पाहुणे, याला कांहीं सांगा हो उपाय !

**गुंजारव**— इथें उभं राह्यची देखील सोय नाहीं. या पेटलेल्या रणधुमाळींत उभयपक्षांचा मारा आतां या गुंजारवावर होणार आणि ह्या माझ्या वर्णिला ‘सती’ घेऊन मी ‘राम’ म्हणणार.

**राघव**— स्वतःच्या जिवाला अपाय तर करायचा नाहीं आणि मुलुखमैदान तोफेचा मारा चुकवायाचा ! गुंजारव, याला ‘पोबारा’ करणें हा एकच उपाय ! धांवा हो धांवा, आल्यागेल्या पुरुषाला दारावर अडवून ही दुर्मुखा नवरी होऊं पहाते आहे. बाईसाहेब. जर चुकून बाहेर आल्या तरच गुंजारव, त्यांची तुमची भेट—

( टकळी चालवीत गुर्जरवेषांत रमणगौरी प्रवेश करते. )

**रमणगौरी**—इथें दारांत काय म्हणून उभे गुंजारव ? आणि कसली गड-बड चालली आहे ? राघव–दुर्मुखे, दोघेंही मुखस्तंभ, चोरून दूध प्यालेल्या दोन मांजरांप्रमाणें एकमेकांवर गुरगुरत होतांत-त्याला चांगली वेळ काढलीत. जा—दोघेंही सांगितलेल्या कामाला ! ( दुर्मुखा व राघव आंबट तोंड करून जातात. )

**गुंजारव**:—गुर्जरवेषानें नटलेली माझी महाराष्ट्र भगिनी—रमणगौरी, तूं ओळखूंसुद्धां आली नाहींस. तोंडाची टकळी बंद ठेवायची व हातांतल्या टकळी-वर सूत काढून हिंदभूचा बंदिवास लवकर संपवायचा, म्हणून आधुनिक महात्मा बुद्धांच्या सांप्रदायांतली एक भिक्षुणी माझ्यापुढें उभी आहेसं वाटतं.

**रमणगौरी**—गुंजारव, माणसाची स्तुति करणं चांगलं नाहीं; स्तुति करणं नि ती करून घेणं–दोन्हींही अधःपाताचीं लक्षणं नाहींत काय ?

**गुंजारव**— पण आमची संभावना ही अशी दारांतच किती वेळ चालणार ? गडीमाणसं घरांत जाऊं देईनात व मालकीणबाई आपण होऊन दारांत भेटूं लागल्या, तर ती दुर्मुखा मला ‘गोसावडा’ समजली ह्यांत कांहीं तिची चूक झाली नाहीं.

**रमणगौरी**:—मी ती चूक दुरुस्त करतें–चुकीची माफी मागतें हो ! आंत चलायचं म्हटलं.

पद.

**स्नेह मानसिं विरसेना,**
**रूढीच्या प्रमादाना ॥ ध्रु० ॥**
**प्रकटोन आला । अजि पुण्यकाला**
**नेमा व्रता घाला । बोधोनि सकळां दाना ॥ १ ॥**

[ दोघें जातात. ]

( सीन—रमणगौरीचा दिवाणखाना—सभेची तयारी असलेला देखावा—असा पडदा उघडतो. गुंजारवाला घेऊन रमणगौरी लगेच प्रवेश करते. )

**रमणगौरी**—महात्मा महाल हें या दिवाणखान्याचं नांव बरं का गुंजारव ! गुर्जरवासी बुद्धांच्या आदेशाप्रमाणें रिकाम्या वेळांत मी सूत काढीत बसलें होतें. लांबलेल्या सुताच्या धाग्याबरोबर हात वर गेला, तशी गतकालीन जीवनांतल्या धाग्यादोऱ्यांची स्मृति जागृत करणारा मंजुळ रव वाऱ्याच्या लहरींबरोबर माझ्या कानीं आला. गुंजारव, सुतावर स्वार होऊन स्वराज्याचा स्वर्ग जिंकायला मी नटलें होतें ! मधुगीत ऐकून भानावर आलें, आणि दारीं जाऊन पहातें तों अहिंसेची त्यागमूर्ति डोळ्यांपुढें उभी ! दुर्मुखेला गोसावी दिसला असेल, पण मला मात्र गुजराथी समर्थांचा चेला भेटला.

**गुंजारव**—उपदेश फक्त लोकांना करण्यासाठीं–होय ना गौरी ? मी मघाशीं बोललों ती मात्र तुझी स्तुति आणि ही काय माझी निंदा चालली आहे वाटतं ?

**रमणगौरी**—तें असो; पण आज अचानक येथें कसे आलांत ? सर्जन–जनरलसारख्या सरकारी हुद्द्याची नोकरी सोडल्यापासून, गुंजारव होतां तरी कुठें ?

**गुंजारव**—मानसशुद्धि साधण्याकरतां हिमालयाच्या एका गूढ आश्रमांत मीं दिवस काढले, आणि नंतर साबरमतीआश्रमाची दीक्षा घेऊन लोकनिरीक्षण करून सेवा करण्यासाठीं प्रवासी वेषानं बाहेर पडलों. तुमच्या गांवीं आल्यावर अतिशूद्रांच्या देवालयप्रवेशाचा तंटा विकोपाला जाऊं पहात आहे असं कळलं, व बालमैत्रीण गौरी महाराष्ट्राची पहिली बॅरिस्टर म्हणून इथेंच वकिली करताहेत असं समजल्यावर अर्थात्च पाय गौरी–भुवनाकडे वळले.

**रमणगौरी**— हिमालयीन अमृताचे मेघच माझ्यावर कोसळले म्हणायचे. पण अचानक कां होईना, वेळेवर आलांत, हा वेळाकाळाचा गुण म्हणूं कीं देवालय-प्रवेशाचा तंटा तडजोडीनं तुटण्याचा हा शुभशकून समजूं ? गुंजारव, आमच्या गांवांतल्या भोळ्या रामाच्या देवळांत, हिम्मत व चंदन वगैरे पुढारी अतिशूद्रांना बरोबर घेऊन, दांडगाईनं घुसणार आहेत. देवळाचे पुजारी व मालक भैरवनाथ यांचा त्याला विरोध आहे. भैरवनाथ माझे अशील असल्यामुळें, सामोपचारानं हें प्रकरण मिटविण्यासाठीं मीं सर्वांनाच इथें पाचारण केलं आहे.

**गुंजारव**— मीच फक्त तेवढा न बोलावलेला आगंतुक; कसाही असलों तरी भट आहें व ही होऊं घातलेल्या धार्मिक रणाची तडजोड आहे. ती पाहिल्याशिवाय मी परत जाणार नाहीं बरं कां गौरी !

**रमणगौरी**— तुम्ही पुष्कळ जाल, पण मीं जाऊं दिलं पाहिजे ना ? आमच्या आजच्या वाटोळ्या परिषदेला, एखादा परस्थ सरपंच म्हणून निर्णय द्यायला हवाच होता. देवानंच आयता धाडला म्हणायचा.

**गुंजारव**— कोणतीही चळवळ हातघाईवर आली कीं ती परिषदेच्या पाट्यावर घातलीच म्हणून समजावं; आणि तीवर शिष्टाईचा वरवंटा फिरूनही जिवंत राहिली तर तिचं वाटोळं करण्यासाठीं पुरवणी–परिषद बोलावलीच म्हणून समजावं ! हा राजकारणांतला बिनतोड डाव, गौरी तूं भोळ्याभावड्या हिंदूंच्या धार्मिक तंट्यांत टाकूं पहातेस. पण संभाळ हो, अनेकवार भरणाऱ्या परिषदांची ही मोहनमाळ भांडण भांडणारांना कांहीं काळ भुरळ पाडील– त्यांच्यामधील तेढ कायमची घालविण्याचा हा मार्ग नव्हे.

**रमणगौरी**— सामोपचाराचा मार्ग हाही एक सनातन मार्ग आहे. आणि गुंजारव, या महात्मा–महालांत चित्ररूपानं अधिष्ठित झालेल्या त्या सिद्ध मूर्तीकडे पहा. ( म. गांधींचा टांगलेला फोटो दाखविते ) ह्या देवालासुद्धां हा मार्ग नापसंत नाहीं.

**गुंजारव**— ( चित्राकडे पाहून व चपापून ) कोण–कोण आहेत हे ? नख-शिखान्त युरोपिअन पोषाखानं नटलेलं हें कोणत्या देवाचं चित्र गौरी ? ती इंग्लिश पाटलोण व बूट, शॉर्ट कोट, नेकटॉय, कॉलर, टॉप हॅट्—हाच का तुझा देव.

**रमणगौरी**— माझाच नव्हे, तर तुमचाही पण हाच देव हो गुंजारव. असे भांबाऊं नका. नीट न्याहाळून पहा–जरा जवळ जा आणि त्याच्याच शेजारचं दुसरं चित्र पहा.

**गुंजारव**— ( चित्राच्या जवळ जातो ) हो, आतां दिसलं ! गौरी, माझाही पण हाच देव– मीं ओळखला नाहीं. वेष नवीन पण माझा ईश तोच.

**रमणगौरी**— अनेकरूपं घेऊन, नाना रंग पालटून परमेश्वर भक्तांना फस-विण्याच्या मिषानं सारखा शोधीत असतो. गुंजारव, भक्त नसेल तर दुनियेंत देवही पण नाहीं. देवा हातीं तुम्ही सांपडलांत आणि म्हणूनच त्याच्या आवडत्या कार्याकरतां तुम्ही इथें न बोलावतां धांवून आलांत. आमच्या गांवांतल्या हिंदु-धर्मावरचा कलंक धुवून टाकायला गुंजारव, तुमच्या गिंडींतलं तीर्थ उपयोगीं पडो.

**गुंजारव**— हें असं घडो हेंच मी म्हणणार. पण गौरी, हें चित्र मीं पूर्वीं केव्हांही पाहिलं नव्हतं. पाश्चिमात्य विद्येनं भूषित झाल्यावर कायदेपंडितांच्या भूमिकेवर असल्या वेळचा आंग्लाद्भुतीचा हा नटवा वेष; तर त्याच्याच शेजा-रच्या चित्रांत मायभूमीच्या स्वातंत्र्यासाठीं देश डोक्यावर घेऊन, तेजस्वी चळ-वळ करणाऱ्या जीवाचा शुभ्र खादींतला अभिनिवेश ! गौरी, हें चित्र पाहिलं आणि तेंही पाहिलं; आणि प्रशांत समाधानाच्या हिंदोल्यावर या गुंजारवाचा प्रवासी जीव आनंदानें झोके घेऊं लागला.

**रमणगौरी**— भोगभूमीवरून खालीं उतरून, सर्वस्वत्यागाच्या योगागिरीवर चढणारे तापसी वीर या आपल्या आर्यभूमीच्या उद्धाराकरतां अहोरात्र झटत अस-तांना, आपल्यासारख्या दीनदुबळ्या पतितांचा उद्धार झाल्याशिवाय कांहीं आतां रहात नाहीं. गुंजारव, अमीरउमरावासारख्या श्रीमंतींत लोळणारे, फकिरी पतकरून आपली सारी दौलत व इभ्रत मायदेशाच्या कारणीं लावणारे लाल, इतर देशांत कितीकसे सांपडतील ?

**गुंजारव**— जवळ जवळ दुर्मीळ. असलीं रत्नं या सुवर्णभूमींतच निपजा-यचीं. यांच्याचमुळें ही सुवर्णभू, आर्यांची पुण्यभूमि व अनेक क्षेत्रांची जननी झाली. गंगा, यमुना व सरस्वती यांच्या त्रिवेणी संगमामुळें **अलाहाबाद** आज कैक वर्षं क्षेत्र पदवीला चढलं आहे; पण विद्या–वैभव–वैराग्य यांचा त्रिवेणी-

संगम घडवून आणून ज्या तिथल्या महाभागानें आपल्या आयुष्याच्या उत्तर भागांत निर्मळ वैराग्याचा एकमुखी प्रवाह हिंदभूमीवर वाहविला त्याची थोरवी गायला प्रत्यक्ष परमेश्वरानं धांवून यायला हवं !

**रमणगौरी**— पण हें काय ? हा राघव नि ही दुर्मुखा धांवत काय म्हणून आली ? ( दुर्मुखा व राघव धांवत येतात. )

**राघव**— बाईसाहेब दाराजवळ पुष्कळ लोक आलेत—

**दुर्मुखा**— पण मीं बाई त्यांना आंतल्या दिंडीवाटे येऊं दिलं नाहीं—बाहेरच थोपवून धरलं बाईसाहेब. कायग बाई गर्दी केली त्यांनीं आंत यायची. मला वाटतं गांवचं सारं भिकारच लोटलंय्.

**राघव**— दुसऱ्या दारावर इनं अडविलं—कारण मी दिल्लीदरवाजा सताड टाकला. ही नेहमीं अशी भाऊबंदकी साधते.

**रमणगौरी**— दुर्मुखे, राघव, काय चालविलं आहेत हें, दारावरचं भांडण इथें भांडायला आलांत कीं निरोप कळवायला ? राघव, सांग पाहूं नीट कोण कोण आले आहेत ते ?

**राघव**— भैरवनाथ, चंदनराव, वामदेव भटजी, हिम्मतराव आणि किती तरी लोक आले आहेत. मग बोलवायचं ना त्यांना आंत ?

**दुर्मुखा**— पण महार—मांगांना मी नाहीं आंत सोडायची. ग्रहण सुटल्यावर ‘ दे दान सुटे गिराण ’ करणारी भुतावळ बाईसाहेबांच्या वाड्यांत जर घुसायला लागली तर मी कशी ती आंत सोडीन—

**राघव**— म्हणजे बाईसाहेबांची देखील तूं मालकीण झालीस म्हणायची दुर्मुखे ?

**रमणगौरी**— राघव, साऱ्यांना आंत घेऊन ये. आपल्या दिवाणखान्यांत आज सार्वजनिक सभा आहे. दुर्मुखे, तूं बागेंत जाऊन कळ्या तोडून आण अं.

**दुर्मुखा**— हा राघवच मेला कळीचा नारद आहे; हांस, आज मला खुशाल हांस, याचं उट्टं मी केव्हां तरी काढीन खास. तरच नांवाची दुर्मुखा !

( दुर्मुखा व राघव जातात. )

( हिम्मत, चंदन, भैरव, वामदेव व इतर सभासदः महार, मांग, चांभार, शूद्र, अतिशूद्र वगैरे येतात. रमणगौरी सगळ्यांचें स्वागत करते व या बसा म्हणते. )

**हिम्मत०**— मला वाटतं, आम्हाला यायला उशीर तर झाला नाहीं ना ?

**रमणगौरी**-- छे, मुळींच नाहीं आणि माझ्या विनंतीला मान देऊन तुम्हीं सारेजण आलांत ह्याबद्दल मी अगोदर तुम्हां सर्वांचे आभार मानतें. आतां वेळ झाला आहे तेव्हां एकदम कामाला सुरवात करूं या.

**भैरव**— वेदशास्त्रसंपन्न वामदेव भट यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारावं अशी मी त्यांना सूचना करतों.

**हिम्मत०**— या सूचनेला माझा विरोध आहे. अतिशूद्रांच्या देवालयप्रवेशाची तडजोड करण्यासाठीं आपण सभापति निवडीत आहोंत. असले सनातनी बृहस्पति ह्या सभेला तरी अध्यक्ष नकोत.

**वामदेव**— जीभ आवरून बोला—बजावतों आहे.

**रमणगौरी**— सुरवातीलाच तंटा नको—दुसरं नांव सुचवा कोणीं तरी.

**सभासद**-- अतिशूद्रांच्या हक्काचा हा प्रश्न आहे तेव्हां त्यांचे विश्वासू प्रतिनिधि चंदनराव यांनीं अध्यक्ष व्हावं अशी मी शिफारस करतों.

**वामदेव**— काय शेफारले आहेत हे महारडे—आतां डोक्यावरच बसायचें राहिलेत—म्हणे चंदनरावाला अध्यक्ष करा. इथें काय गुरं फाडायचीं आहेत वाटतं ?

**चंदन**— भटजीमहाराज, तोंड आटपून बोला अं ! तुमच्या शिव्या खायला आम्ही इथं आलों नाहीं. एखाद्या कामांत भट पडो आणि तें न बिघडो— असं केव्हांही होणं नाहीं.

**रमणगौरी**— असे निराश होऊं नका व तंडूंही पण नका. वेदोनारायण वामदेव व अतिशूद्रांचे प्रतिनिधि चंदनराव या दोघांनाही पसंत पडतील असे परस्थ गुंजारव आज इथें हजर आहेत. त्यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारावं अशी मी तुम्हां सर्वांच्यातर्फे त्यांना विनंति करतें.

**सर्वजण**-- ( ओरडून ) ही योजना आम्हांला पसंत आहे, सबब या सूचनेला आमचा दुजोरा आहे.

**गुंजारव**— पांच मुखीं परमेश्वर बोलतो आहे असं समजून मी अध्यक्षस्थान स्वीकारतों व सभेच्या कामाला सुरवात करतों; रमणगौरी देवालयप्रवेशाचा ऊहापोह सभेपुढें करतील तो सर्वांनीं विचारपूर्वक ऐकून घ्यावा.

**रमणगौरी**— अतिशूद्रांनीं, महारमांगांनीं व त्यांच्यासारख्या दुसऱ्या अस्पृश्य मानलेल्या जातींनीं भोळ्या रामाच्या देवळांत देवदर्शनाकरतां जावं कीं न जावं हा आपल्या सर्वांच्या पुढें प्रश्न आहे.

**वामदेव**— म्हणजे ब्राह्मणांनीं जगावं कीं मरावं, सनातनी हिंदु धर्मीयांनीं बुडावं कीं तरावं हा प्रश्न आमच्यापुढें उभा आहे ( उभा रहातो. )

**गुंजारव**— वामदेव, खालीं बसा; मधेंच बोलूं नका. गौरीचं भाषण संपलं कीं मग तुमची बाजू मांडा.

**वामदेव**— गौरीपुराण ऐकायला कांहीं आम्हीं सनातनी इथें जमलों नाहीं. यांचं भाषण संपलं कीं आमचं देव निजलंच म्हणून समजावं. आधींच बायको नि त्यांत बॅरिस्टर ! रमणगौरी बोलल्यावर त्यांच्या पटाइत कोटिक्रमावर उत्तर द्यायला, आम्ही मुंबईहून तारेनं एक पुरुष वकील बोलावून घेऊं. तोंपर्यंत ही तडजोडीची सभा तहकूब ठेवावी.

**गुंजारव**— वामदेव, खालीं बसा, असा माझा हुकूम आहे. सभेची शिस्त मी मोडूं देणार नाहीं. हं गौरी, चालूं द्या तुमचं भाषण.

**रमणगौरी**— हिंदूंचा देव दगडाच्या मूर्तींत नसून तो सर्वांच्या हृदयांत वसत आहे. परमेश्वर आकाशांत आहे व प्रकाशांतही आहे; हवेंत देव व देवांतही देव; राजवाड्यांत असतो नि महारवाड्यांत नसतो—असा दुजाभाव हिंदूंच्या देवाजवळ नाहीं. मग भोळ्या रामाच्या देवळांत अट्टाहास करून घुसण्यांत जसा अतिशूद्रांचा शहाणपणा होणार नाहीं तसेंच, आपल्या अडाणी पण इमानी देशबांधवांवर अस्पृश्यत्वाचा शिक्का कायमचा मारण्याचा अधिकार तरी आपल्याला कुणीं दिला ? आणि नुसत्या देवदर्शनाला देखील त्यांना अयोग्य ठरवून, उगवत्या जोमदार पिढीसमोर उच्च म्हणविणारांनीं स्वतःची शोभा करून घेण्यांत तरी कोणतं स्वारस्य ! म्हणून म्हणते कीं—

**चंदन**— कांहीं म्हणूं नका. त्यापुढें दूर राहयला आम्हीं तयार नाहीं.

घरांत घ्या, देवघरांत देवदर्शनाकरतां जाऊं द्या, नाहीं तर आम्ही सारं घर ताब्यांत घेऊं म्हणजे देवघर आपोआप हातीं येईल.

**वामदेव**— माती येईल चार वाटांची तुमच्या हातांत. म्हणे देवघरांत येऊं नि घर ताब्यांत घेऊं. लाज नाहीं वाटत असं बोलायला? देव्हाऱ्यांत जाऊन बसा.

**हिम्मत०**— भटजीमहाराज, चूप असा; भोळ्या रामाला कोंडून हे वेदोनारायण म्हणे धर्माचं रक्षण करणार! महाराज, उगीच भांडण कशाला वाढवितां? अतिशूद्रांचं कांहीं फार मागणं नाहीं. त्यांना लांबून देवदर्शनाची परवानगी द्या.

**भैरव**— दारू पिण्याची परवानगी ठेवून मायबाप इंग्रजसरकारनीं महारड्यांकरतां गुत्त्यांचीं देवळं पुष्कळ उघडलीं आहेत. अहो बहादूर, तुमचे हे सारे देवभगत तिथें घेऊन जा नि मनमुराद मंदिरादर्शन व आकंठपान त्यांना करवा— जा तुम्हांला प्रेमाचा पान्हा फुटला आहे तर तुम्ही एक महार व्हा.

**वामदेव**— पावनांचे पतित करण्याकरतां हिंदुधर्म नाहीं.

**चंदन**— अहो ज्ञाननिष्ठुर पुण्यवंत, पतितांना पावन करून घेण्याला तरी हिंदुधर्माचा अवतार आहे ना?

**रमणगौरी**— अशा वितंडवादानं तडजोड कशी व्हायची? वामदेव, मी हात जोडते, जरा माघार घ्या व आपल्या धर्माचीं हीं अजाण भावंडं यांना नुस्त्या दर्शनापायीं दूर दवडूं नका. चंदनराव, तुम्ही तरी ऐका; जुनी पिढी म्हणजेच जुना काल आणि हिंदूंच्या एकीकरणाची नवी चाल, यांचा सध्यां जम बसला नाहीं म्हणून कष्टी होऊं नका, तसे हट्टीही बनूं नका. जरा नमतं घ्या. महारवाड्यांत 'राम' नाही कां? तिथेंच आपण पतितपावनाचं नवें मंदिर बांधूं. तंटा विकोपाला नेऊन, आपआपसांत लढून, अखेर सर्वांचा सत्यनाश झालेला चांगला, कीं पड खाऊन परमेश्वर जोडलेला बरा?

**वामदेव**— ( उठतो ) अतिशूद्र देवळांत येणार नसतील तर वाटेल ती तडजोड आम्ही मान्य करूं!

**चंदन**— तडजोड मोडली तरी बेहत्तर—पण आम्ही देवळांत शिरूंच शिरूं!

**गुंजारराव**— हं थांबा—असे हातघाईवर येऊं नका.

**भैरव**— महारमांग अत्याचार करून देऊळ बाटवूं लागले तर जगून काय करायचं आहे? रामाचा विटाळ टाळण्याकरतां आम्हांला लढावं नि मरावं लागलं तरी त्यालाहि आम्ही तयारच आहोंत.

**हिम्मत०**— ठीक आहे, सभेचं काम संपलं.

**चंदन**— उठा, शिंग फुंका, हा पहा मी इथेंच लढायला तयार आहें—कोणचा—मायेचा पूत पुढें येतो तें पहातों !

**वामदेव**— हा पहा तुझा काळ—घे लढण्याची हौस फेडून ( त्याच्या अंगावर काठी घेऊन धांवतो. )

**चंदन**— ढुंगणाचं सोडून डोक्याला गुंडाळणाऱ्या भटा, घे आतां देवाचं नांव ! ( चंदन व वामदेव यांच्या काठ्या एकमेकांना भिडतात; गुंजारव खालीं धांवून येतो. )

**गुंजारव**— हं; खबरदार इथं दंगा कराल तर. घ्या त्या काठ्या मागें. या महात्मा महालांत, रमणगौरीसमोर मी कोणालाहि लढूं देणार नाहीं. सभा संपली; आज तडजोड जमली नाहीं, हरकत नाहीं. उद्यां पुन्हा समेटाचा प्रयत्न करूं; यश देणार परमेश्वर आहेच.

**वामदेव**— अतिशूद्रांच्या अतिरथ्या, तुझी लढण्याची हौस अर्धीच राहिली !

**चंदन**— ती मी भोळ्या रामाच्या देवळांत येऊन पुरी करून घेईन, व तुझ्या देहाचा द्रोण करून तो गंगामाईच्या प्रवाहांत फेंकून देईन !

**गुंजारव**— खामोष ! सभा बरखास्त ! महाल खालीं करा दरोबस्त—अध्यक्षांचं हें फर्मान ह्यावेळीं तुम्हीं सर्वांनीं पाळलंच पाहिजे. ( पडदा पडतो. )

( पहिला अंक समाप्त. )

# अंक २ रा.

## प्रवेश १ ला.

[ **स्थळः**—भोळ्या रामाच्या देवळामागील बाग.

सावित्रीबाई प्रवेश करते. ]

**सावित्री—** तुळशीचं लग्न लागलं न लागलं इतकंच. साऱ्या गांवांत लग्नाचा हुतुतू सुरू झाला. कुऱ्याला हळद लागली, निपटल्यांचीं लग्नं झालीं; पण बाई माझ्या चरणीला अजून स्थळ मिळेना. तुळशीसारख्या झाडाझुडपांचीं देखील लग्न लागावीत आणि माझी चरणी मात्र तशी रहावी—थांबायचं तरी बाई किती दिवस. लोक भलतं न् सलतं बोलतात. ऐकवत दिखील नाहीं हो तें. पण करायचं काय ? कुणाच्या तोंडाला हात लावायचा ? वेलाच्या झाडाबरोबर चरणीचं लग्न लावा—अस्सं मेले कांहीं जण बरळतात. शिव शिव; रामा नारायणा धांव रे धांव ! ( दुर्मुखा घाईघाईनें येते. )

**दुर्मुखा—** कोण आहे तें—सावित्रीबाई ? काय झालं तुम्हांला ? कांहीं चावलं बिवलं तर नाहीं ? मग धांव म्हणून कुणाला म्हणालांत ?

**सावित्री—** अग वेडे ' देवाला; ' त्याच्याशिवाय आतां धांवा कुणाचा करायचा ? माणसांना मदत मागितली; दगडांना दया येईल इतकी त्यांची करुणा भाकली, पण बाई माझ्या चरणीला कोणी पदरांत घेईना. ( पदरानें डोळे पुसते. )

**दुर्मुखा—** उरींचं दुःख फुटल्याशिवाय डोळ्याला नाहीं ग बाई पाणी यायचं. सावित्रीबाई रडूं नका. मीं केली असती तुम्हांला मदत पण करूं तरी कशी ? तुमची चरणी पडली बायको नि मी नाहीं पुरुष !

**सावित्री—** म्हणजे ! हें ग काय दुर्मुखे ? म्हणतेस तरी काय तूं ?

**दुर्मुखा—** कांहीं वाईट म्हणत नाहीं, सावित्रीबाई. नाहींतर काय ? वाईट




दुर्मुखा:— तुमची चरणी पडली बायको नि मी नाही पुरुष. [पृ. २४]

कां आहे तुमची चरणी–पांचशें बायकांत बायको शोभेल. पळत्या प्रवाशानें दिखील तिला उचलून न्यावी.

**सावित्री**— तूं म्हणतेस हें सारं खरं; पण काय ? पहायला येतात नि परत जातात. तिला पदरांत घ्यायचं कुणींच बोलत नाहीं. बरं तसं म्हणावं तर माझी चरणी कांहीं लहान नाहीं—

**दुर्मुखा**— कशी असेल लहान– मीं परवां पाहिली–अगदीं ठसठशीत बायको दिसते, बायको. तुम्ही तिच्या आई–पण ती तुमच्या आईसारखी दिसते !

**सावित्री**— म्हणून तर पहायला येणारांच्या ती डोळ्यांतच भरत नसेल ना ?

**दुर्मुखा**— साऱ्या मेल्यांचे डोळे फुटलेत कीं काय–कीं एवढी मोठी बायको-वजा नवरी कुणाच्याच डोळ्यांत भरूं नये ? तें कांहीं नाहीं उपयोगी; पुरुषांची गय करायचे दिवस आतां संपले. बायका--बायकांचीं लग्न लावण्याचा पायंडा पाडल्याशिवाय पुरुषांची खोड आतां नाहीं ग बाई मोडायची.

**सावित्री**— असं जर झालं, पुरुषांचा सूड घेण्यासाठीं आपण बायका--बाय-कांत लग्न लावलीं–तर पुरुषांचं काय होणार दुर्मुखे ?

**दुर्मुखा**— कांहीं कां होईना त्यांचं. फिरतील मेले मोकाट गांवभर वळू बैलासारखे. ना घर ना संसार–अशी त्यांची गत केली पाहिजे.

**सावित्री**— मग बाई बायकांचा संसार कसा होणार ? पोराबाळांनीं घर कसं भरणार दुर्मुखे ? आपली कड पोहोंचेल नि त्यांचा सूड घेतां येईल असं कांहीं तरी काढ बघ.

**दुर्मुखा**— कोणत्याही पुरुषाला ' नवरा ' म्हणून जवळ येऊं द्यायचं नाहीं–

**सावित्री**— आणि मग ग काय–?

**दुर्मुखा**— मग काय विचारतां, मुळीं सांगितलंच नाहीं का शास्त्रांत कीं नाहीं होऊं कुणाची बायको नि कुणाचं चाकर ! नको ग बाई त्या मेल्या पुरुषांचा नवरेपणा.

**सावित्री**— अग पण ' पणांत ' आल्यावर पुढं काय ? नवराबायकोचा संसार म्हणजे बाहुला--बाहुलीचा खेळ नव्हे ना:?

**दुर्मुखा**— अहो पुढचं पुढें. कोणत्याही पुरुषाला ' नवरा ' म्हणून त्याच्या-पुढें नमायचं नाहीं व त्याला जवळ करायचं नाहीं. ' पुरुष ' म्हणून सुखाची सलगी करण्यापलीकडे त्यांना मुळीं थाराच देऊं नये—म्हणजे नाहीं कां बायकांचं काम होणार ?

**सावित्री**— पण देवाब्राह्मणासमोर नवरेपणाचा हक्क विकत घेतल्याशिवाय दुर्गुणी नसलेले पुरुष बायकांच्या वाऱ्याला उभे रहात नाहींत—त्याला ग कसं करायचं ? तें कांहीं नाहीं, चरणीला स्थळ हें शोधलंच पाहिजे, आणि एखाद्या तुझ्यासारख्या बायकोबरोबर नव्हे, तर पुरुषाबरोबरच तिचं लग्न केलं पाहिजे. ते वामदेव भटजी नाहींत कां तुला ठाऊक—चरणीला स्थळ जुळवून देतों म्हणाले पण बाई त्यांनीं एक अट घातली.

**दुर्मुखा**— काय अट घातली ?

**सावित्री**— ' मला एक सनंग शोधा ' नि मग चरणीचं लग्न जुळवून देतों म्हणून—

**दुर्मुखा**— म्हणे सनंग पाहिजे—कांही तरी लाज जिवाला. एखाद्या म्हशी-बरोबर लावा त्याचं लग्न. बांधा एकदां बाशिंग वामदेवाला. शिंग--शेपुटवाले प्राणी देखील, असल्या बेश्रमाला आपल्यांत व्यायचे नाहींत.

**सावित्री**— सांग एखादी मुलगी ठाऊक असली तर. करीना कां बिचारा पुन्हां लग्न— मी त्याच्या उपयोगीं पडले तर चरणीचं जुळवून द्यायला मदत करील तो.

**दुर्मुखा**— ठीक आहे; मी तुम्हाला मदत करतें; सांगा वामदेवाला ' सनंग ' तयार आहे म्हणून.

**सावित्री**— कसं सांगू उगीच, आहे कुठें मुलगी ?

**दुर्मुखा**— कुठें ! ही पहा मी तुमच्या पुढेंच उभी आहें. मी वामदेवाबरोबर लग्न करतें—

**सावित्री**— अशी माझी थट्टा करूं नकोस गडे.

**दुर्मुखा**— मी खरं सांगतें, तुमची थट्टा करीत नाही. मात्र वामदेवांनीं तुमच्या चरणीला नवरा आणला पाहिजे; बोहल्याशेजारीं बोहलं घालूं दे त्याला,

आणि माझं वामदेवाबरोबर लग्न व चरणीचं लग्न एकाच मांडवांत एकाच वेळीं झालीं पाहिजेत; सांगा असं वामदेवाला. तुम्हांला पुरे ना ही माझी मदत? चरणीचं माझं लग्न होत नसलं, तरी वामदेवाबरोबर विवाह करून ही दुर्मुखा तुमची अडचण दूर करील.

**सावित्री**— बायकांची नड बायकाच दूर करणार. दुर्मुखे, मी तुझी कशी ग उतराई होऊं?

**दुर्मुखा**— बाईसाहेबांनीं कळ्या आणायला म्हणून मला पाठवली—विसरलेंच तें मी. सावित्रीबाई मी जातें. तुम्हीही लवकर जा नि सांगा त्या वामदेवाला कीं ' सनंग ' तयार आहे; बाशिंग विकत घे म्हणून. (जाते.)

**सावित्री**— केवढी काळजी दूर झाली; आतां माझ्या चरणीचं लगीन होणार. ही अश्शी जातें नि वामदेवांना त्यांच्या बिऱ्हाडीं गांठतें. पण. अगबाई—हे कोण येताहेत?

(वामदेव व राघव प्रवेश करतात.)

आठवण काढायला आणि यायला एकच गांठ. वामदेव, तुम्हांला शंभर वर्षं आयुष्य—

**वामदेव**— बारा वर्षं झालीं, मी बायकोवांचून काढतों सावित्रीबाई; आणि यंदां जर लग्न न झालं तर आपण कांहीं जीव ठेवणार नाहीं. पण माझं दुःख बाजूला ठेवून तुमच्या चरणीला स्थळ आणलं आहे.

**सावित्री**—होय का—कुठलं स्थळ? केव्हां पाहयला यायचं—जमवायचं केव्हां?

**वामदेव**—आस्ते कदम सावित्रीबाई,—( राघवाला दाखवतो ) का—जांवई पण जांवई, आहे की नाहीं पसंत? बोला.

**सावित्री**—तुम्हांला पसंत ते मलाहीं—मी तुमच्यां बाहेर कां आहे? पण चरणी यांना पसंत पडली पाहिजे—

**राघव**—पडलीच म्हणून समजा—वामदेवांना ती पसंत—मग मी पहायला-सुद्धां येणार नाहीं.

**सावित्री**— तुम्ही माझं काम केलंत—वामदेव, तुम्हाला योग्य असं सनंग शोधून ठेवलं आहे—ठरीवलं देखील—

**वामदेव**--( आनंदानें ) वामदेव चतुर्भुज होणार एकूण--कोण ही आनंदाची घटका. माझ्या स्वर्गस्थ पितरांनो, ह्या तुमच्या लाडक्या वामदेवाच्या तिसऱ्या लग्नाच्या अक्षता आकाशांतूनच डोक्यावर टाका--

**सावित्री**-- अगदीं पहिलीच तिथि धरायची, नि एकाच मांडवांत दोन्ही कार्यं उरकायचीं--वामदेवांची आणि चरणीच्या नवऱ्याची सामू मी एकच बरं.

**वामदेव**— चल राघव, पंचांग पाहून तिथि ठरवूं.--

**सावित्री**— लगीन ठरलं. जातें बाई घरीं—वामदेव आतां तुमची भेट—

**वामदेव**—नवऱ्या मुलाच्या वेषांत—मांडवाच्या दारीं.

( जातात. )

---

## प्रवेश २ रा.

( **स्थळ**-- हिम्मतरावच्या अंगणांतील गुरांचा गोठा; गौळण बनलेली गजरा चरवी हातांत घेऊन धार काढीत आहे असा देखावा; जवळ इतर गुरेंढोरें बांधलीं आहेत. तुळशीवृंदावन आहे; आडाला रहाट लावला आहे. )

**गजरा**-- गोमाते, मला आई नाहीं--तूंच माझी आई. हृदयाचं गुज तुझ्याजवळ सांगतें. तशीच ह्या वृंदावनांतली तुळस तुझी बहीण--मग तिच्याजवळ मन मोकळं करायला मी कशाला भिऊं ? या माझ्या मानलेल्या कपिला आईची काया आणि तुळशीताईची माया माझं रक्षण करायला समर्थ आहेत; वेडे गजरे, तुला अपाय आतां कोण करणार ? जन्मदात्या आईच्या मागें बाप मावसा होतो म्हणतात. माझ्या बाबांनी हें खरं करून दाखविलं. नेहमीं महारामांगांत गुरफटलेले असतात--अष्टौप्रहर त्यांचा उद्धार करतांना, स्वत:ला लग्नाची मुलगी आहे, तिला नवरा पाहून देऊन तिचा संसार व्हायला पाहिजे हें बाबा विसरले तरी कसे ? वयांत आलेली मुलगी योग्यवेळीं अनुरूप वराच्या हातीं दिली नाहीं तर स्वत:बरोबर ती साऱ्या कुलाला पतित

करण्याची भीति आहे--बाबांचं इकडे लक्षच नाहीं. बाहेरच्या पतितांचा उद्धार करतां, मग बाबा पोटच्या पोरांना आधार द्यायला तुमच्या हाताला अजूनही सवड नाहीं कां ? मग मी वागलें त्याला तुम्ही तरी नांवं ठेवूं नका. आई, ताई, हंसूं नका अं मला—कारण मी आतां तुमची झालें आहें. भैरवांच्या हातांत मीं विश्वासानें हात दिला—यांत काय वरं बिघडलं ? बापानं कन्यादान केलं नाहीं म्हणून मुलीनं आत्मदान केलं.

पद

**निदांध काला । विलोलबाला**
**नाथविहिन विकला ॥ ध्रु० ॥**
**अभिनव नटत हृदय अविकारी**
**आत्मदान अभिराम बोला ॥ १ ॥**

( कपिला हंबरते )

अग बाई, कपिला हंबरली—माझ्या कर्माची कहाणी कपिले, समजली ना तुला ? धार काढली, नि वेड्यासारखी मी गात काय उभी—कपिलेला पाणी पाजायला विसरलें. ( चरवी खालीं ठेवते ) आणलीच बघ घागर काढून. ( रहाटावर पाणी काढायला जाते. दौलत येतो, गाईवरून हात फिरवितो ).

**दौलत**— चरवी इथें टाकून आपल्या ताईसाहेब गेल्या आहेत तरी कुठें ? बाबा बाहेर गेले केव्हांचे म्हणून घरांत ताईला पहायला आलों; गुरांचा गोठा म्हणजे आमच्या ताईचं माहेरघर; नेहमीं या कपिलेजवळ असते. पण ही—ही पहा आमची ताई आडावर गेली—अहो—अहो ताईसाहेब, जपून पाणी ओढा; कां मी येऊं मदतीला ?

( कंबरेवर कळशी घेऊन गजरा येते. )

**गजरा**— अहो मदतनीस, दिमाख तर पहा यांचा ! मीं धार काढली नि चरवी इथेंच विसरलें; मला वाटलं एखादं मांजर मुकाट्यानं येईल नि चरवी रिकामी करायला मदत करील.

**दौलत**— मीं पिणार नाहीं दूध जा आज; मला मांजर म्हणतेस—ताईची गट्टी फू !

**गजरा**— हातांनीं पिऊं नकोस–कुक्कुबाळाला मी पाजतें दूध. ( त्याला जवळ ओढते ).

**दौलत**— मी नाहीं येणार तुझ्याजवळ–सारख्या शिव्या देतेस, माजर, कुक्कूबाळ; मी वाकोल्या दाखवीन आँ ताई– ( वेडावून दाखवतो ).

**पद**

**पहा वरें, आतां तुला दाखवीन वाकुल्या ।**
**फुगडी सदाकदा खेळसी । फू–गडी फू–गडी ताईला ॥**
**कृष्ण चोर मीही चोर कुक्कुबाळ नाहीं लहान ।**
**दूर हो, सोड गे, जाऊं दे आतां मला ॥ १ ॥**

**गजरा**—( हंसते ) अरे गुलामा– तोंडांत अजून दूध चमकतं आहे, आणि वर माझ्याशीं फू–गडी फू करतोस काय ? ( त्याला हातानें धरते. )

**दौलत**— मला ओढून माझ्याबरोबर फुगडी घालतेस होय ताई; पण मी सांपडायचा नाहीं तुझ्या हातीं. दारावरनं नवरा मुलगा वाजत चाललाय्– गेलों बघ तो पाहयला ताई. तूं चल नवरा पहायला ( दौलत धांवत जातो ).

**गजरा**— कोण हा बाळपणचा निर्मळ आनंद; बाळ दौलत, तुझ्यासारखं धांवायला मी कुठले पाय आणूं ? मी नवरा मुलगा पहायला दारीं चलूं म्हण- तोस ? तसं करायला माझं तोंड उजळ राहिलं नाहीं रे बाळ. नवरा मुलगा होऊन या म्हणून भैरवांचे पाय धरतें–तोंपर्यंत मी पतित आहे असंच माझं मन मला खात राहणार. भैरव लौकर यायचं नि पतिदेव व्हायचं गडे आतां. नाहींतर लोक या तुमच्या पतिविरहित गजरेला पतित नाहीं का म्हणायचे ?

( भैरवनाथ येतो. )

**भैरव**—गोकुळींची राधा गौळण पुन्हा अवतार घेऊन आली तर नाहीं ना ? का मी वाट चुकलों ?

**गजरा**—माझ्या गोपाळकृष्णाची मी वाट पहात होतें; धावा कर करून दमलें; आजतागाईत तुमच्या विश्वासावर जगलें–

**भैरव**— मी तुझ्या प्रेमावर जगलों; लौकिक जगासाठीं, प्रेम जगण्यासाठीं.

**गजरा**— पण प्रेमाला लौकिकाचं वस्त्र नेसविल्याशिवाय जगांत जगायला




भैरवः— आण तो हात इकडे, होऊं दे पाणिग्रहण. [ पृष्ठ ३१ ]

जागा कुठें आहे ? म्हणून म्हणतें कीं, आपल्या प्रेमाला आतां चार चौघांत लग्नाचं लेंग घालून नटवायला हवं.

**भैरव**—गजरे, तुला लग्नच पाहिजे आहे ना ? मग आटप, आण तुझा हात इकडे–होऊं दे पाणिग्रहण–उगीच उशीर कशाला ?

**गजरा**—हें काय ? बाबा बाहेर गेलेत नि असलं लटुपटीचं लग्न ? असली लटपट मला नाहीं हो खपायची—

**भैरव**—काय खुळी पोर आहे पहा–म्हणे बाबा बाहेर गेलेत ! जसं कांहीं इच्या बाबांबरोबरच माझं लग्न होणार आहे ! अलौकिक प्रेम आणि मुलखावेगळं लग्न–गजरे, आपण असंच करूं या. तुझ्या बापाच्या घरांत त्याच्या गैरहजेरींत मी तुझं पाणिग्रहण करतों. या गौळवाड्यांतील जनावरं ही वरपक्षाची मंडळी व तुळशी, जाईजुई ही वधूपक्षाची आळी ! ताशावाजंत्र्यांचा आवाज नाहीं. अर्थ न समजल्या जाणाऱ्या लग्नमंत्रांची पोपटपंची नाहीं, असल्या सुंदर व प्रशांत पार्श्वभूमीचा आधार घेऊन, सकाळच्या सुमुहूर्तावर आपण अंतराचा अंतरपाठ बाजूला सारून आणि नंतर रक्ताच्या रंगाची अमंगल आठवण देणारं तें तुझ्या कपाळावरचं कुंकू मी हें असं पुसून टाकणार. ( तसं करतो ) व या चरवींतल्या दुधाचा त्यावर ( टिळ्याचा ) शिक्कामोर्तब मारून, गजरे तुझ्यामाझ्या लग्नाचं हें मूक, सुंदर व अभिनव दृश्य उद्यांच्या जगाला दिसावं म्हणून हवेच्या पडद्यावर चितारून ठेवणार !

**पद**

**शशिचंद्रिका, करदान ठाया ।**<br>
**वसुधा नटे परिवार सारा ॥**<br>
**मधु मीलना । कारि मंडना**<br>
**नव दृश्य पावे । उत्क्रान्तिला ॥ १ ॥**

( जातो. )

**गजरा**— अग बाई ते गेले–दिसेनासे झाले. गजरेच्या कपाळाचं कुंकूं पुसून त्यावर दुधाचा डाग देऊन ते गेले ! हेंच का माझं लग्न ? पांढऱ्या कपाळाच्या गजरे, तूं कुंवारीण आहेस का सुवासिनी झालीस हें सांगणार कोण ? पतितांच्या

परमेश्वरा, मनानं पवित्र असलेल्या या दीनेला तूंच आतां मार्ग दाखीव.
( जाते. )

---

## प्रवेश ३ रा.

( स्थळः—रमणगौरींचें ऑफीस. ब्रीफ बॅग हातांत घेऊन कारकुनाच्या वेषांत चरणी प्रवेश करते. )

**चरणी**— लग्न होईना, मग नोकरी धरूं नको तर काय करूं? उगीच चार अक्षरं शिकलें म्हणून रमणगौरीसारख्या वकीलाच्या घरीं नोकरी तरी मिळाली. आईनं शिकस्त केली पण माझं कुठें जुळेना; ती तरी काय करणार? बरं आई-शिवाय पहाणार तरी कोण मला स्थळ? आईच आमच्या घरांतली कर्ती पुरुष. बाबा वारून किती वर्षं लोटलीं असतील, मी तेव्हां जन्माला सुद्धां आलें नव्हतें; म्हणूनच कीं काय माझ्यावर जन्मकुवार राहाण्याचा प्रसंग आला आहे. बाकी अडाणी रहाण्यापेक्षां हा प्रसंग पुरवला. आई, मला शाळेंत घालून शहाणी केलीस, केवढे थोर उपकार; नाहीं तर, ना नवरा, ना नोकरी; अशी माझी कुचंबणा होती.

पद

**निरस मज गमे लग्न माया ।**
**अनुचरीन वृत्ती विदुशा, सेवी मी अभया ॥ ध्रु० ॥**
**प्रेम वासना वैरी गणुनी । शिकवण दे मम**
**हृदया । अनुनय त्यागाला । नवयुग महिमा**
**मम मनिं ठसला । आजि येई उदया ॥ १ ॥**

( हातांतल्या घड्याळाकडे पाहून ) आठ वाजले, वकीलसाहेब अजून कशा नाहीं उठल्या? कोर्टांत आज कामाची खेच; एकाच दिवशीं इतके पुराव्याचे नंबर ठेवतात कशाला कुणाला ठाऊक?

( रमणगौरी ऑफीस ड्रेसमध्यें येते. )

**रमणगौरी**— पहाटे उठून फिरायला गेलें; वाटेंत महारवाड्यांत थांबलें. भोळ्या रामाच्या देवळांत घुसण्याचा अतिशूद्रांचा बेत कायम झाला. तंटा

विकोपाला जाऊं पहातो. मीं त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला, अशी घाई करूं नका म्हणून विनवलं; पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. ऑफीसला यायला त्यामुळें उशीर झाला.

**चरणी**— मीं सारे कागद तयार करून आणलेत; तेवढ्या सह्या करायच्या होत्या. शिवाय आज पुराव्याचे बरेच मुकदमे आहेत.

**रमणगौरी**— कुणाचे बरं? द्या पाहूं ती डायरी इकडे. (डायरी घेऊन) हेडमिस्ट्रेस मालतीबाई यांची नवरा ताब्यांत घेण्याची केस, आज कांहीं थांबायची नाहीं. या केसच्या फॅक्ट्स मोठ्या मजेच्या (interesting) आहेत. शिक्षकिणींच्या पवित्र धंद्यास मालतीबाईंनीं स्वतःला वाहून घेतलं आहे. शिकवण्यापायीं त्यांना आजपर्यंत लग्न करायला देखील उसंत मिळाली नाहीं. जिवाची करमणूक म्हणून त्या कधीं कधीं सिनेमा पहायला जात. झालं, एका सिनेमा-नटाची व त्यांची ओळख होऊन त्या विवाहबद्ध झाल्या. पण तो त्यांचा नवरा कांहीं केल्या नीट नांदेना. सिनेमा कंपनीचे आर्टिस्ट व स्टार्स्-म्हणजे ग्रामांगना व उडाणटप्पू यांचा जवळ जवळ बाजार. आज विजापूरचा सीन घ्यायला गेला तर उद्यां कोल्हापूरच्या रेसकोर्सवर मॉब सीन तयार करण्यांत गुंतला. अखेर मालतीबाईनं दावा गुदरला. किती मुदती घेतल्या असतील त्या नवरोबा प्रतिवादीनं? पण आज हुकूमनामा होणार आणि स्वारी बायकोच्या ताब्यांत कोर्टासमक्ष जाणार!

**चरणी**— हुकूमनाम्याची बजावणी भर कोर्टांत होणार?

**रमणगौरी**— हो; त्याला काय हरकत आहे? पण चरणी, हा दुसरा खटला, आज पुराव्यावरच आहे का?

**चरणी**— (पाहून) होय वकीलसाहेब, पण तो चालेलच असं नाहीं; त्यांत आपल्याला मुदत मागावी लागेल. साक्षीदारांची तजवीज अजून होत नाहीं. वादी महाजन आहेत.

**रमणगौरी**— महाजनाची मला कींव येते. मागाल तेवढी भरपूर फी. ना म्हणून नाहींच. अगदीं अश्राप अशील. बोलभांड बायकोबरोबर लग्न लागल्यामुळें, ती त्याला तोंडांतून ब्र काढून देत नसे; आणि असं कैक वर्षं तोंड मिटलं राहिल्यामुळें, बिचारा अखेर मुका झाला. पुष्कळ डॉक्टरी उपाय करून पाहिले पण अजून मुका तो मुकाच आहे!

**चरणी**— ही मुक्याची फिर्याद-तिची सुनावणी कशी व्हायची ! आणि वादी म्हणून जबानी कोण देणार ?

**रमणगौरी**— मुक्यांची पालनवाली त्यांची आई; प्रेमाचा पान्हा फुटल्यावर मुलांचे मुके घ्यायचे-आणि बोलक्या बायकोच्या मारामुळें जर पुढें तो नवरा मुका झाला, तर त्याच्या पोटगीची दाद लावण्यासाठीं, ही अशी कोर्टाची पायरी चढायची. मुक्या महाजनानीं बोलक्या बायकोवर लावलेली ही अन्नवस्त्राची फिर्याद-ही झाली केस नंबर दोन. आणखी कांहीं राहिलं आहे का आजचं काम ?

( डायरी चाळते. )

**चरणी**— (स्वगत ) मुका तो मुका, आणि सोंग कोर्टात कशाला यायचं ? त्यापेक्षां घरबसल्या, बायकोचा घसघशीत ' मुका ' घेतला-सारखा तिच्यावर मुक्यांचा मारा केला, तर काम नाहीं व्हायचं ? तिचं तोंड बंद पडेल, नि याचं उघडेल. मग फिर्यादीचं कारण सुद्धां उरणार नाहीं. पण पुरुषांना इतक्या अकला असत्या, तर काय पाहिजे होतं ?

**रमणगौरी**—( वर पाहून ) हें पहा, आजची डायरी फार मोठी आहे; मला फार वेळ कोर्टात थांबतां येणार नाहीं. मालतीबाई मास्तरणींचा कज्जा चालवून नवरा त्यांच्या पदरांत टाकला कीं मी कोर्टातून जाईन; राहिलेल्या इतर कामांची व्यवस्था नीट लाव-अजून तूं कोर्टकामाला रुळलेली नाहींस म्हणून सांगतें. गुंजारव महारवाड्यांत होते. इथें येतों म्हणून बोलले, अजून का बरं आले नाहींत ?

( गुंजारव येतो )

**गुंजारव**—मी आठवण काढल्याबरोबर आलों ! गौरी, महारवाड्यांतला बेत तर तूं ऐकलास. चंदन आणि हिम्मत कांहीं ऐकत नाहींत. तूं इकडे आल्यावर मी पुष्कळ त्यांची समजूत घालून पाहिली. त्यांचं आपलं आहे तेंच आहे. निदान आम्हांला देवळांत येऊं दिलंच पाहिजे-मग कांहीं अंतरावरून देवदर्शन करण्याची अट आम्हीं हवं तर तडजोड म्हणून कबूल करूं असा त्यांचा अखेरचा जबाब आहे.

**रमणगौरी**—मध्यस्थी करायची तर अर्धी नको. भैरवाकडे जाऊन त्यांचं मन वळवूं, कीं विनाकारण रण कशाला ?

**गुंजारव**—भैरवनाथाचा गड व हिम्मत--चंदनाचे सासवड या दोहोंच्या-मधें तडजोडीकरतां लुडबुडणारे, गौरी, तूं व मी दोघे द्राविड झालोंत. बरं बॅरिस्टर गौरींना या वकिलीबद्दल फी काय तर उभयपक्षांचा उपहास. चलायचं तर मग.

**रमणगौरी**—ही पहा मी आलेंच--तुम्ही पुढें व्हा. ( जातात. )

**चरणी**—या एवढ्या सह्या करून मग जायचं होतं बाहेर—अग बाई—गेल्या कीं वकीलसाहेब ! मग सह्या कोण करणार ? गुंजारव आले कीं आमच्या वकील अश्शा नादावतात. मग कसल्या सह्या नि कसलीं कामं— मी कशी झालें तरी वकीलाची कारकून; सहीसाठीं कोण अडून बसेल ? त्यांच्यासारखी हुबेहूब ठोकतें— मग आमच्या खुद्द वकीलांनीं जरी पाहिली तरी त्यांना देखील ओळखू यायची नाहीं. ( जाते. )

---

## प्रवेश ४ था.

( **स्थळ**— भोळ्या रामाचें देऊळ. भैरव प्रवेश करतो. )

**भैरव**— शूद्रांची उत्पत्ति पायापासून ! " पद्भ्यां शूद्रोऽजायत " पुरुषसूक्त कंठरवानं असं सांगत आहे. पण हे आजकालचे अतिशूद्र आणि अंत्यज आमच्या डोक्यावर बसायला लागलेत. देवळांत घुसून, राम भ्रष्ट करायचा, ही कोणच्या मुलखांतली रीत ? पायरीला पाय लावणारांच्या डोक्यावर दगडा-धोंड्यांचा मारा केला पाहिजे ! ( रमणगौरी येते. )

**रमणगौरी**— नाहीं, एकदां नाहीं सातदां नाहीं ! सात समुद्र ओलांडून आलेल्या पश्चिमेकडच्या प्रवाशांचं वर्चस्व, भैरव, जर आपल्याला नाहींसं करायचं आहे, आपल्या घरांत आपल्याला मालक व्हायचं आहे, तर अधाप अंत्यजांवर दगडाधोंड्यांचा मारा नव्हे, तर दयेच्या हृदयस्थ प्रेमाच्या धारा सोडल्या पाहिजेत !

**भैरव**— गौरी, मला माफ करा. पुन्हां मला भेटण्याची तसदी कां घेत-लीत ? तडजोड संपली, लढाई जुंपली. माझा निश्चय कायम आहे. आणि कोण-त्याही कामाकरतां कां होईना,—आपण आमचे वकील, आम्हीच आपल्याकडे

यायचं, अशी स्वत: तसदी घ्यायची नाहीं. निरोप पाठविला असता तर आलों नसतों का ?

**रमणगौरी**-- तुमची वकील म्हणून मी इथें आलें नाहीं भैरव; देवालय-प्रवेशाचा तंटा अजूनही मिटवितां येईल या आशेनं मी आलें ! निराशेंत देखील आशा असते ना ?

**पद.**

**निराशी आशा, संगम निगम ।**
**कां, रण वाया। यादवी मिटवा**
**विजन हसत अभिमाना ॥ ध्रु० ॥**
**मंडन कार्या सादर सजले ।**
**उभय पथक अनुमाना ॥ १ ॥**

**भैरव**-- पण गौरी, व्यवहारांतला काय नि धर्मांतला काय, तारतम्यभाव कसा नाहींसा करूं पाहतां ? उच्च-नीच, लहान-थोर, शहाणे-वेडे, सारेच भेदभाव लयाला गेले नाहींत. कर्मानुसार जर जन्म तर वृत्तीनुसार कर्म कां नको ? पायांतलं पायतण शिरावरचं शिरस्त्राण करून, सनातनी हिंदुधर्माचा खेळखंडोबा करूं नका !

**रमणगौरी**-- अतिशूद्र, अंत्यज वगैरेंचा देवालयप्रवेश म्हणजे कांहीं आर्य-धर्माचा नाश नव्हे; उलट आजपर्यंत ज्यांची हेळसांड झाली, उपेक्षा केल्यामुळं जे परधर्मांत गेले, त्यांना आपलेपणाच्या मायाममतेनं जर आपण जवळ केलं, तर भैरव, हिंदुधर्माचं उज्ज्वल यशच अधिक वाढेल.

**भैरव**-- समजा, आम्हीं आज देवळाचीं दारं बंद केलीं, तर दांडगाई करून आंत घुसल्यानं हिंदुधर्माचं यश अंत्यज वाढविणार आहेत वाटतं ? हा शिरजोर-पणा इथेंच थांबणारा नाहीं !

**रमणगौरी**-- हृदयाचं दार उघडा, प्रेमाची खुली हवा आंत सोडा, म्हणजे देवळाचीं दारं बंद करून आंतल्या देवतेला बंदिवास घडविण्याचं पाप तुमच्या हातून होणार नाहीं.

**भैरव**-- अपेय पान, व अभक्षभक्षण करून जे आज हजारों वर्षं गलिच्छ

व पतित झाले आहेत, त्यांना देवळांत घ्यावं असं माझं मन मला सांगत नाहीं.

**रमणगौरी**-- पतित आहेत म्हणूनच त्यांना पावन करून घ्यायला हवं. पुण्यवंत असतील, त्यांना देवाची अगर देवळांची वास्तविक जरूरच नाहीं. आणि हें पहा, जन्माला येणं हें मुळीं पतनाचं पहिलं चिन्ह. या जगांत पतित नाहीं कोण ?

**भैरव**-- असतील, सारेच पतित असतील; मी नाहीं म्हणत नाहीं; पण तेवढ्यावरून अतिशूद्रांना आम्हांला खालीं ओढण्याचा हक्क कसा मिळतो हेंच समजत नाहीं. खालच्यांत वरचे मिसळा आणि अखेर दोघेहि मातीला मिळा, असा प्रकार अखेर होईल. अतिशूद्रांना तपश्चर्या करूं द्या. शुद्ध व सात्विक रहाणीशीं त्यांची ओळख होऊं द्या; आणि मग त्यांना म्हणावं कीं देवळांत घुसा, देवावर रुसा, तोंपर्यंत भलताच अट्टाहास करूं नका.

**रमणगौरी**--चार पावलं पुढें गेलेल्या पुण्यवंतांनीं आपला हट्ट यावेळी सोडून मागासलेल्यांच्या माणुसकीला मिठी मारून जागृत केलं पाहिजे व एकीच्या अंगणांत सर्वांनीं सारखे उभे राहून स्वदेशकल्याणाचा मार्ग बरोबर आक्रमण केला तरच आम्हां हिंदूंची यापुढें धडगत राहील !

**भैरव**-- गौरी, केवळ तुमचा शब्द म्हणून मी माघार घेतली असती, पण तसं करायचा मला अधिकार नाहीं. सनातनी सांप्रदायाच्या नम्र सेवकाला शोभेल अशाच परंपरेनं मला गेलं पाहिजे. मी व्यक्ति म्हणून तुमची शिष्टाई मानीत नाहीं असं नव्हे; अंत्यज आज फक्त देवळांत शिरून दर्शनापुरती संगत मिळवतील व एक पंगत करा म्हणून पुन्हां धरणं धरतील. पंगतीचें पर्यवसान आमच्या अधोगतींत होईल. पतितांचा उद्धार करण्याइतकं तेजोबल जर आमच्याजवळ नसेल, तर त्यांना जवळ करून स्वतःचा अधःपात ओढवून आणण्यांत कोणता शहाणपणा आहे ? म्हणून ही अनर्थाची परंपरा टाळण्यासाठीं आमचं मन आज आम्हांला घट्ट करून अतिशूद्रांचा देवालयप्रवेश बंद केलाच पाहिजे. ( पडद्यांत नौबदडंका वाजतो; रणशिंग फुंकलें जातें. )

**गौरी**— ऐका ! भैरव, लढाईचं पाचारण करणारा हा रणवाद्यांचा नाद ऐका !

( गुंजारव प्रवेश करतो. )

**गुंजारव**— भैरव आपला नाद सोडीत नाहींत काय ? मग काय शिष्टाई संपली ! गौरी, तटस्थांच्या भूमिकेशिवाय आपल्याला आतां दुसरी जागाच नाहीं.

**भैरव**— गौरी, हें लढाईचं आव्हान आम्हांला स्वीकारलंच पाहिजे. ( पुन्हां पूर्ववत् आवाज ) देवळाचा बंदोबस्त करण्याकरतां मी तांतडीनं जात आहें यावद्दल मला क्षमा करा. ( भैरव जातो. )

**गुंजारव**— गौरी, भैरवाचं मन वळत नाहीं.

**रमणगौरी**— भोळ्या रामासमोरचा रणसंग्रामही पण टळत नाहीं—असो परमेश्वराची इच्छा !

**गुंजारव**— तेहतीस कोटी देवांच्या विविधस्वरूपांत विहार करणाऱ्या हिंदूंच्या परमेश्वरा, काय हा अंधळ्या कोशिंबरीचा खेळ मांडला आहेस ?

**पद.**

**दारुण दैव निशा भवासी कां चढली ।**
**मांडुनि खेळ हि घोर भूतलीं, वनमाली ॥ ध्रु० ॥**
**वानी, वेद व्यासादिक कीर्ति । दलिता ठाव पदीं देसी ।**
**ब्रीदा गाती गायक । जडचर उद्धरि हो वाली ॥ १ ॥**

चलायचं गौरी; आपण पक्षपाती नाहीं; प्रेक्षक म्हणून लढाई पहायला मुळींच हरकत नाहीं. ( जातात. )

---

## प्रवेश ५ वा.

[ **स्थळ**—महारवाडा, अंत्यजांच्या झोंपड्या. ]

[ खुल्या मैदानावर कवाइत चालली आहे. स्वयंसेवक स्काऊटड्रेस करून, निशाणें घेऊन उभे आहेत. चंदन व हिम्मत कमांडरच्या पोषाखांत मुजरे घेतात.]

**हिम्मत०**— चंदन, हें तुझं स्वयंसेवकांचं पथक पाहून लष्करी अधिकारी देखील

घाबरतील! मग भोळ्या रामाच्या मंदिराची नाकेबंदी करणाऱ्या पोटभरू जादूगारांची भीतीनं बोबडी वळली तर त्यांत मुळींच आश्चर्य नाहीं.

**चंदन**-- पहिली घडी साधून हल्ला चढविला पाहिजे. प्रवेशद्वार बंदच असणार; तेव्हां तटावर चढून आंत उतरावं लागेल व तेव्हांच काय ती धनचक्की माजणार. प्रतिपक्षाला जखमी करण्यासाठीं नव्हे, तर स्वतःचा बचाव करण्याकरतांच स्वयंसेवकांच्या हातांतील लाठ्या फिरत्या रहातील.

**हेडस्काऊट**--त्याबद्दल तुम्ही बेफिकीर असा. आमचेच भाईबंद सामनेवाले आहेत ही जाणीव ठेऊनच आम्ही स्वयंसेवक प्रत्येक पाऊल टाकूं.

**स्काऊट असिस्टन्ट**— आमच्या पावलापावलागणिक आम्ही रामनामाचा गजर करूं, म्हणजे धर्मयुद्धासाठीं आम्ही जात आहोंत याचा आम्हांला विसर पडणार नाहीं व त्यामुळें आमच्या अंतःकरणांत क्रोधाला थारा मिळणार नाहीं.

**हिम्मत०**—शाबास, माझ्या बालवीरांनो शाबास! अहिंसेचं असिधाराव्रत पतकरून पतितांचा उद्धार करायला निघालेल्या तुमच्या पथकाला हिंदमातेचा शुभाशिर्वाद असो; पण ही पहा, रमणगौरींच्या स्वरूपात भारतमाता तुम्हांला आशिर्वादाचा निरोप द्यायला, आपल्या बंधुराजाला बरोबर घेऊन इकडेच येत आहे.

(रमणगौरी व गुंजारव येतात. स्वयंसेवक त्यांना प्रणाम करतात.)

**रमणगौरी**— सर्वांचं मंगल होवो!

**गुंजारव**— सदा धर्मवीर विजयी असोत!

**चंदन**—आम्हां दीनांच्या दुनियेंत आपल्या चरणांची गंगा वाहवून आम्हां पतितांना आपण अगोदरच पावन करून घेतलं आहे. निरोप द्यायच्या वेळीं आपण आलांत, आम्हांला कोण आनंद झाला ह्मणून सांगूं?

**गुंजारव**— तंटा मिटता, तडजोड होती तर आम्हांला त्याहूनही अधिक आनंद होता. पण काय?

**रमणगौरी**—आपलेच दांत नि आपलेच ओठ. रडायचं कुणाच्या हटवादीपणाबद्दल नि लढायचं कुणाबरोबर? याचा मुळीं उलगडाच होत नाहीं. शिपाईची

कमाल केली, पण अखेर हातघाईवर प्रकरण जायचं तें गेलंच. शूद्र अतिशूद्र वगैरे नसलेले व अंत्यज आणि तत्सम असलेले—यांची ही आपापसांतील यादवी, भोळ्या रामापायीं आहे म्हणून ती दोघांनाही उपकारक ठरो !

**हिम्मत०**—काय ठरायचं असेल तें ठरो; सामोपचार संपल्यावर, शांततेच्या —अत्याचारालाच आवाहन केलं पाहिजे.

**चंदन**— आम्हीं जर अतिप्रसंग केला नाहीं, तर हजारों वर्षांपासून चालत आलेली हेळसांड दूर करायला, आज स्वर्गांतून देव का धांवत येणार आहेत ?

**गुंजारव**— स्वतःची दानत व दर्जा सुधारण्याकरतां जर तुम्हीं धांवपळ केलीत, तर तुमच्या मदतीला देव देखील धाऊन येतील.

**चंदन**— हिम्मतराव, तुम्ही, गौरी वगैरेसारख्या देव माणसांची मदत असल्यावर देव आले नाहींत तरी चालेल. आम्हां सर्वांना भोळा राम दिसावा म्हणून कांहींजणांना आज ' राम ' म्हणण्याची पाळी येते कीं काय न कळे !

**हिम्मत०**— साऱ्याच धर्मयुद्धांचा इतिहास रक्तानें रंगलेला आहे; सलोख्यानं धार्मिक क्रान्ति घडून आल्याचा दाखला नाहीं.

**रमणगौरी**— मनोभावानं देवदर्शनाला जाणाऱ्यांचा वर्ग दिवसानुदिवस कमी होत चालला; आधुनिक शिक्षणामुळं देवधर्मावरला विश्वास उडत चालला; म्हणूनच कीं काय आजपर्यंत फक्त उच्च वर्णीय लोकांच्या नजरेखालीं बेजार झालेले भोळ्या रामासारखे देव, अंत्यजांच्या दर्शनाची अपेक्षा करूं लागले. अभिनव भक्तांच्या भावभक्तीची आवड, रामाच्या मनांत उत्पन्न झाली. त्याबरोबर देवळांत घुसण्याची महत्त्वाकांक्षा, अतिशूद्रांच्या मनांत उद्भवून तिनें आज मूर्त स्वरूप धारण केलं.

**चंदन**— देवांनींच बुद्धि दिली—त्यांनींच दर्शनाची उत्कंठा वाढविली.

**गुंजारव**— सगुण देवाची उपासना करतांना देवांच्या परी करून भक्त आपलं समाधान करून घेतो; मग त्याच त्याच भक्तांची अंधपूजा स्वीकारण्याचा वीट आल्यामुळें, विटाळ मानलेल्यांना जवळ करण्याकरतां आज प्रत्यक्ष भोळा राम देऊळ सोडून महारवाड्यांत यायला निघाला आहे. स्वयंसेवकांनीं त्याला फक्त सामोरे जायचं आणि आणि इथं घेऊन यायचं. देव नसलेल्या त्या रिकाम्या देवळांत जीर्ण स्मृतीपलीकडे आतां कांहीं उरलं नाहीं.

**हिम्मत०**— अजून अभिमान उरला आहे, उच्चपणाचा उन्माद आमच्या रोमरोमीं मुरला आहे. मग अणुरेणूंत भरलेल्या ईशाचं आजचं मनोगत ओळखण्याची कुवत आमच्या जन्मजात चढेल मनाला कुठून राहील ? अतिशूद्र, अंत्यजांना हेटाळणं, व त्यांचा विटाळ मानणं, हा आम्हां श्रेष्ठ हिंदूंचा जन्मसिद्ध हक्क आहे, व त्याचीच आत्मघातकी बजावणी देवळाच्या उत्पन्नावर पोसलेले पुजारी आज करूं पहात आहेत !

**चंदन**— आधींच गांवाबाहेर आम्हांला टाकून दिलेलं. शिक्षणाची ओळख नाहीं. आमचेच धर्मबांधव आमच्या वाऱ्याला देखील न उभे राहणारे. सार्वजनिक असलेल्या विहिरी, तलावांवर देखील आम्हांला पाणी पिण्याची बंदी. गांवाला नदी असली, तर सगळ्या गांवाच्याखालीं, आमचा पाणी भरण्याचा न बांधलेला घाट ! एकदोन दिवसांचे आणि एकदोनच हाल असले तर त्याचं वर्णन करतां येईल. ही आमच्या कुचंबणेची कर्मकहाणी आम्हीं चारचौघांना सांगायला सुरवात केली, आमचा रोग आम्हीं वेशीवर बांधला. हिम्मतरावासारखे जिव्हाळ्याचे बांधव आमच्या सहाय्याला धांवून आले, ही देवाचीच कृपा नाहीं का ?

**गुंजारव**— तुम्हां अंत्यजांचा वनवास संपला. भूताखेतांची व शेंदूर लावलेल्या दगडाधोंड्यांची पूजा करण्याची प्रवृत्ति जाऊन तुम्हांला देवालयांत जाऊन वेदमंत्रांनीं प्राणप्रतिष्ठा केलेल्या सगुण देवतांची उपासना करण्याची आवड उत्पन्न झाली, ही क्रान्ती तुमची उन्नति केल्याशिवाय राहणार नाहीं.

**रमणगौरी**— रेघोट्या न ओढलेल्या धुळ-पाटीप्रमाणं तुमचीं मनं स्वच्छ असूं देत, व त्यावर स्वच्छ, सुंदर व आजच्या परिस्थितीनुरूप उन्नतिकारक अशा मोजक्या धड्यांचंच लिखाण होऊं देत. अधुनिक सुधारणेच्या नांवाखालीं मोडणाऱ्या अनेक दिखाऊ व टाकाऊ प्रकारांचं अंधानुकरण तुम्हीं केव्हांही करूं नका !

**गुंजारव**— पुराणकालची नीतिमर्यादा आम्हीं सुधारणावाद्यांनीं ओलांडली; स्त्रीपुरुषांच्या नैसर्गिक भेदापलीकडे रहाणाऱ्या इतर सर्व फरकांची आम्हीं फारकत केली. समानतेच्या सामन्यांत चुरस लागून स्त्रीजात वाढत्या प्रमा-

णावर किंबहुना प्रमाणाबाहेर विजयी होत आहे. पाश्चात्य समाजांत लग्न-संस्थेला कीड लागून, तिचं जवळजवळ प्राणोत्क्रमण झालं आहे. लग्न म्हणजे संस्कार असा आमचा समज–त्याचा झाला करार; व करार जाऊन आतां फक्त देहसुखापुरता विहार उरूं पहातो आहे. माझ्या अंत्यज बांधवांनो, या सुधारणेच्या सांखळींत तुम्ही अडकून पडूं नका–हा चाललेला नंगा नाच आम्हांला प्रलयाकडे ओढीत आहे; जिवाचं मोल देऊन, आर्यसंस्कृतीचा तोल सांभाळण्याचं काम आतां तुमच्याकडे आहे हें लक्षांत ठेवा.

**चंदन**— महारवाड्यांतले महारमांग, ढोर, चांभार वगैरे विटाळलेले जीव म्हणजे तुमच्या दारींचे दरवेशी; आर्यसंस्कृतीच्या अमोल भांडाराचे मालक–तुम्ही उच्चवर्णाचे कुबेर ! तुमचा तोल आम्ही कसा सांवरायचा ?

**रमणगौरी**— यांत तुम्हांला आश्चर्य वाटायला नको; आमची पुण्याईची दौलत, आमच्या उधळभमकेपणामुळें खर्च झाली. दया, क्षमा वगैरे दैवी गुणांचा झरा निदान सामुदायिक स्वरूपांत तरी आटला. पतित व्हायला आणखी कांहीं सामुग्री लागत नाहीं. तुमचा उद्धार आतां तुम्हीच करायचा आणि जमल्यास आमच्या अधःपतनाला तुम्ही आळा घालावयाचा. देवालय-प्रवेश करून, तुम्ही अंत्यज आज आमचाच खराखुरा उद्धार करीत आहांत.

**चंदन**— रूढीचा बंदिवास आम्हांला बाधला व तुम्ही उच्च वर्णाचे बांधवही पण त्यानें बांधले गेले आहांत. आमच्या प्रयत्नांमुळें दोघांचीं बंधनं तुटावीं, व जिवाशिवाच्या भेटीचा अद्वैतानंद दोघांनाहि मनमुराद लुटायला मिळावा, हीच माझी एक इच्छा आहे.

**हेडस्काऊट**— सूर्यनारायण बराच वर आला; आपल्या कोमल किरणांचा हार करून त्यानें या भगव्या निशाणाची पूजा केली; आपणही त्याचं वंदन करूं, भूमातेला नमूं आणि ठरल्याप्रमाणें, भोळ्या रामाच्या देवळाकडे जायला निघूं !

**चंदन**— ठीक आहे; सर्वजण शिस्तीनें उभे रहा. ( तसें करतात ).

**हेडस्काऊट**— बा निशाणा, तूं आमच्या जागृतीची जागती ज्योत आहेस; तुला शतशः प्रणाम असोत. ( तसें करतो. )

**चंदन—** पतितांचा बंदिवास संपला, त्यांच्या उन्नतीचा उदयरवि, हा पहा नुकताच उगवला. प्रयत्नांचा पाठीराखा परमेश्वर—नव्हे निःस्वार्थी प्रयत्न म्हणजेच परमेश्वर! त्याचें आपण मनोभावें स्तवन करूं, आणि मग हातीं घेतलेल्या कार्याला लागूं.

पद.

**संग्राम शांततेचा। अश्राप अंत्यजांचा**
**रूढी निबंध जाचे। समता अभाव साचा॥**
**छळितो विधर्म पाल। स्वजनां दया न माया॥**
**भूदेव आर्य धर्मी। मानी विटाळ आमुचा॥**
**वेदांत ग्रंथि नाहीं। अस्पृश्य भेद वाचा॥**
**देवा विटाळ कैचा। त्या पक्षपात कैचा॥**
**आत्मोन्नती कराया। उदयाचलीं जगाच्या॥**
**जय राष्ट्रदेव बोला। झेंडा प्रणाम बोला॥**
**सत्याग्रहे दिसावा। कैवल्याधाम आमुचा॥**

(पडदा पडतो.)

(दुसरा अंक समाप्त.)

# अंक ३ रा.

## प्रवेश १ ला.

( स्थळः— हिम्मतरावाचें घर— गजरा आपल्या कपड्यालत्त्यांचें गांठोडें बांधीत आहे. )

**गजरा**— ( उठून उभी रहाते ) झालं–सामानसुमान बांधलं. इथून आतां जायचं असं माझ्या मनानं घेतलं. बापाच्या घरीं रहावं तरी किती दिवस ? आज दोन दिवस झाले–बाबा आपले महारवाड्यांत ! त्यांचं घराकडे पाऊल नाहीं. काळजी करायला मी घरांत आहें याची त्यांना आठवणही नाहीं; दौलतीबाळाचा पुसतपास करायला त्यांना वेळ नाहीं. बाबा, तुमचा पतितोद्धाराचा नाद खुशाल पुरवा; पण घरप्रपंचाकडे कांहीं तरी लक्ष द्यायला नको का तुम्हाला ? गोरस कपाळीं लाऊन ते गेले–बाबा मी आतां आपल्या घरीं चाललें–पतिगृहीं जातांना तुमचा निरोप न घेतां मी गेलें, म्हणून, रागाऊं नका हो माझ्यावर—

( दुर्मुखा येते. )

**दुर्मुखा**— काय चाललं आहे गजराबाई–आणि स्वारी कुठें निघाली आहे ? गांवाला ? तें गांठोडं कसलं बांधलेलं दिसतंय् ?

**गजरा** — बाहेर निघतांना हें असं विचारून तूं अपशकुन केलास दुर्मुखे. लौकिकी मानाला मी मुकलें; सासरीं जायला मी निघालें; जातांना, अपशकुनाचा डाग द्यायला कशाला बरं आलीस ? मला तुझा राग आला !

पद.

**क्रोप मजसि येई बहु । भेदित मम हृदय दाहि ॥ ध्रु० ॥**
**नाथसदनिं निघतांना । अशुभ कशी वेळ पाहि ॥**
**गोरस मम निटिलीं लावी । बंधनिं हा गे फसवि ॥**
**पत्नीपदीं मज बसवी । लोटि गहन कालडोहीं ॥ १ ॥**

**दुर्मुखा**— काय सांगतेस हें गजरे ? तूं सासरीं चाललीस ! फाजील चवकशी-

बद्दल मी तुझी क्षमा मागतें, पण सांग तुझं लग्न कधीं झालं ? चार पावलांवर मी रहातें–आम्हांला कांहीं कळलं नाहीं. मग परगांवीं का झालं ?

**गजरा**— परगांवीं काय म्हणून–इथें या घरांत झालं. कुणाला कळलं नाहीं; म्हणून माझं लग्नच झालं नाहीं कीं काय ?

**दुर्मुखा**— नाहीं ताशा ना वाजंत्री; मांडव बोहल्याची उभारणी दिसली नाहीं, मंगलाष्टकांचा नाद अगर पै–पाहुण्यांच्या गर्दी–धांदलीचा पडसाद देखील आम्हां शेजाऱ्यापाजाऱ्यांना ऐकूं आला नाहीं. मग कानाला कोन न लागतां, पावलाची चाहुलसुद्धां न येतां, तुझं लग्न झालं म्हणतेस–कोण बरं विश्वास ठेवील ? गजरे, तूं माझी थट्टा करतेस गडे. तुला अपशकुन करायला मी आलें नाहीं. माझं लग्न ठरलं म्हणून तुला आमंत्रण द्यायला आलें.

**गजरा**— स्वतःच्या लग्नाचं आमंत्रण स्वतःच का देतात वेडे ? पण–पण काय ! आपल्या लग्नाचं आमंत्रण आपणच देणारी ही वेडी; आणि बापाच्या गैर-हजेरींत लौकिकाला गुंडाळून ठेवून, पतीच्या हातावर स्वतःच उदक सोडणारी मी शहाणी बायको आहें कीं काय ? दुर्मुखे, मी भांबाऊन गेलें आहें. त्यांच्यावर विश्वास टाकला–विवाहाच्या आधीं विश्वास टाकला ! ही स्वतःची फसवणूक तर नव्हे ना ?

**दुर्मुखा**— गजरे, कसलं ग हें गौडबंगाल सांगतेस ? वेड्यासारखी माझ्याकडे अगदीं टक लाऊनशी पहातेस ?

**गजरा**—अग मी वेडीच आहें, म्हणून तशी पहातें हो ! पण तुझं लग्न केव्हां ? कुणाबरोबर होणार–सांग सांग पाहूं सारं ! तुला मी बोलावलं नसलं तरी तुझ्या लग्नाला येणार.

**दुर्मुखा**—अग म्हणून तर मी सांगायला आलें. सावित्रीबाईनीं स्थळ आणल्य; मी होकार दिला. झालं, लग्न ठरलं आणि ही अशी गांवांत चार दिवस आमंत्रण करीत फिरतें आहे.

**गजरा**— अग पण मुहूर्त कधींचा ?

**दुर्मुखा**—उद्यां संध्याकाळचा–गोरज. जातें बाई मी. अजून कित्ती कित्ती तरी आमंत्रणं करायचीं आहेत.

**गजरा**—थांब कुंकूं लावतें. (गजरा करंडा आणायला म्हणून आंत जाते.)

**दुर्मुखा**—गजरेच्या लग्नाचा कांहीं तरी घोंटाळा आहे; नाहीं तर कुठें गुपचिप का लग्न लागतं !

पद

गणा जगती शुभ हा सुंदरा ॥ ध्रु० ॥
प्रेममिलन विधि । नियमित अंकित ॥
सुफलित वधूवरां ॥ १ ॥

(गजरा येते व कुंकवाच्या ऐवजीं दुधाचा टिळा तिला लावते.)

अग हें ग काय गजरे? कुंकवाच्या कामांत मला नाहीं हो थट्टा खपणार !

**गजरा**—हेंच माझ्या घरचं कुंकू! अशी रागाऊं नकोस. माझ्या कपाळीं हेंच त्यांनीं लावलं ! तेंच वाण मीं पुढें चालविलं !

**दुर्मुखा**—(रागानें) मी आल्याबरोबर माझ्यावर रागावलीस; तुझाही पण मला संताप आला. लग्नाचं आमंत्रण द्यायला मी आलें; पण कुंकवाच्या ऐवजीं दुधाचा चटका कपाळीं लाऊन घेऊन अपशकुनी म्हणून परत चाललें. गजरे, चांगली केलीस हो माझी बोळवण. बोलवायला आल्याचं हें मला प्रायश्चित्त मिळालं ? तुला तरी काय बोल लावायचा ? (जाते).

**गजरा**—आणि मी तरी दैवाला बोल कशाला लावूं? लग्नासारख्या महत्त्वाच्या बाबतींत मी एकटीनंच विश्वास टाकला, मला एकटीलाच त्याचा शेवट लावायला पाहिजे. करावं तसं भरावं हें खरं नाहीं का ? जगांत पाऊल टाकतांना श्वासाची सुरवात व परत अनंताकडे जातांना विश्वासाची आणि त्याबरोबर त्या प्राण्यापुरती विश्वाची अखेर. अशा वेळेला सोबत कोण असणार ? (जाते.)

## प्रवेश २ रा.

[ स्थळः--भोळ्या रामाचें देऊळ-प्रवेशद्वार-देवळाचा तट व त्यावर सोडलेले मुकटे, धाबळ्या, पंचे वगैरे. खालीं नदीचें पात्र वहात आहे असा देखावा. ]

( अंगरखा पागोटं घातलेला व उपरणें कंबरेभोंवतीं कसलेला वामदेव देवळाच्या प्रवेशद्वारावर हातांतली काठी खांद्यावर ठेवून पहारा करीत आहे. )

**वामदेव**-- ( इकडून तिकडे फिरतो ) चांगला सवापावशेराचा शिरा खाऊन देवळासमोर पहारा करतों आहें--मी जिवंत आहें; आणि महारडे म्हणे देवळांत शिरणार ! फुकटचंच असेल हें काम. वास्तविक आजच या वामदेवाचं लग्न लागायचं, विधुरपणाचा विटाळ जायचा; पण काय ? तब्बल दुनियेंत विटाळ-चंडाळ कालवायला निघालेली ही महारी कचकच, आजच झाली सुरू. सावित्री-बाईनें माझ्यासाठीं शोधलेलं सनंग म्हणजे कांहीं पुरणपोळी नव्हे कीं ती शिळी होईल ! आजची ही वेळ निभली कीं उद्यां मी मोकळाच आहें ती खायला. महा-रडे कांहीं चोरून देवालयप्रवेश करणार नाहींत व राजरोसपणें उद्यां स्वतःच लग्न लावून घेतल्याशिवाय मीही पण रहाणार नाहीं, ( मेघांचा गडगडाट होतो, विजा चमकतात. ) अरे बापरे, हें काय ? मेघमंडळांत ही गडबड कसली ? ते-ते दोन काळेकभिन्न मेघ हमरीतुमरीवर येऊन शिवीगाळ करून बडबडायला लागले--तोच हा गडगडाट. आतां ते एकमेकांला बडवतील व आसपासच्या मित्रमंडळीसह रडतील ! मेघमंडळांतील या महामूर्खांची रडारड म्हणजेच तप्त-भूमीला शांत करणारी पाऊस--पड. ही पहा इकडे बिजली देखील चमकली.

( सावित्रीबाई येते. )

**सावित्री**-- असे थबकलांत काय म्हणून वामदेव ? मी कुणी परकी कां आहें ! आतां तुमची सासू झालें !

**वामदेव**-- बिजलीबाईची वरच्या अंगणांतली चमक आणि तुमची नजर-

फेक–यांचा एकदम मारा झाल्यामुळें मी चपापलों, आणि थबकलों. कबूल करतों मी. सावित्रीबाई मी होतों पहाऱ्याच्या नादांत; वर हे काळे ढग आले आणि तुमचा प्रवेश इतका एकदम झाला कीं, सावित्रीबाई वर आकाशांत जाऊन चमकल्या आणि वीज खालीं पडली–अस्सं मला वाटलं !

**सावित्री**— असलं कसलं बाई वाटणं–विचित्र नाहीं का तें ! पण जाऊं दे मेलं; माझी लग्नाची सारी तयारी झाली; आजच चांगला मुहूर्त. पण हीं तुमचीं भांडणं मधें आलीं. जळ्ळीं मेलीं भांडणं तीं. भांडणाचं तोंड काळं म्हणतात. भल्यानीं नाहीं ग बाई कधीं भांडूं.

**वामदेव**— मग हें दार उघडून, सोडूं का सगळ्यांना देवळांत ! महार, मांग, धेड सारी अठरापगड जात, थेट भोळ्या रामाच्या अंगावर सोडून जातिभेद नाहींसा करूं म्हणतां !

**सावित्री**— छे ग बाई–मी कसं तसं सांगेन ?

**वामदेव**— तसं कसं सांगेन, तर न भांडून तरी आमचं कसं निभेल ? भांडण करूनही वर आम्हीं भलेच राहणार–समजल ना सावित्रीबाई !

**सावित्री**— काळच बाई कठीण आला खरा. अठरापगड जात नर देवाच्या अंगाला भिडायला लागली तर मूर्तीला विटाळ नाहीं का होणार ? भीडभाड न ठेवतां अशा वेळीं पाहिजे ग बाई भांडायला. वामदेव, चांगले कसून–कसून भांडा. पण धोतराची कास घाला— रोजच्यासारखा सोगा नाहीं कामाचा. आणि कासोट्याची काळजी घ्यायची म्हटलं—नाहीं तर भांडणाच्या दंगलींत—

**वामदेव**—बऱ्याच कीं आहांत सावित्रीबाई ! पण मी कांहीं पोकळ कासोट्याचा नाहीं. वीर आहें वीर !

**सावित्री**— शिरावरचं पागोटं तेंच सुचवीत आहे. लढाईच्या वेळेला तें उतरून ठेवणार ना ? नाहीं तर—

**वामदेव**—नाहीं तर काय ?

**सावित्री**— तुम्ही वीर–तुकतंच हें मीं ऐकलं; तेव्हां शीर राहील सलामत आणि शिरस्त्राण उडून जाऊन करील गम्मत. म्हणून म्हणतें कीं तें अगोदरच काढून ठेवायला हवं.

**वामदेव**--बोडक्यानीं लढणं हा अपशकुन आहे--तेव्हां डोक्यावरच्या पागोट्या.ला मला ढक्का लावतां येत नाहीं.

**सावित्री**-- तेंही खरंच; नाहीं तर अन्यायफट झालेल्या त्या तुमच्या पुळगुळीत गोट्यावर लाठीमार मिळाला, तर 'राम' म्हणावं लागेल आणि माझ्या चरणीच्या लग्नाला अपशकून होईल; पण तें असो; महारमांग यायला नि आंत घुसायला, अवकाश असेल; तोंपर्यंत मी देवदर्शन करून येतें. उघडा पाहूं तें कुलूप.

**वामदेव**--तोंड बंद करा या बाबतींत. कुणालाही आंत सोडायचं नाहीं म्हणून भैरवनाथांची मला-सक्त ताकीद आहे.

**सावित्री**-- जुलूमच झाला म्हणायचा हां; पण हें-हें काय वामदेव ? देवळाच्या तटावर हीं धुणीं कसलीं वाळताहेत ? मुकटे, पंचे, धाबळ्या--बाई बाई बाई ! आज देवळांत सहस्रभोजन तर नाहीं ना ?

**वामदेव**--भोळ्या रामाचं रक्षण करण्याकरतां हा धाबळ्यामुकट्यांचा आम्हीं लोंबता कोट उभा केला आहे.

**सावित्री**-- कुलूप दाराला, नि सोवळीं सोडलीं आहेत तटाला. विटाळ करून कांहीं महारमांग आंत शिरायचे नाहींत-हाच किनई तुमचा कयास ?

**वामदेव**— अहो, म्हणूनच मीं ही युक्ति काढली.

**सावित्री**— चांगलं केलंत-वामदेव, या युक्तीनं पेशवाईच्या शेवटचं, अगर शेवटच्या पेशव्यांचं नांव गाजविलंत खरं. पण या साऱ्या नाकेबंदींत एक उणे-पणा अजून राहिला.

**वामदेव**--तो कोणता ?

**सावित्री**— एक सोंवळी बाई समोर उभी करा—म्हणजे सारे महारमांग माघार खातील—पण अगबाई पावलांची चाहूल आली—आले ग आले सारे खवीस विटाळ कालवायला--

( बगुअय्या, पिलुअय्या, बच्चय्या वगैरे तेलंगी भट लांब काठ्या घेऊन येतात. )

**वामदेव**---वा ! खूप केलीत सावित्रीबाई-या साऱ्या तेलंग्यांना महारांत ढकलून—

**सावित्री**— ( हंसते ) चुकलें–साफ चुकलें. ऐकूं आली खरी मला महाराची चाहूल–पण अंगावर येऊन धडकली तेलंग्यांची हूल. पण काय हो वामदेव, सारं तेलंगण सैन्यभरतीकरतां लुटलेंत वाटतं ?

**वामदेव**— हो, ते सारे नेहमींचे धर्ममार्तंड–आज धर्मवीर झाले आहेत. आणि हें पहा, यांना नावं ठेवलेलीं खपायचीं नाहींत. तेलंगी तिखट असतात. त्यांत हे कानडी, वैष्णव–यांना मराठी येत नाहीं म्हणून बरं ! नाहीं तर तीं पाहिलींत कां त्यांच्या हातांतलीं शस्त्रं ?

**सावित्री**— शस्त्रं !– असलीं हो कसलीं शस्त्रं ? मला तर लांब लांब काठ्या दिसताहेत. अस्सं–आत्तां आलं माझ्या लक्षांत–धुणीं वाळत घालायच्या व काढायच्या या लांब काठ्या घेऊन तटावर टाकलेलीं सोंवळीं काढायला हें तुमचें तेलंगण जमलं आहे वाटतं !

**वामदेव** — काय चमत्कारिक बायको आहांत ? अहो, तें तुम्ही म्हणतां तसं नाहीं. हे तेलंगी लढायला आले आहेत लढायला !

**सावित्री**— मग लाठ्या आणायला पाहिजेत बरोबर; लांब काठ्या नव्हे. सांगा तसं त्यांना कीं लाठ्या लहान असतात म्हणून !

**वामदेव**— हा लहान तोंडी मोठा घांस होतो आहे. पण यांना मी परत कसे पाठवूं ? यांची पाठ फिरली, आणि शत्रूचं सैन्य आलं तर मग ? मग कसं होणार ? त्याला तोंड कोण देईल ?

**सावित्री**— मी देतें; तोंडाचा तोफखाना, शिव्यांची सरबत्ती सारखी सुरू करतें ! बघतें पुढें कसं पाऊल टाकतात तें !

**वामदेव**— अशी लढवय्यी बायको पाहिजे; मग देवाचंच काय राष्ट्राचंसुद्धां रक्षण होईल. ( स्वगत ) विधवा नसती तर ' वीर प्रसू–भव ' म्हणून तोंडभर आशिर्वाद दिला असता. ( उघड ) ही पहा तेलगी तोंडं गुडगुडायला लागलीं– ( तेलंगी एकमेकांत बोलतात ) सावित्रीबाई, यांना लढाईची हालचाल शिकवा. तोंपर्यंत मी तोंड मिटून जप करतों. ( जपाची माळ काढतो. )

**सावित्री**— आमचे पुरुष हीं असलीं वेळीं–अवेळीं जपाचीं सोंगढोंगं केव्हांही करीत नसत. ते हयात होते, तेव्हां धर्म केवढा होता म्हणून सांगू

वामदेव ! त्यांनीं जानव्याची गांठ दाखविली कीं ब्रह्मसमंध देखील दूर पळत !

**वामदेव**— ते दिवस गेले–गायत्री मंत्रांनीं पावन केलेल्या जानव्यांचं तेज लोपलं. महारांच्या मुंजी लागून, जनावरांच्या गळ्यांत जानवीं घालण्याचा काळ आला आहे ! अहो, भविष्य पुराणांतलं भविष्य मला लख्ख दिसूं लागलं. गाई–गोऱ्हे, म्हशी–रेडे यांचीं लग्नं लागतील आणि माणसं मात्र जनावरांच्या परा-कोटीला जाऊन पोहोंचतील !

**सावित्री** — महारामांगांची दौड भुतासारखी अचानक येईल आणि धुम-श्चक्री सुरू होईल. त्यांच्यापुढें जपमाळ घेऊन पुराण का सांगणार ? हे तेलंगण शिस्तीनें उभे करा–इथें कांहीं दक्षिणेचा घोळका करायचा नाहीं !

**वामदेव**— तुम्हीच व्हा ना आमच्या सेनापति ? सावित्रीबाई, सैन्याची नीट मांडणी करा आणि शत्रूला थोपवून धरा. शूर म्हणून भैरव तुमची पाठ थोपटतील.

**सावित्री**—वामदेव, संभाळा बरं, नीट सावध रहा ! मला नाहीं तुमची घडगत दिसत. तुम्ही पुरुषांसारखे पुरुष–माझ्यासारख्या विधवेनं कां सैन्याचं पति व्हायचं ? मग तुमची पत ती काय राहिली ? महारांची काठी सुरू झाली, कीं तुमच्या आणि या तेलंग्यांच्या पाठीचीं धिरडीं होतील ग बाई धिरडीं !

**वामदेव**— सत्तावन सालीं शिपायांचं बंड झालं; त्यानंतर हें आतां महारा-मांगांचं बंड होत आहे. त्या वेळेला झांशीच्या राणीसाहेबांनीं टोपीवाल्याविरुद्ध लढून आपलं नांव गाजविलं; सावित्रीबाई, तुमचं आख्यान पुढच्या पिढीच्या बायकापुरुषांनीं वाचावं अशी तुम्हांला संधि आली आहे. तेलंग्यांना हाताशी धरून महारांना तोंड द्या–धर्मलंड झालेल्यांची बत्तिशी पाडा ! हं, शिकवा पाहूं या सैन्याला हालचाल ?

**सावित्री**— ठीक आहे ! वामदेव, तुम्हां सर्व सैन्याची मी सेनापति झालें; आमची स्वारी मोठी हौशी होती. लगीन झाल्यावर, लाठी बोथाटी, फरीगदगा वगैरे मर्दानी खेळ मला त्यांनीं सारे शिकवले, त्याचा थोडाबहुत उपयोग आज होतो आहे म्हणायचा. घ्या ती लाठी इकडे. जरा लांब उभे रहा वामदेव–ह्या

तेलंग्यांचा चक्रव्यूह रचतें (त्याप्रमाणें तेलंगी उभे करते.) हं, ही पहा हल्ला करायला अशी लाठी चालवायची.

( सावित्री लाठीचे हात; चौफेर करून दाखवते; वामदेवाच्या अंगावर गेल्यावर तो घाबरतो. )

**वामदेव**— ( घाबरून ) अहो, थांबा, थांबा सावित्रीबाई !— महार समजून मलाच मारतां कीं काय ? का म्हाकाली तुमच्या अंगांत संचरली ?

**सावित्री**-- समजलं ना कसे हात फिरवायचे ते ? वामदेव, घ्या ही लाठी फिरवा पाहूं !

**वामदेव**-- छे, नको ! तुम्हीच फिरवा; माझं डोकं फिरलं, मला तुमच्या लाठीचा फेर पाहून चक्कर आली. तुम्हीच घ्या महारांचा समाचार- चांगला खरपूस घ्या. तेलंग आहेतच तुमच्या मदतीला.

**सावित्री** — हें काय वामदेव ? आम्हीं लढायचं आणि तुम्ही काय करणार ?

**वामदेव**-- म्हणे काय करणार ! अहो हें काय विचारतां ? मीही आहेंच; पिछाडी नको का संभाळायला ?

**सावित्री**— तुम्ही स्वतःला संभाळा म्हणजे झालं; मी तेलंग्यांना लाठी शिकवतें; हं ही अशी फिरवा अं ?

( तेलंगी वेडीवांकडी लाठी फिरवतात-ती त्यांनाच लागते. सावित्री व वामदेव हंसतात-अय्य- यो म्हणून तेलंगी ओरडतात. )

**सावित्री**-तशी नव्हे उलटी-ही अशी लाठी धरायची आणि मग फिरवायची.

( सावित्री पुन: लाठी फिरवून दाखवते भैरव प्रवेश करतो. )

**भैरव**— ( थक्क होऊन. ) हें काय ? वामदेव, असं घाबरून काय बघतां ? आणि मारामारीच्या वेळेला इथें ह्या बाई ! बाई का बुवा हे ! कारण अवतार तर मर्दानी !

**वामदेव**— त्या आपल्या सेनापति झाल्या आहेत— रणशूर आहेत. दूर व्हा नाहीं तर त्यांची लाठी लागेल.

( सावित्रीबाई लाठी फिरवायची थांबविते. )

**सावित्री**—देवाचे पुजारी इतका वेळ देवपूजेंत का गुंतले होते ? भैरव,

लढाईचा अगदीं कडेकोट बंदोबस्त आहे. महार येण्याचाच काय तो अवकाश !

**भैरव**-- मुळींच नाहीं. ऐका तो आवाज; रणशिंग फुंकीत व भेरी वाजवीत तें पहा महारांचं सैन्य येत आहे.

( पडद्यांत, भेरी, शिंग, नौबत वगैरेंचा आवाज होतो. )

**वामदेव**— देवाची सारी लाज आतां सावित्रीबाई तुम्हांला –

**सावित्री**— ती मी संभाळतें; तुम्ही प्रवेशद्वाराजवळ थांबा. भैरव, तुम्ही या माझ्यामागें, आणि हे तेलंगी राहूं दे ओळीनें उभे. हें पहा शत्रुसैन्य आलं !

( "हर हर महादेव– बोलो भोला राम की जय" वगैरे ओरडत, स्वयंसेवक, चंदन, हिम्मत वगैरे येतात. लाठी घेऊन सावित्री सर्वांच्यापुढें ऐटीनें उभी रहाते.)

**सावित्री**— खबरदार एक पाऊल पुढें टाकाल तर ! या माझ्या लाठीला सामना देणारा वीर तुमच्यांत असेल तर येऊं दे त्याला पुढें !

**हिम्मत०**— विधवेला पुढें उभी केलीत, तरी आम्ही अपशकून मानणार नाहीं समजलांत ! आम्ही सरळ देवळांत जाणार, मग काय व्हायचं असेल तें होवो ! एक सोक्ष नाहीं तर मोक्ष !

**भैरव**— अगोदर एकेकाचा कपाळमोक्ष ! त्यांतूनही कुणी उरलेच, तर त्यांची उचलबांगडी करून, त्या समोरच्या वहात्या प्रवाहांत त्यांची रवानगी !

**चंदन**-- हेडस्काऊट, हरहर महादेव बोला आणि सरळ निशाण घेऊन पुढें चाला !

**सावित्री**— मी वाटेंत उभी--विटाळ करतां कीं काय मला ? यांना कांहींच कीं हो ताळतंत्र नाहीं ? अग बाई अंगावर आले ! लाठी फिरवलीच पाहिजे.

( तसं करते. )

**हिम्मत०**-- भ्याड शिखंडींनो, चामुंडा मावशीला पुढें करून आमची अडवणूक करतां होय ? पण बायकांबरोबर लढणारा वीर आमच्यांत नाहीं. तुमच्यांत कुणी पुरुष नाहीं कीं काय ? लढाईपुरते उसनवार पुरुष हवे असले तर आम्ही देतों !

**भैरव**— चूप बस ! नादान, ती तुझी लांब जीभ आवरून धर. नाहीं तर—

**हिम्मत०**— नाहीं तर काय ? भ्याड तो भ्याड आणि ऐट पहा कोरडी !

**भैरव**— थांब, तुझी नरडीच दाबतों. ( हिम्मतच्या अंगावर धांवतो. )

[ बोला हरहर महादेव म्हणून एकच गिल्ला उठतो. भैरव व हिम्मत लढतात; सावित्री लाठी फिरवते; तेलंगे वेडेवांकडे हातवारे करतात. वामदेव व चंदन यांची झुंज होते. वामदेवाचें पागोटें पडतें तरी तो लढतो. स्वयंसेवक, देवळाचें कुलूप फोडतात व हरहर महादेव करतात. हिम्मत भैरवाला खालीं पाडतो. चंदन वामदेवाला त्याच्याच उपरण्यानें बांधतो. ]

**सावित्री**— ( ओरडते ) धांवा, धांवा, महारडे घुसले ग बाई देवळांत ! मला दिखील शिवले; तटावरचीं सोवळीं विटाळलीं ! सारा विटाळ कालवला !

[ पोलीस धांवत येतात. ]

**इन्स्पेक्टर पोलीस**— तंटा बंद करा; देऊळ आम्हीं ताब्यांत घेतलं.

**स्वयंसेवक**— बोला ' हरहर महादेव ! '

**भैरव**— ( हिम्मतला उद्देशून ) माझ्या सात जन्मींच्या दुष्माना, जिवांत जीव असे तों तुझा सूड घेईन ! तुझा सूड घेण्यासाठींच जगेन; मला खालीं पाडून माझा अपमान केलास !–तुला खालीं पहायला लावीन तरच मी नांवाचा भैरव.

**सावित्री**— देवा नारायणा, तुलाच रे आतां डोळे. हे महारचाळे पहाण्यापूर्वी मला ' राम ' म्हणू देत. ' बोला राम, राम राम '

( पडदा पडतो. )

---

# प्रवेश ३ रा.

[ **स्थळः**— सावित्रीबाईचं घर. चरणी प्रवेश करते. ]

**चरणी**— नवऱ्याची बायको व्हायला मी साफ तयार नाहीं. आईला काय होतं माझं लग्न ठरवायला ? किफायतशीर भावांनीं वधूवरांची बाजारविक्री करून देणारा तो वामदेवभट ! आई काय त्याच्या नादीं लागली आहे कांहीं कळत नाहीं ! आईनं मला नवरा पाहून ठेवला, म्हणून मी नोकरी सोडूं कीं काय ? हृदयांत प्रेम उत्पन्न झालं, त्यावेळीं प्रियकर भेटला नाहीं; आणि आज



इ० पोलीसः— तंटा बंद करा. देऊळ आम्हीं ताब्यांत घेतलें.

[ पृष्ठ ५४ ]

मला वरायला आई पति आणीत असतां, माझ्याजवळ प्रेम उरलं नाहीं. अवेळ झाली–हृदयांतल्या हृदयांत प्रेमकलिका कोमेजून गेली !

पद.

**वहर नुरत नव मज न जरा । अजि साचा ।**
**रमण शून्य मन प्रणय विरत हृद्–हा नच वरा ॥ ध्रु० ॥**
**सहचरविरह मज न भासतसे । राही जीवांत नित्य शांत ।**
**नुतन छंद नितांत मोद वरि । स्वैर वाही झरा ॥ १ ॥**

देवदर्शनाला जातें म्हणून आई बाहेर पडली. अजून तिचा पत्ता नाहीं. मला कामाला जायला उशीर होतो. कोर्टांतलीं कामं कशीं झालीं तरी वेळेवर झालीं तर उपयोग. पण आई आल्याशिवाय घर उघडं टाकून जाऊं तरी कशी ? महारांच्या भांडणांत तर आई नाहीं ना सांपडली ? मग कसची येते ती लवकर. तरी मीं बजावलं.कीं आज देवदर्शनाला जाऊं नको, तंटा होणार आहे म्हणून.पण ती कुठली ऐकायला ? पण ती पहा पावलांची चाहूल आली, दार वाजलं; कोण येतंय् वरं ? ( सावित्री लगबगीनें येते. )

**सावित्री**— अग काय सांगू तुला–भोळ्या रामाच्या देवळाबाहेर लढाई झाली. महार आले, मी त्यांच्या बरोबर लढलें आणि त्यांना परत लावलं !

**चरणी**— होय का ? मोठा शूरपणा गाजवला आमच्या आईनं म्हणायचा !

**सावित्री**— अग पण ते मला विटाळ करून गेले. डोक्यावरून पाणी नको का घ्यायला ? चरणे ऊठ, चूल पेटवून पाणी तापव अगोदर.

**चरणी**— पाणी तापवायला मला वेळ नाहीं ! ही मी निघालें ऑफिस-कडे. कामाची कोण खेंच आहे. घटस्फोटाची एक कैफीयत लिहायची आहे तर दिवसाढवळ्या एका पुरुषावर हल्ला करून त्याची बे–इज्जत केल्याबद्दल एका मुरलीवर फौजदारींत दावा गुदरायचा आहे. तुझं पाणी तापवायला मी फुर-सत कुठली काढूं ?

**सावित्री**— नोकरीवर मुलीं आतां जायचंच नाहीं; एकदम आतां सासरीं. चरणे, कोर्टाची पायरी चढण्याचं आतां काय कारण आहे ? अगदीं उद्यांच्या तिथीला तुझं लग्न व्हायचं.

**चरणी**— तें मुळींच होणं नाहीं. मी रमणगौरी वकीलांची कारकून रहाणार; आणि अभ्यास करून एक दिवस परीक्षेला बसणार नि स्वतः वकील होणार. आई, लेखणी टाकून फुंकणी हातांत घ्यायला मी साफ तयार नाहीं. तूं काय वाटेल तें म्हण.

**सावित्री**— अग पण लग्न मोडलं तर तें वामदेव मला म्हणतील तरी काय? तुला कांहीं चाड आहे का त्याची? तें कांहीं नाही. मझ्याजवळ गमज्या नाहीं हो चालायच्या.

**चरणी**— ( हंसते ) म्हणजे तूं करणार तरी काय? मी जर नाहीं म्हणतें तर लग्न कुणाचं लावणार?

**सावित्री**— तुझं! समजलीस? लाठी फिरवून देवळासमोर महारांचा हल्ला परतवून मी इतक्यांत आलें. तुझा शिरजोरपणा मी चालूं द्यायची नाहीं. वकीलाची कारकून म्हणून, कोर्टांत मिरवत असशील; पण नवऱ्यासमोर बसवून तुला वरातींत मिरविल्याशिवाय मी नाहीं रहायची!

**चरणी**— आई, का दावेदारीण? 'पति' मी नको म्हणतें, आणि तो माझ्या गळीं बांधतेस! म्हणावं तरी काय तुला? पण पुरे झाली हुजत. नदीवर आंग धुऊन ये, तोंपर्यंत मी आलेंच बघ गौरीच्या घरून. ( जाते. )

**सावित्री**— काय मस्तवाल कारटी आहे पहा! तश्शी मला विटाळांत टाकून गेली. आतांशा किती बोलते–टाळ्याला टिपरूं लागत नाहीं तिच्या. नाहीं तर कोण मेणघुणी असे ही? नाकावरची माशीसुद्धां उठायची नाहीं तिच्या; पण आतां तीच चरणी नाकावर माशी बसूं देत नाहीं. कोडतकचेरी म्हणजे बोल-घेवड्यांचा बाजार; तिथें ही रोज असायची, मग लांब जीभ सहाजिकच होणार तिची. तें कांहीं नाहीं, अश्शी तिच्या पाठोपाठ जातें, धरून आणतें आणि बोहोल्यावरच उभी करतें आज संध्याकाळचा आंत. एकदां लग्न करून सोडली कीं, मग मोकळी सोडायला मुळींच हरकत नाहीं. ( जाते. )

---

## प्रवेश ४ था.

( **स्थळ**— पंढरपूरच्या वाटेवर पाठीवर. पडशी, पायांत वहाणा व हातीं भगवी पताका—कपाळावर स्वच्छ पांढरा टिळा, अशा वेषांत गजरा प्रवेश करते. )

**गजरा**— अखेर माझ्या विश्वासाचं वीष झालं अं! मला त्यांनीं टाकली. कपाळावर तो तसा पांढरा डाग देऊन, आज मला " तोंड काळं करून कुठंही जा ". असं म्हणाले! मी माझ्या नायघरीं गेलें, पण त्यांनीं मला घालवून दिली. मग आतां जायचं कुठं परत? बापाच्या घरीं? छे. पंढरीनाथा, पतितांना, व पतीनं टाकलेल्यांना, तुझ्याच पावन पदांचा आधार म्हणून तर मी तुझ्या गांवाला निघालें. अनाथांच्या नाथा, असंख्यांचा उद्धार तूं आजपर्यंत केलास, मग तुझ्या नामाशिवाय आतां मला कुणाचा बरं आधार? अबलांनो—विश्वांतल्या साऱ्या अबलांनो! या गजरेची पतितावस्था पहा व विवाहाच्या आधीं पुरुषावर विश्वास टाकूं नका. विवाहबंधनाचं कंकण हातांत बांधलं जाण्यापूर्वी, पुरुषांवर विश्वास टाकणं म्हणजे अन्नाला विष घालून ठार मारणं होय. मीं पवित्र मनानं भैरवांना प्रेम अर्पण केलं—त्याची माती झाली. लग्नापूर्वी माझा संसार संपला, भरंवशाची राखरांगोळी झाली. मी आडरानांतून एकटी चाललें. मग या गगनांतल्या तारका कां बरं माझ्याकडं पहाताहेत? तारकांनो, कशाला बरं माझ्याकडे पहातां? माझ्या पापाची पडछाया तुमच्यावर पडेल, आणि पृथ्वीतलावर ' गारगोट्या ' म्हणून तुमचा पात होईल. उगीच काय म्हणून स्वतःला धोक्यांत घालताहांत? काय नाहीं ऐकत? तुमच्या पवित्र तेजोकिरणानं माझं पाप धुवून काढतां होय! थोर आहांत! उदार आहांत; उदार आत्मे दयेचं दान करतांना तुमच्यासारखीच देहाची फिकीर करीत नाहींत! मीही तुम्हांला भेटायला लवकरच येणार आहे. माझ्या मानगुटीवर बे—अब्रूचं भूत, समोर कुलटेचा उलटा मार्ग सवंध मोकळा; सासरच्या सुखाची स्मशानयात्रा संपली—मग कोणत्या सुखासाठीं मी रेंगाळून राहूं? पुंडलीकाच्या परमेश्वरा, तुमच्या भरंवशावर मी पंढरीला निघालें! पोटांत पापाची खाण आणि राहीवरा हातांत तुझं निशाण! ही गजरा देहानं पतित पण मनानं पवित्र आहे! जवळ आल्यावर दूर नाहीं ना करणार?

पद.

जपतसे बालिका स्वयें शुद्ध शिलाला
परि तिला न पालनवाला ॥ ध्रु० ॥
विश्वास ठेविला विषमय सारा झाला
योग्य मी होत पतनाला ॥
अविवाहित मी, का विधवा; 'कुलटा' या कमवी नामा
घनश्याम श्रीधरा येतें आज मी तव गांवा ॥
द्या थारा या दिनेला ॥ १ ॥

(जाते.)

---

## प्रवेश ५ वा.

(**स्थळ**— भोळ्या रामाच्या देवळाचा एक भाग. वामदेव व राघव बोलत आहेत.)

**वामदेव**— कसला आला आहे भोळा राम! खरं सांगतों राघव, माझ्यावर " राम " म्हणायची पाळी आली होती! आई आई ग; हाड नि हाड दुखतं आहे! (इवळतो) काय द्वाड जात त्या महारड्यांची. माझी कणीक कांहो तिंबली. पण मी नाहीं सोडलं त्यांना आंत. तो चंद्र्या, कुणाला ठाऊक कोणच्या जातीचा आहे. मला पहिल्याप्रथम शिवला! राघव, सर्वांच्या अगोदर तो मला शिवला! मग विटाळ नाहीं का झाला?

**राघव**— तुमच्या हातांत काठी होतीना! मग ती त्याच्या टाळक्यांत कां नाहीं घातलीत?

**वामदेव**— माझी काठी हिसकून त्यानं माझं पागोटं उडवलं.

**राघव**— आणि डोक्यावर पागोटं नसतं तर?

**वामदेव**— बोडक्यानें लढून मी त्याला अपशकून केला असता. राघव, अगदीं भारतीय युद्धासारखी रणधुमाळी माजली होती. अहाहा! काय तें सावित्रीबाईचं शौर्य! वर्णन करायला श्रीवेदव्यासांनींच पुन्हां अवतार घ्यायला हवा!

**राघव**— काय ! सावित्रीबाई लढल्या ? मग तुम्ही पुरुषांनीं काय कांकणं भरली होतीं कीं काय !

**वामदेव**— वेडा आहेस राघव ! अजून बच्चा आहेस. तुला जगाचं ज्ञान नाहीं. सावित्रीबाई आणि एखादा पुरुष यांत कांहींच फरक नाहीं. त्यांचे पुरुष गेल्यापासून, घरांतल्या कर्त्या पुरुष त्याच. त्यांचं युद्धकौशल्य पाहून आपले तर डोळे दिपून गेले. आणि त्याच डोळेदिपींत, चंद्न्यानें पागोट्यापासून माझं डोकं वेगळं केलं.

**राघव**— आणि डोक्यापासून देह वेगळा करता तर भोळ्या रामाच्या लढाईंत धारातीर्थीं पडलेला ' विधुर-वीर ' म्हणून तुमची कीर्ति झाली असती !

**वामदेव**— विधुरपणाचा कलंक घेऊन हा वामदेव मरणार नाहीं समजलास ? वेड्या राघवा, मरायच्या वेळेला शिराजवळ बसायला आणि शव बनल्यावर ऊर फोडून रडायला, बायको नको का ? चतुर्भुज झाल्याशिवाय मला मरतां येतच नाहीं !

**राघव**— मग आतां माझं कसं होणार वामदेव ? ठरल्याप्रमाणें तुमचं लग्न होईल उद्यां पण मी कुमार राहणार अशी भीति वाटते.

**वामदेव**— ती कां ? भीति काय म्हणून ? सावित्रीबाईच्या चरणीबरोबर तुझं लग्न मीं जुळवलं आहे. आपण दोघेही एकाच सुमुहूर्तावर चतुर्भुज होणार.

**राघव**— तुम्ही व्हाल कदाचित्; त्या सावित्रीबाईच्या चरणीनं रसणगौरी वकिलांच्या इकडे नोकरी धरली आहे. ती झाली आहे कारकून आणि आतां लग्न करणार नाहीं म्हणे. मीही तिथेंच नोकरीस होतों. पण दुसरी नोकर दुर्मुखा इचं माझं न पटल्यामुळें मीं राजीनामा दिला. मग माझ्यासारख्या नोकरीचाकरी नसलेल्याच्या हातांत ती कारकुनी पेशांत नटलेली नवरी आपला हात कसचा देते ! वामदेव, आतां माझा डावा हात घ्या झालं उजव्या हातांत आणि म्हणा शुभ लग्न सावधान !

**वामदेव**— ( तसें करतो ) शुभ मुहूर्त सावधान !

( भैरव येतो. )

**भैरव**— कुणाचं लग्न लावलं ? वामदेव, इथें नवरी नाहीं मग ' शुभ मुहूर्त सावधान ' कुणाचं केलंत ?

**वामदेव**— ( हंसतो ) अहो, या राघवाचं. याला नोकरी नाहीं आणि नवरीही मिळत नाहीं. मग त्याचाच डावा हात आणि त्याचांच उजवा हात— घातले एकमेकांत व वर मंगलाष्टकांचा मारा केला आणि हा एकतर्फी लग्न-समारंभ उरकून घेतला !

**राघव**— कोर्टांत नाहीं कां एकतर्फी हुकूमनामे होत ? मग लग्नाच्या बाब-तींतही सामनेवाल्यांची उणीव काय म्हणून भासावी ? ह्यापुढें लग्नाच्या सिव्हिल प्रोसिजर कोडांत ही कायमची दुरुस्ती करण्यांत येत आहे कीं, एक बाजू आणि भट ( मग ती वराची असो नाहींतर वधूची असो ) इतकी सामुग्री असली कीं, ठोकून देतों ऐसा जे करायचं नि ' शुभ मंगल ' बोलून ' सावधान ' उरकायचं !

**भैरव**— वहावा राघव, बहार केलीस बुवा. लग्नाची ही एकहाती सुट-सुटीत कल्पना पुढें टाकल्याबद्दल, तुला एक नवरीच बहाल करायला हवी !

**वामदेव**— अहो, मीं अगोदरच केली होती. ती चरणी नाहीं कां सावि-त्रीबाईंची ? तीच याला द्यायची होती.

**भैरव**— मग ! माशी कुठें शिंकली ?

**वामदेव**— अहो, त्या पोरटीनं नोकरी धरली आहे ना ? रमणगोरी वकि-लांची ती कारकून बनली आहे, आणि आतां लग्न करायला नाहीं म्हणते.

**भैरव**— चांगलं करते. हुशार दिसते पोरगी.

**राघव**— वा, फारच शहाणे दिसतां आपण ! लग्न जमवून मोडायचं, दुसऱ्याचा हिरमोड करायचा, असल्या वागणुकीला ' चांगलेपणा ' म्हणतात वाटतं ! खासा न्याय करतां बोवा. वामदेव चला, माझ्यावर हा अन्याय झाला आहे. त्याच्यावर इलाज करण्याकरतां कायदेपंडिताची सल्ला घेऊं.

**वामदेव**— भैरव, मी जातों. कारण ही पडली लग्नाची भानगड व त्यांत मी आहें मध्यस्थ, तेव्हां मला गेलंच पाहिजे. जाण्यापूर्वी माझ्या लग्नाचं मी आमंत्रण देऊन जातों. उद्यां गोरज मुहूर्तावर आपले सरसेनापति सावित्रीबाई यांच्या आंगणांतल्या मांडवांत, वामदेव चतुर्भुज होणार आहे. दुर्मुखेबरोवर त्याचं लग्न लागणार. तरी अगत्यानं यायला चुकूं नये. ( राघव व वामदेव जातात. )

**भैरव**— हें लग्नाचं आमंत्रण कीं मुर्दाडपणाची दौंडी? काय, वामदेव या वयांत लग्न करतो आहे? याला वेड तर नाहीं लागलं? पण त्याच्या वेडाशीं मला काय करायच आहे? घरीं आलेल्या गजरेला तिच्या असहाय स्थितींत हाकून देऊन, माझ्या दंऱ्यावर घेण्याच्या सूडाची मी सुरवात तर केली. भोळा राम भ्रष्ट करायला निघालेल्या हिंमत्याची गजरा जर मुलगी नसती, तर मी तिला अंतर दिलं नसतं. पण—पण काय? मला खालीं पाडून त्यानं माझा अपमान केला! माझ्या देवळासमोर मला धूळ चारली. मग वैन्याच्या कुळाची कीर्ति, अब्रूचा दिवा लाऊन गजरेच्या रूपानें धूळ खात गेली तर त्याची पर्वा ह्यापुढें मीं काय म्हणून करावी?

पद.

**न्याय दान साचें झालें, ती पति मानी या जना ॥ ध्रु० ॥**
**रोष सहज ये अपमानानें**
**जरि अर्पियले शुद्ध मनानें**
**प्रेम सहज त्या मनरमणीनें**
**कुला मलिन करि, अंगना ॥ १ ॥**

( जातो. )

---

## प्रवेश ६ वा.

( **स्थळः**— पंढरपुरच्या अनाथगृहाजवळचा रस्ता. गजरा हातांत गुंडाळलेलें मूल घेऊन येते व तिच्या बरोबर एक उत्पात येतो. )

**गजरा**— आश्रम अजून किती लांब आहे? भटजी—नाहीं मी तुम्हांला बाबा म्हणणार. येईना राग आला तर. मला काय त्याचं शुभ नि अशुभ!

**भटजी**— अरेरे काय बिचारीची स्थिति झाली आहे,! पहा, जवळ जवळ. इला वेड लागलं आहे. हें बघ मुली, तूं मला खुशाल बाबा म्हण! मी तुझा बाबाच अं.

**गजरा**—बाबाच तुम्हीं माझे? मग मी तुमची मुलगी झालें तर! पण मला

हें काय झालं ! बाबा बघितलंत का याच्याकडे, या माझ्या जिवाच्या कलिजाकडे ? गुलामा हंसतोस काय मला—माझ्याकडे पाहून हंसतोस नाहीं का ? अगबाई, पण मी निघालें कुठें ? इतक्या थंडीची रात्री बेरात्री हा माझा सोनुकला घेऊन कुठं बरं चाललें ? सांगा कींहो बाबा आपण कुठं चाललोंत तें.

**भटजी**— आश्रमाकडे आपण चाललोंत. हा पहा आश्रम आलाच.

**गजरा**—खरंच हो खरंच, बाबा आला कींहो आश्रम. माझ्यानं नाहीं पाऊल उचलत. चालून इतक्या लांब चालून मला श्रम झाले, मी थकलें.

**भटजी**—मुली, तूं दमलीस, मी कुठं नाहीं म्हणतों. पण हें बघ अनाथगृह दोन पावलांवर आलें. तूं जा पुढें. मला येतां येणार नाहीं. तो पहा दरवाजा, त्यांतून आंत जा. आंत उजेड आहे व तेथेंच समोरच्या भिंतींत पाळणा लावला आहे. तुझ्या बाळाला त्या पाळण्यांत निजव व जवळच असलेली घंटा वाजव म्हणजे एक दाई येऊन तुझ्या लाडक्याची व्यवस्था नीट करील. समजलीस ना काय करावयाचें तें ? जा लवकर परत ये कशी. मी येथेंच तुझी वाट पहात उभा आहें.

**गजरा**— लाज वाटते कां असं सांगायला ? म्हणे माझ्या बाळाला पाळण्यांत निजवायचें व मी परत जायचें ! चल जा येथून. माझ्यासमोरून जा. चालतें व्हा ! मला नाहीं लागत कुणाची सोबत. माझा बाळ आहे मला. त्याला एकट्याला टाकून देऊं म्हणतां ? असं कसं हो मला शिकवतां ? तुम्हीं माझे बाबा, अंधाराचे तुम्हीं माझ्याबरोबर आलांत तें आहे माझ्या ध्यानांत. मला जर आश्रमाचा रस्ता नीट उमगता तर मी खचित हो तुम्हांला श्रम दिले नसते. पण—हें असलं वेड्यासारखं करायला मला काय म्हणून सांगतां ? आई आपलं बाळ एकटं टाकील वाटतं ? तुम्हीं आपले जा. नसती चाल गजरेला नका शिकवूं. मी आतां शहाणी झालें. पुष्कळच शहाणी झालें. चांगला धडा शिकलें ! मी आई ना या बाळाची ? अहो मी आईना या तान्हुल्याची ? बोला, असे दगडासारखे उभे काय म्हणून ? हें तर खरं, मी जर आई झालें ! होय गजरा आतां आई झाली आई ! आईनं आपल्या बाळाला कसं जिवापलीकडे सांभाळावयाचं हें तिला समजल्याशिवाय कसं राहील. बाबा, तुम्हीं इथें रहा किंवा जा !

**भटजी**—खास ! खास ! या मुलीला वेड लागलं. माझ्यानं हा प्रकार नाहीं

पहावत. पंढरीनाथा, विश्वाचा सारीपाट मांडतांना अनीतीचा भेसूर डाव कशाला वरं टाकलास? कोण हें सौंदर्य या गजरेचं! एकाद्या राजाची राणी शोभेल. पण देवानं पहा काय आणिलं आहे. मानवी पशूच्या विषयपाशांत सांपडून बिचारी फसली व कुळाची अब्रू गमावून बसली.

**गजरा**— खबरदार अब्रूची गोष्ट बोलाल तर! म्हणे अब्रू गमावून बसली! अब्रू कसली हो असते सांगा मला एकदां! मी आतां आई होऊन चुकलें–चुकलें कसची बरोबर आई झालें. बाबा, हा माझा बघा. तुमच्या मागच्या पडवींत मी बाळंतीण झालें; तुम्हींच ना माझी दया केलींत? या देवाच्या गांवांत दरवेशणी-प्रमाणें पहिल्या प्रथम मी तुमच्या घरीं आलें. तुम्ही पण नाहीं हो मला धुडकाऊन दिलीत. मला तुम्ही देवच. मग जा लवकर. उभे कां– मी नाहीं तुमचे उपकार फेडायची. गजरा आतां कुणाची कांहीं एक लागत नाहीं– मी व माझं बाळ– मी त्याचं वाटेल तें करीन. तुम्ही कोण मला सांगणार पाळण्यांत निजीव म्हणून!

**भटजी**— मुली, लवकर लवकर जा! व तुझं बाळ ठेव त्या पाळण्यांत. फार वेळ इथेंच जर थांबलों तर कुणी बघेल व भलतंच लचांड माझ्या मागें लागेल. जा बाळ, जा वरं लवकर!

**गजरा**— जा म्हणतां पण जाऊं कुठें? समोरच्या आश्रमांत जायला तुम्ही-सुद्धां मला सांगतांना? जातें तर, येतें मी. बेश्रम गजरा चालली. तुम्ही जा आणि असं साऱ्या बायकांना बजावून सांगा. देवा, जा गडे माझ्या समोरून एकदाचं! कहार झाला बाई! मी इतकी वाट चाललें तरी म्हणे माझी चालच वाईट— वांकड्या वाटेवर माझं पाऊल पडलं!! उगीच नांवं ठेवायचीं तर हवीं तेवढीं ठेवा! मी कांहीं कुणाला फसवलं का? मग माझ्या बाळाला आश्रमांतला पाळणा काय म्हणून? हो! तिथलाच पाळणा म्हणतां? अस्सं! लग्नाच्या आधीं अब्रू संभाळण्याचे श्रम गजरेला सोसले नाहींत, म्हणून तिच्या बाळाला आश्रमांतला पाळणा! बाळा, चल आश्रमांत चल; तुला गडे किनई मी पाळण्यांत निजवतें, झोका देतें. बाळाला झोका देतें झोका, जरा रहा बाजूला उभे– [ जाते. ]

( पडदा उघडतो. )

( सीनः— अनाथबालकाश्रमाची इमारत. भिंतीला पाळणा लावला आहे. पोर्चमध्यें बेल ( घंटा ) लावली आहे असा देखावा. )

झोका–झोका देतें–बाळाला झोका देतें ! बाळा, तूं शहाणा आहेस. मग नीट निजशील ना पाळण्यांत ? रडायचं नाहीं अं.–अंहं–अरे लबाडा रडायचं म्हणतोस होय अंहं. नाहींग बाळाला मी रडूं द्यायची बाबा माझ्या बाळाला कुठें आहेत बाबा ? हो आहेत तर काय–नाहींत असं नाहीं कांहीं. बाळाचे बाबा असावयाचेच–असले तर असूं देत–माझ्या बाळाला करायचं आहे काय त्यांच्याशीं ? नको अगदीं नको, त्यांची छाया देखील माझ्या बाळावर नको पडायला ! त्यांनीं माझ्या अब्रूला झोका दिला–खरं रे बाळा मी तुला सांगतें–, गजरेच्या अब्रूला चांगला धक्का बसला ! म्हणून तुला या आश्रमाचा पाळणा पहायला मिळाला. पण माझ्या अब्रूला धोका म्हणजे माझ्या प्राणाला झोंका नाहीं कांहीं ! आतां निजायचं अं ! ( मूल पाळण्यांत ठेवते. ) जाऊं, मी जाऊं–? आतां नाहीं हो यावयाची--पुन्हां नाहीं भेटायची- बाळा ! असा कशाला रे जन्माला आलास ? देवा, माझं बाळ तुझ्या स्वाधीन करतें--नजर ठेव हो त्याच्यावर— मुका घेतल्याशिवाय मी कशी जाईन— दोन शब्द–शेवटचे दोन गोड शब्द बोलायचेच मी बाळाशीं ! बोल बाळा, बोल रे ( मुका घेते. ) गोड कशालारे इतका तुझा मुका ? आई गेली, माझ्या बाळाची आई चालली. पण पाळण्यांत माझा प्राण अडकून राहिला ! सगळेजण जरी मला बोल लावतील तरी बाळ आईला केव्हां बोल लावीत नाहीं. म्हणून तर या बाल परमेश्वरावर माझा भरंवसा टाकून येथून जाण्याचें धैर्य माझ्या अंगांत संचरलं ! गजरा रडकी नाहीं– तेव्हां या रडव्या जगांत यापुढें तिचं तोंड कुणालाही दिसणार नाहीं– गेलें रे बाळा ! ( जाते. )

( पडदा पडतो. )

( अंक तिसरा समाप्त. )

---

# अंक ४ था.

## प्रवेश १ ला.

[ **स्थळ**—चंद्रभागेचा पूल—खालीं नदी वहाते आहे, असा देखावा.

गजरा प्रवेश करते. ]

**गजरा**—

पद.

**भेटलासी जीवा । पंढरीच्या राया**
**शुद्ध झाली काया । आज माझी ॥ १ ॥**
**सुखाच्या संसारा । मन विटयेलें ।**
**विटे देखियेलें शुद्ध ब्रह्म ॥ २ ॥**
**गजर नामाचा । गजरा करीते ।**
**वैकुंठासी येते । भेटीलागीं ॥ ३ ॥**

विठोबारायाच्या पायावर डोकं ठेवलं, मनाची सारी हुरहुर शांत झाली. देहाचा विटाळ गेला. बाळाला आश्रमांतल्या पाळण्यांत निजवून मी थेट चंद्रभागेवर आलें. वरच्या चांदणीचौकांतून, चंदाराणीचा डोळा चुकवून किती तरी चांदण्या माझ्याकडे पहाताहेत व लुकलुकत आहेत. बायांनो, या हतभागिनीला असं हसूं नये हो. मी निसंग झालें नसतें तर माझ्यावर आला असता का हा प्रसंग ? कुवारपणीं कुलाची अब्रू मीं घालवली—माझं तोंड काळं झालं. मग तें जगाला आतां कशाला दाखवायचं ? तुमच्या संगतीला मी येतें—मग कांहीं मला कुणी वाईट म्हणायचं नाहीं. वारकऱ्यांच्या वैकुंठेश्वराला मी स्पर्श केल्यावर पतित कशी राहीन ? बाई चंद्रभागे, तुझ्या लहरीच्या आंदोलनावर माझ्या जीवराजाला मी निजाविणार—माझी हृदयज्योत मी मालविणार. आश्रमांतला पाळणा बाळाला दिला; तुझ्या तरंगत्या पाळण्यांत मी झोंप घेणार. जिवाभावाची चंद्रिका आपल्या किरणांच्या दोरीनें मला झोंप येण्यासाठीं हा पाळणा सारखा हलवीत राहील बघ.

( चंद्रभागेच्या पुलावर चढते. )

बाबा, मला क्षमा करा; आई, आई, भेटशील ना मला वर? तुला भेटायला मी येतें. मी पुनीत झालें असलें तरी जग मला 'कुलटा' याच नांवानं ओळखणार-आई चंद्रभागे, आलें ग आलें-घे मला पोटांत. पुंडलीक वरदा हरि विठ्ठल!

(पुलावरून उडी टाकते.)

## प्रवेश २ रा.

[ **स्थळ:**— नदीकांठ. रागानें लाल झालेला हिम्मतराव प्रवेश करतो. ]

**हिम्मत०**— शेवटीं कारटीनं तोंडाला काळं फासलं! एकुलत्या एक मुलीची ही अशी अखेर व्हावी अँ? आठवण झाली कीं अंगाची कशी आग होऊन जाते! तो नराधम भैरव भेटला, तर त्याच्या नरडीचा घोट घेतों! भोळ्या रामाच्या देवळासमोर त्या दिवसाच्या चकमकींत मीं त्याला खालीं पाडला— जिवंत सोडला ही माझी चूक झाली. पण ही चूक लवकरच दुरुस्त केल्याशिवाय मी रहाणार नाही. गजरेच्या लग्नाबद्दल मी कसले सुंदर मनोरे बांधून ठेवले होते आणि तिच्या विधिलिखितांत हें असलं घाणेरडं लिखाण होतं! मानवपिशाच्चा, माझ्या गजरेचा एक वेळ खून केला असतास तर मला इतकं वाईट वाटलं नसतं रे! पण हें काय केलंस? कन्या ही कुलाची कीर्ति; तुझ्या पापी संसर्गानं ती मलीन करून टाकलीस. आमच्या कुलाचा कुलीनपणा ठार मारलास. अब्रूला आलेलं मरण मला सहन करवत नाहीं! देहाच्या खुनाबद्दल देहान्त प्रायश्चित्त; तर ह्या तुझ्या मुर्दाड दगलबाजीबद्दल तुला शिक्षा तरी कोणची करूं? हातांत सांपडलास तर तुला उभा चिरूं, पाय पकडून गरगर फिरवून तुला अस्मानात भुगारूं, जिवंत जाळूं कीं सांडसानं टोंचून गिधाडांकडून गिळवूं? कां सरळ मातींत मिळवूं? काय, करूं तरी काय? कोणती अमानुष शिक्षा करूं? तुझ्या जितेपणच्या निःश्वासांनीं ही सारी वसुंधरा विटाळून जाईल, अस्मान-ताऱ्यांचा-उल्कापात होईल; चंद्राला कायम ग्रहण लागेल व नक्षत्रमंडल करपून जाईल! हें असलं पाप मी नाहींसं केलं तर वस्तुजात मला दुवाच देईल. भैरवा, आतां तूं कुठें लपणार? तुझ्या पापाचा घडा भरला! हा पहा तुझा काळ वाट पहातो आहे!

( भैरव येतो. )

**भैरव**— बरा भेटलास. दुष्मन्, तुलाच शोधीत होतों. त्यावेळीं माझा अपमान केलास, मला खालीं पाडलंस, देव भ्रष्ट करण्याचा प्रयत्न केलास. भोग आतां आपल्या कर्मांचीं फळं !

**हिम्मत०**— ( त्याला ओढतो ) दोस्त, कसा अगदीं मरणाच्या मुहूर्तावर बिनबोभाट चालून आलास. बोल, तुला कच्चा खाऊं कीं चांगला तापवून वितळवूं ? आपल्या पापाची आठवण कर आणि त्यावरहुकूम शिक्षेचं माप पदरांत घे ! परमेश्वर न्यायी आहे व तें न्यायदानाचं काम मी करणार आहें.

**भैरव**— अहो न्यायाधीश, आपल्यापुढं मी आरोपी म्हणून उभा नाहीं समजलांत ? उभा दावा साधण्यासाठीं, अपमानाचा सूड उगवण्यासाठीं, तुझी गठडी वळवण्यासाठीं मी इथें आलों आहें. वेळही पण तशीच शांत लाधली आहे. तुझ्यामाझ्याशिवाय, तिसरा तिऱ्हाईत नसलेला हा सुंदर एकान्त, ही वहाणारी नदी, तीवर पडलेली संध्यारागाची छाया, तें पलीकडचं घनदाट अरण्य, हा क्षणोक्षणीं वाढणारा काळोख, या असल्या पार्श्वभूमीवरुन अज्ञात अनंताच्या भेटीला मी तुला पाठवणार आहें. हो तर मग तयार !

**हिम्मत०**— बदमाष ऐक ! बापाची बेटी तर तूं भ्रष्ट केलीस; उपवर कन्येच्या अभिजात शीलाचा जामदारखाना लुटून तूं दरवडेखोराच्या पदवीला तर पोहोंचलास; साध्या माणुसकीला मुकल्यामुळें एका निष्पाप पोरीला जगांतून उठविलंस. तुला ह्यापुढं जगांत जिवंत ठेवून, विश्वाची नैतिक हवा बिघडविण्याचा परमेश्वराचा देखील इरादा नाहीं. म्हणूनच त्यानं तुला माझ्या हातीं नेमका आणून सोडला. एक वेळ कालपुरुषाच्या हातून सुटतास, पण हा हिम्मत कठोराहून कठोर बनला आहे ! त्याच्या तावडींतून आतां तूं जाणार कुठें ? ह्यापुढं तुझी गय करायला मला वेळ नाहीं. चल आटप, घे देवाचं नांव !

**भैरव**— ऐट तर एखाद्या कडव्या सुलतानाची आणली आहेस खरी. पण कडू फळाला जन्म देणाऱ्या हिरवटा, तूंही पण आपली वटवट बंद कर व लढायला तयार हो !

**हिम्मत०**— भोळ्या रामाच्या उत्पन्नावर चरणारा तूं चिलट ! तुझ्यावरोबर रे दोन हात कशाला करायला हवेत ? अस्सा हातानं धरायचा ( तसं करतो )

आणि धरणीसातेवर लोळवून चिरडायचा ! ( हिम्मत व भैरव यांची झटापट होते; भैरवाला खालीं पाडून हिम्मत ठोसे मारतो. ) बोल, एक, दोन, तीन ! खेळ खलास ! तुझ्या पंचप्राणांचा लिलांव फुंकला. तीन वार करून तो कायम केला-( उठून ) सूडाचं समाधान मिळालं; पण माझं भ्रष्ट झालेलं कन्याधन, नष्ट झालेली माझी कुलकीर्ति- ती कशी परत मिळणार ? भैरव्या, अखेर मातीला मिळालास. पण थांब, ( रक्ताचा ओघळ वहातो ) ही माती तांबडी काय म्हणून दिसते ! अरे बापरे ! हें रक्त-रक्ताचा डोह ! अहो धांवा, धांवा! कुणी तरी धांवा ! हें काय झालं ? मीं केलं तरी काय ? हा खून-खून ! ही रक्ताची खूण. कोणी तरी धांवा हो ! डॉक्टरला घेऊन या. ( भैरवाला हलवतो, त्याच्या नाकाजवळ हात धरतो ) भैरव अजून जिवंत आहे--मीं खून केला-नाहीं-अद्याप नाहीं ! हें काय झालं माझ्या हातून ! डॉक्टर या हो, तुम्ही होऊन या आणि याचे प्राण वांचवा. काय नाहीं येत ? हा मी आलों तुम्हांला आणायला— ( वेड्यासारखा धांवतपळत जातो. )

[ एक गुराखी व त्याची बायको येतात. ]

**गुराखी**— अग ए, पाहिलंस का-काय पडलंय् त्यें--अक्षी तांबडी नदी वाहतीया !

**बायको**— ह्यो तर बाप्या दिसतुया मरून पडल्यावानी; अन् रगात नव्ह का ह्ये ?

**गुराखी**— पन् धुगधुगी हाय्-गचला नाय. चल उचल; ह्याला घेऊनशान आपल्या खोपटामंधी जाऊं व तथं त्याला उपाव करून बघुया; जगला तर जगल बी.

**बायको**-- अन् काय म्हूनशान गचल ? तुम्ही उचला तकडून; अन् मीं हत धरते याचं ड्वाकसं !

**गुराखी**-- " राम बोलो-" ' भाईराम ' ( पडदा पडतो )

( इतक्यांत हिम्मत, सर्जन गुंजारव व कांहीं पोलिस येतात. )

[ पुन्हां पडदा उघडतो. ]

**सर्जन**— कुठें आहे पेशन्ट ? हिम्मत, इथें फक्त रक्ताचे ओघळ दिसताहेत !



राघवः— अरे बापरे हा तर दुर्मुखा !    [ पृष्ठ ६९ ]

**पोलिस**— हा काय प्रकार आहे ? कुणाला दाखवायला व उपचार करायला सर्जनसाहेबांना इथें आणलंत ? बोला; असे भांबाऊं नका !

**हिम्मत॰**— काय सांगूं ? इथें कुणींच नाहीं ? भैरव ह्याच ठिकाणीं पडलेला होता-हें-हें रक्त सांडलेलें आहे-त्याचंच तें !

**पोलिस**— मग काय-तो भूत झाला कीं तुम्हीं गुन्हा केला ? काय खरं असेल तें कबूल करा.

**सर्जन**— मीहि तेंच सांगतों; भैरवाला कुणी ठार तर नाहीं ना मारला ?

**पोलिस**— बस्स; मला तोच संशय आहे; करा या इसमाला गिरफदार ! (पोलिस हिम्मतला गिरफदार करतात ) करा या जागेचा पंचनामा. डॉक्टर, तुमचीही पंचनाम्यावर सही पाहिजे. आरोपीला ठाण्यावर घेऊन चला.

**हिम्मत॰**— माझे पंचप्राण व्याकुळ झाले-करा, जलदी पंचनामा करा. हिम्मतच्या हातून खून झाला, म्हणून त्याला फांसावर लटकवा !

( सर्वजण जातात. )

---

## प्रवेश २ रा.

(**स्थळ**— सावित्रीबाईच्या, अंगणांतील लग्नमंडप- बोहलें; केळी लावलेल्या; आंब्याचीं तोरणें असा देखावा. मुंडावळ बांधलेला वामदेव, अंतरपाट धरलेले तेलंगी ब्राह्मण, राघव, चरणी, सावित्रीबाई, दुर्मुखा, रमण गोरी उभीं आहेत व ' शुभमंगल सावधान 'चा गजर होत आहे असा पडदा उघडतो. )

**भटजी**— तदेव लग्नं-सुदिनं तदेव । ताराबलं चंद्रबलं तदेव । विद्याबलं दैवबलं तदेव । लक्ष्मीपतेस्ते सुचिरं नमामि ॥ " शुभ लग्न सावधान " ( लोक अक्षता टाकतात, टाळ्या वाजवतात व अंतरपाट दूर होऊन, वधूवरें एकमेकांला माळ घालतात. )

**राघव**— ( घाबरून ) अरे बापरे ! ही तर दुर्मुखा, इच्या गळ्यांत माझी माळ चुकून पडली. हडळीचा गळफांस माझ्या गळ्यांत पडला. हें लग्न आपल्याला साफ कबूल नाहीं !

**सावित्री**— म्हणजे ? काय घोटाळा झाला ? चरणीचं लग्न बुढ्या वामदेवा-बरोबर लागून, दुर्मुखेनं राघवाला वरलं ! आणि मला फसवलं होय ? मीही साफ सांगते कीं मलाही पण हें लग्न पसंत नाहीं म्हणून. माझी चरणी त्या बुद्रु-काला मी कधींहि द्यायची नाहीं !

**वामदेव**— वा–खूा आहांत साविलीबाई–म्हणे मला लग्न पसंत नाहीं ! विचारतो कोण तुम्हांला आतां ? तुमच्याबरोबर कांहीं माझं लग्न लागलं नाहीं, म्हणून आतां तुमच्या पसंतीचा विचार करायचा ! जिला माळ घातली—ती चरणी माझी बायको झाली !

**चरणी**— आई, पसंत आहेत हो वामदेव मला. अग म्हातारा नवराच चांगला ! तुला कळत कसं नाहीं ! आहितगार असतो, चांगला मुठींत रहातो.

**सावित्री**— आणि लवकरच थंडगार होतो आणि बायकोला विधवा करून स्वर्गांत धूम ठोकतो ! वामदेव, मी पुन्हा बजावतें कीं, चरणी राघवासमोर उभी करायची ती चुकून तुमच्या पाटासमोर आली—सारी मेली लगीनघाई झाली ! मग हा चुकून लागलेला पाट, लग्न नाहीं हो धरायचं ! तुम्ही सांगा गौरी-वकील असाल पण द्या आतां निर्णय.

**रमणगौरी**— चूक झाली असली तर ती दुरुस्त करायला पाहिजे—आणि करतांही येते.

**चरणी**— पण बाईसाहेब, कायदा कसा विसरतां ? 'एकदां लागलं लग्न म्हणजे कायमचं लग्न.'– (once a marriage, always a marriage) चुकीमुळें लागलेलं लग्न नाहींसं होत नाहीं ! फक्त बळजोरी अगर लबाडी असेल तरच होतं.

**सावित्री**— मग वामदेवांची लबाडी आहे म्हणतें;—बळजोरी म्हणा, शिरजोरी म्हणा, काय हवं तें नांव द्या, पण वामदेवाला चरणी मी द्यायची नाहीं. भटजी, दुर्मुखेला वामदेवाला द्यायची ठरली होती, पण चुकून हें असं झालं, नवऱ्यामुलींची अदलाबदल झाली ! घाईत, ह्या म्हाताऱ्यापुढें दुर्मुखेऐवजीं माझी चरणी उभी राहिली. लहान का आहे घोडी असं चुकायला ? नवरा पाहून त्याच्यापुढें नीट उभं देखील रहातां येईना ! कशी ग बाई गत

व्हायची या आत्तांच्या पोरींची. तेव्हां सांगतें कीं, दुर्मुखेचं वामदेवाबरोबर व माझ्या चरणीचं राघवाबरोबर पुन्हां लग्न लावा. अंतरपाट धरा नि पुन्हा मंगलाष्टक म्हणा.

**राघव**— हा पुनर्विवाह मला कबूल आहे. सावित्रीबाई, या हडळीच्या तडाख्यांतून सोडवा व चरणी मला मिळवा.

**वामदेव**—राजवा, पुनर्विवाह मला पसंत नाहीं. माझी आपली चरणीच बरी.

**दुर्मुखा**— ( राघव चा हात धरून ) अहो बृहस्पती, म्हटलें या दुर्मुखेचे पति झालां आहांत पती. चाललांत कुठें? देवाब्राह्मणासमोर लग्न लावलेल्या नवऱ्याला मी वरी सोडीन !

**राघव** — रणमगौरी धांवा हो धांवा, आणि या गरीब बैलाला या द्वाडग्या गाईच्या हातून सोडवा.

**रमणगौरी** — ( हंसते ) कोर्टांत दावा लावा, म्हणजे सोडवतें !

**सावित्री**— भटजी, धरा म्हणतें ना अंतरपाट पुन्हां—माझ्या मांडवांत माझे हुकूम मानलेच पाहिजेत; नाहीं तर दक्षिणेच्या नांवानं—

**भटजी**— ठीक आहे; नवरानवरी उभे करा — नीट शिस्तीनें उभे करा. पुन्हां चूक करूं नका. आंब्यांवर नांव घालतात तसे नवरानवरीला नंबर द्या व लेबलं त्यांच्या कपाळाला चिकटवा. पुन्हा अंतरपाट धरायला माझे हात थोडकेच दुखताहेत. मात्र दक्षिणा दुबार द्यावी लागेल. आहे कबूल?

**सावित्री**— कबूल आहे मला; पुन्हा दक्षिणा देतें पण हीं लागलेलीं लग्नं बदला !

**राघव**— मीही तुम्हांला पुन्हा फी देतों भटजी, पण ही दुर्मुखा—ही मूर्तिमंत हडळ मला बिलगू पहाते ती दूर करा.

**रमणगौरी**— वेगळा दावा, निराळी फी. फेर अंतरपाट पुन्हा दक्षिणा—हा योग्य न्याय झाला.

**चरणी**— आई, पुरे नाहीं का झाला हा ब्रह्मघोटाळा? तरी मी मुलींच लग्न करीत नव्हतें, तें ऐकलं नाहींस; तुला बरं वाटावं म्हणून मीं अखेर कबूल

झालें, लग्नाला उभी राहिलें! तरी आपली पुन्हा तूं नाखुषच. अग झालं तें झालं–आपल्या पदरीं होता तो पति मिळाला. ह्या समाधानाच्या गोष्टी मी का तुला सांगाव्या?

**सावित्री**— काय कारटी आहे पहा चमत्कारिक–मलाच शिकवते आहे. म्हातारा नवरा मिळाला त्याचं इला कांहींच शुभाशुभ वाटत नाहीं!

**राघव**— भटजी माझा नंबर एक; चरणी नंबर दोन; ही हडळ दुर्मुखा नंबर तीन; वामदेवभट नंबर चार. नंबर एक व दोन व नंबर तीन व चार हीं जोडपीं जुळवा व म्हणा एकदां सावधान!

**रमणगौरी**— भटजी, नीट सावध रहा ह्या वेळेला, नाहीं तर पुन्हा चूक होईल या नव्या दस्तऐवजांत. नंबर एक व चार एक होतील आणि नंबर दोन व तीन मिळतील–आणि अखेर, चरणी–दुर्मुखा, व राघव–वामदेव, अशा जोड्या होऊन त्यांचीं लग्नं लागतील! म्हणून म्हणतें कीं, ह्या खेपेला मुळीं अंतरपाटच मध्यें धरायला नको; उघड विझिक मांडा व हा पत्त्यांचा डाव लवकर आवरा!

**राघव**— ही स्कीम ऊर्फ योजना आपल्याला अगदीं पसंत आहे. पुन्हा नंबर चुकून, एक चार झाले आणि वामदेव मला मिळाले तरी हरकत नाही! एक वेळ या म्हाताऱ्याला मी बायको म्हणून पतकरीन, पण ती कदाशिण दुर्मुखा–वाऱ्याला देखील नको!

**वामदेव**— वहावारे गम्र! हा पोरखेळ पुरे झाला. चरणी, आईला देवाब्राह्मणाला नमस्कार कर. ( चरणी तसें करते ) सासूबाई येतों अं आतां! ( सावित्रीचा निरोप घेतो ) चलाग्रचं आपल्या घरीं–नवरीचा हात धरून, हा वामदेव गृहप्रवेश करायला चालला! ( चरणीला घेऊन जातो. )

**सावित्री**— अग बाई, धांवा, धरा कीं त्यांना; नेली माझी पोरगी त्यांनीं; सगळ्यांच्या डोळ्यांदेखत नेली! वकील, पहातां काय नुसत्या? पकडा त्यांना म्हणतें ना?

**रमणगौरी**— मी कांहीं पोलीस नाहीं–त्यांच्यामागें धाऊन पकडून आणायला–हवं तर कोर्टांत या आणि लग्न–मोडीचा दावा करा. मग करीन मी मदत.

**सावित्री—** रमणगौरी, चला तुमच्या कचेरींत. करा माझी फिर्याद तयार. आजच्या आज कोर्टांत येतें, नि हळदीनं भरलेली मुलगी पळवून नेल्याबद्दल, वामदेवावर फिर्याद गुदरतें. मग काय व्हायचं असेल ते होवो.

**रमणगौरी—** चला; माझी ना नाहीं. भरपूर फी द्या. मग कांहीं का होईना कोर्टांत ! ( जातात. )

**राघव—** अरे बापरे–मेलोरें मेलों–नवरीच्या हातांत नव्हे तर मगरीच्या तोंडांत सांपडलों ! लग्नाला ' हो ' म्हणतांना माझ्या तोंडांत मारायला कोणी नव्हतं. पण आतां काय उपयोग ? चल–ब्रयाबाई चल, झालों आहे खरा तुझा दास–तूं आतां ठेवशील तिथें या राघवाचा वास–लग्न म्हणजे वनवास ! शुद्ध वनवास ! !

**दुर्मुखा—** ( राघवाचा हात धरून ) अहो नंबर एकचे–सोदे नव्हे पति, आणा तो हात इकडे; आणि आपली वरात या मांडवांतून बाहेर काढून, भर रस्त्यांतून मिरवून घरीं जाऊं या–चला.

पद

झणि मिरवित सदनीं जाऊनी
द्विज वचना मानुनी ।
कर ग्रहणीं बांधुनि ॥ ध्रु० ॥
बहु नटोनि थटोनि रिझवूं या
मद लुटोनि झुलोनि प्रणायें या
जादुगिरि मांडुनि संसारा थाटुं या ॥ १ ॥

( राघवाला धरून दुर्मुखा जाते. )

---

## प्रवेश ४ था.

( **स्थळ—** कोर्टाचें आवार. चंदन प्रवेश करतो. )

**चंदन—** अनर्थाचा हलकल्लोळ उडून गेला. पोटचं पाप झांकण्याकरतां तिकडे गजरा पंढरपूरला निघून गेली तर इकडे भैरवनाथाच्या खुनाच्या आरोपावरून हिम्मतच्या प्राणावर प्रसंग गुदरला. पोरीनं स्वतःचं मातेरं करून तोंड

काळं केलं म्हणून हिम्मत बे–भान झाला व त्याच भरांत भैरव त्याच्या हातीं सांपडल्यामुळें, हा असला प्रकार घडला. आतां या प्राणसंकटांतून हिम्मतला वाचवायचं तरी कसं? मॅजिस्ट्रेटपुढें त्याला उभा करून पोलीसांनीं त्याचा कबुलीजबाब घेतल्याचं कळतं. तें खरं असेल तर साराच ग्रंथ आटपला म्हणायचा! काय करावं कांहीं सुचत नाहीं. गजरा पंढरपुरीं आपल्या जिवाचं बरं वाईट करून घेईल, म्हणून तिला शोधून आणायला धांवूं, कीं हिम्मतचा खटला सुनावणीला निघेल त्याच्या व्यवस्थेकडे पाहूं? काय करूं, आणि काय नको करूं–असं मला झालं आहे. गुंजारव आजपर्यंत आम्ही आमचे समजत होतों, तेही उलटले व हिम्मतरावाविरुद्ध सरकारतर्फे साक्षीदार झाले असं ऐकतों.

( गुंजारव येतो. )

**गुंजारव**— साक्षीदार आहेत हेंही खरं व सरकारतर्फे हेंही खोटं नाहीं. 'पण उलटले' हें मात्र साफ खोटं. चंदन, असे तुंम कां दिसतां? मित्राच्या प्राणावर प्रसंग आणि तुम्ही असे भटकतां काय? चांगला वकील द्या, खटला लढवा; निकाल काय होणार असेल तो होवो?

**चंदन**– रमणगौरी वकिलांना वकीलपत्र देऊन ठेवलं आहे. त्या कांहींच धड सांगत नाहींत!

**गुंजारव**–खटला चालल्याशिवाय त्या अगोदर काय सांगणार? सरकारी पुरावा कितपत वठतो ह्यावर गोष्टी अवलंबून रहातील.

**चंदन**–पुरावा संपल्यावर, कोर्ट सांगतंच आहे निकाल; मग वकिलाचा कयास पुसतंय् तरी कोण आणि त्याला किंमत तरी काय? पण गुंजारव, तुमचं काय मत आहे? हिम्मत खरोखर दोषी आहे का? त्यानें गुन्हा केला ही गोष्ट खरी का?

**गुंजारव**-- हिम्मतचा 'दोषीपणा' ठरवायला मी न्यायाधीश नाहीं, अगर गुन्ह्याचा खरेखोटेपणा सांगायला माझ्याजवळ साधन नाहीं. मी सरकारी साक्षीदार आहें. सुनावणीपूर्वी खटल्याबाबत मला तोंड उघडतां येत नाहीं. चंदन, मला कोर्टांत लवकर गेलं पाहिजे. हिम्मतचा खटला आजच सुनावणीला

निघणार. जाण्यापूर्वी मला तुम्हाला एवढंच बजवायचं आहे कीं प्रयत्नांत कसूर करूं नका. ( जातो ).

**चंदन**— तें मला सांगायला का पाहिजे ? मित्राचे प्राण वांचवायला माझ्या प्राणाचं देखील मोल द्यायला मी तयार आहें. पण त्याचा काय उपयोग ? जावं; रमणगारींना भेटावं व खटल्याचेवेळीं हजर असाव. वकिलांच्या सल्ल्या-बाहेर अशिलांना जायची थोडकीच सोय आहे ? भोळ्या रामा, तुझ्याशिवाय आमचं संकट निवारायला कोणी नाहीं !

[ इतक्यांत दौलत येतो व चंदनाच्या गळ्यांत पडतो. ]

**दौलत**— ( रडक्या आवाजांत ) चंदनकाका, तुमच्याशिवाय मला आतां कोणी नाहीं हो. ( रडतो ) बाबांना धरून नेलं, ताई निघून गेली, कसं होणार हो माझं ?

**चंदन**— बाळ रडायचं नाहीं अं असं; मी आहें ना तुला ! आणि हें बघ, मी तुला नेऊन तुझ्या बाबांना भेटवीन.

**दौलत**— पण गजराताई केव्हां येणार हो परत ? ती यात्रेला गेली—मला नाहीं नेलं. ती आली कीं मी बोलणारच नाहीं तिच्याबरोबर !

**चंदन**— नको बोलूस बरं का ! ताईला आणायला मी जाईन; तोंपर्यंत तूं आमच्या घरीं रहा.

**दौलत**— पण बाबा कुठें जाणार ? मी त्यांच्याजवळ राहीन !

**चंदन**— ( डोळ्यांत पाणी आणतो ) ( स्वगत ) बाबांच्या जवळ राहीन ! या निष्पाप मनाची समजूत तरी कशी करूं ? या अजाण अर्भकाला निष्ठुर सत्याची कशाला इतक्यांत ओळख पटवूं ?

**दौलत**— कांहो नाहीं बोलत, आणि असे रडतां काय म्हणून ? बाबा नाहीं का मला भेटायचे—मी पुन्हां त्यांच्याजवळ हट्ट नाहीं करणार ? चंदनकाका, न्याच हो मला त्यांच्याकडे.

**चंदन**— ( डोळे पुसून ) चल; बाळा, आपल्या बाबांच्याकडे चल; त्यांना डोळे भरून पहा व त्यांनाही तुला डोळे भरून पाहूं देत. उद्यांच्या दिवसाला काय वाढून ठेवलं आहे हें सांगायचं कुणी ? चल माझ्याबरोबर. ( जातात. )

---

## प्रवेश ५ वा.

( **स्थळ**— सेशनकोर्ट. )

[ ज्यूरी बसली आहे; शिरस्तेदार, भालदार, चोपदार, वकील, पुकारणारा बेलिफ वगैरे देखाव्याचा पडदा उघडतो. ]

**भालदार**—[ ओरडतो ] हुश्शार रहो– सवारी आती है.

[ सर्वजण उभे राहून खडी तार्जीम देतात, व न्यायाधीश येऊन उच्चासनावर बसतो. ]

**कोर्ट बेलीफ**— [ ओरडून ] कोई अर्जदार हजर है—

[ सावित्रीबाई येते व त्याच्या हातांत अर्ज देते– दुरून टाकते, पण घेतांना मुसलमान बेलीफ शिवतो. ]

**सावित्री**—अग बाई, शिवला कीं ग मला– विटाळ कीं हो केला ! कोर्टांत देखील का विटाळ करायचा ? देवळांतही तेंच नि कोर्टांतही तेंच. आणि मी चांगली समोर उभी होतें अर्ज घेऊन–बसकन् कशाला रे ओरडलास ' अर्जदार हजर है ' म्हणून ? दिसली नाहीं वाटतं मी तुला ?

**बेलीफ**— बाई, सुरवातीला असंच ओरडावं लागतं !

**सावित्री**— म्हणजे ! आरडाओरडीपासून का कोर्टाच्या कामाला सुरवात होते ? आश्चर्यच आहे म्हणायचं ! कोर्ट म्हणजे कांहीं कसाईखाना नव्हे ना ?

**बेलीफ**— खरं बोलायचं तर तोच !

**शिरस्तेदार**— रमणगौरी वकीलांना पुकार. या बाईच्या अर्जावर त्यांची सही आहे.

**बेलीफ**— रमणगौरी वकील हजर है ? ( नाहीं म्हणून सांगतो. )

**शिरस्तेदार**— या बाई पुढें; त्या पिंजऱ्यांत उभ्या रहा.

**सावित्री**— तें काय म्हणून ? मी आपली इथेंच बरी आहे.

**बेलीफ**— व्हा पिंजऱ्यांत ! अर्ज दिला कीं तिथेंच जावं लागतं.

**सावित्री**— म्हणजे–? मी पक्षी आहे कीं काय— म्हणून मला पिंजऱ्यांत कोंबताहांत ! जुलूमच झाला म्हणायचा हा !

**शिरस्तेदार**— बाई, तुमचे वकील कुठें आहेत ? साहेबबहादुरांना थांबायला

वेळ नाही. आज सेशनचा मोठा खटला लवकर सुरू व्हायचा आहे. तुमचा अर्ज चमत्कारिक असल्यानें, तुमचा कोर्टासमक्ष जबाब घेणें आहे. चढा पाहूं लवकर पिंजऱ्यांत.

**सावित्री**— ( पिंजऱ्यांत चढते. ) कोर्टाची पायरी चढलें. आतां पिंजऱ्याला भिऊन कसं निभेल? वकील तरी आहेत का माझे हजर वेळेवर? छे ग बाई; वेळेवर आले तर ते वकीलच नव्हत. फी घेण्यापूर्वी काय गुलगुल बोलतात, गोड गोड थापा मारतात! आणि हातावर दक्षिणा पडली कीं मग मात्र वेळेवर हातीं लागायचे नाहींत. कुठेंही जा, साऱ्या वकीलांची एकच जात! बाई वकील या नाहीं तर बुवासाहेब बॅरिस्टर घ्या; सारे एका माळेचे मणी!

[ बॅरिस्टर रमणगौरी ब्रीफ बॅग घेऊन, कोर्टरूमसमध्यें प्रवेश करतात. ]

**रमणगौरी**— ( कोर्टास उद्देशून ) [ I beg your honour's pardon for being late ] मी साहेब मजकुरांची उशीर केल्याबद्दल माफी मागतें. शिरस्तेदार, या सावित्रीबाईचा अर्ज--तोच ना आहे साहेबांसमोर?

**शिरस्तेदार**-- होय, तोच आहे. सांगा साहेबांना आपल्याला काय सांगायचं आहे तें.

**रमणगौरी**— ( कोर्टास ) साहेब, अर्जदाराच्या मुलीचं लग्न राघव नांवाच्या इसमाबरोबर ठरलं होतं, त्याच वेळेला वामदेव व दुर्मुखा या जोडीचं लग्न ठरलं होतं. नजरचुकीनं वामदेवाच्या पाटासमोर, अर्जदार इची मुलगी चरणी उभी राहिली व गर्दीत त्यांचं लग्न लागलं गेलं. ही चूक मागाहून लक्षांत आली, पण नवरदेव वामदेव मुळींच ऐकेनात व अखेर तो लग्नमंडपांतून, चुकीनं लग्न लागलेल्या चरणीला घेऊन पळून गेला, त्यांना अव्वल अटक करून पकडण्याबद्दल हा अर्ज आहे.

**कोर्ट**— ॲफिडेव्हिट दिलं आहे?

**रमणगौरी**— होय साहेब.

**कोर्ट**— वामदेव व चरणी या दोघांना अव्वल अटक करावी व पुढील हुकूम होईतों, कोर्टांत ठेवून घ्यावं.

**शिरस्तेदार**-- ( सावित्रीस ) बाई, उतरा पिंजऱ्यांतून; तुमचं काम झालं.

**सावित्री**— तुमच्या तोंडांत साखर पडो; जबाब न देतां काम! माझ्या गौरी वकील आहेतच हुशार. वकीलसाहेब जाऊं ना मी ? येईल ना माझी चरणी इथं सुखरूप ?

**रमणगौरी**— येईल; जा बाहेर बसा! दुसरा खटला सुरू होणार आहे.

[ सावित्री दूर जाऊन खटला ऐकायला बसते. ]

**शिरस्तेदार**— ( शिपायास ) आरोपी हिम्मत याला कोठडीमधून ( Loek–up ) घेऊन या. ( शिपाई जातो. )

**सरकारी वकील**— आरोपीनें कोर्टासमक्ष कबुलीजबाब दिला आहे, तेव्हां मी कांहीं फारसा पुरावा करीत नाहीं. एक्स् सर्जन मि. गुंजारव हे माझे पहिले साक्षीदार घ्यावयाचे आहेत.

( आरोपी हिम्मत पिंजऱ्यांत उभा करतात. चंदन व दौलत येतात व गौरी वकिलांच्या मागें बसतात. )

**शिरस्तेदार**— सर्जन गुंजारव पुकारो.

**बेलीफ**— गुंजारव सर्जन हजर है ?

(गुंजारव खादीच्या पोषाखांत येतो व साक्षीदाराच्या पिंजऱ्यांत उभा रहातो. साक्षीदाराचा शपथविधि होतो. )

**शिरस्तेदार**— ( गुंजारवास ) तुमचं नांव काय ?

**साक्षीदार**— गुंजारव.

**शिरस्तेदार**— वय ?

**साक्षीदार**—बत्तीस.

**शिरस्तेदार**— जात ?

**साक्षीदार**— हिंदू.

**शिरस्तेदार**— धंदा ?

**साक्षीदार**— देशभक्ति.

**शिरस्तेदार**— रहाण्याचें गांव ?

**साक्षीदार**— हल्लीं हें; एरव्हीं प्रवासांत.

**सरकारी वकील**— मि. गुंजारव, तुम्ही आरोपीस ओळखतां ?

**गुंजारव**--होय.

**स. वकील**-- तुम्हांला ह्या गुन्ह्याची काय माहिती आहे ?

**गुंजारव**—ह्यापुढें, ह्या खटल्यांत मी भाग घेऊं इच्छित नाहीं. सबब तुमच्या प्रश्नाचें उत्तर देतां येत नाहीं.

**स. वकील**— एखाद्या खटल्यांत भाग न घेण्याचा हक्क फक्त त्यांतील आरोपीचा आहे. साक्षीदाराचा नाहीं. तुम्हांला माझ्या इतक्यांत विचारलेल्या प्रश्नाचं उत्तर दिलंच पाहिजे. नाहीं तर—

**गुंजारव**-- नाहीं तर काय ? सरकारी वकीलसाहेब, त्या आपल्या शुभासनावरून धमकी कोणाला देतां ?

**स. वकील**– न्यायाच्या कामांत मदत नाकारणं व कोर्टाच्या कामांत अडथळा, अशा दुहेरी गुन्ह्याबद्दल तुम्हांला आरोपी करण्यांत येईल.

**रमणगौरी**—थांबा; हा साक्षीदाराच्या मूलभूत हक्काचा प्रश्न आहे. त्यावर कोर्टाचं रूलिंग ( ऊर्फ हुकूम ) घेतल्याशिवाय सरकारी वकिलांनीं गुन्ह्याचं शिक्कामोर्तब मारावं ही आश्चर्याची गोष्ट आहे.

**स. वकील**—या मुद्यावर कोर्टानं आपला निर्णय जाहीर करावा.

**कोर्ट**—आरोपी गुन्हा कबूल करतो हें खरं ? तें विचारून नंतर आम्हीं ह्या प्रश्नावर निर्णय देऊं.

**शिरस्तेदार**—आरोपीस उभा करा.

[ शिपाई आरोपीस उभें करतात. ]

**कोर्ट**— ( आरोपीस ) तुला गुन्हा कबूल आहे ? तूं भैरव नांवाचे इसमास ठार करून नाहींसं केलंस ही गोष्ट खरी ?

**आरोपी**--मी-मी गुन्हा केला, आणि केलाही पण नाहीं. भैरवाला मी मारला-पण तो ठार झाला कीं कसें हें मला सांगतां येत नाहीं. भैरव अद्याप जिवंतही असेल; तो कदाचित् मेलाही असेल !

**कोर्ट**--असलं उत्तर निरुपयोगी. तुला गुन्हा कबूल कीं नाकबूल ? एकच उत्तर पाहिजे.

**आरोपी**—मी मुळींच उत्तर देत नाहीं.

**कोर्ट**—ठीक आहे; आरोपीच्या वकिलाचें ह्यावर काय म्हणणें ?

**रमणगौरी**—उत्तर न देण्याचा आरोपीला हक्क आहे.

**स. वकील**—आरोपीनें पूर्वी कबुलीजबाब दिला आहे तो या खटल्यांत दाखल करून घ्यावा. इतर पुराव्याची जरूरी नाहीं. पंचनामा शाबीत झाला आहे. मयत भैरव यांच्या प्रेताचा पत्ता नाहीं.

**रमणगौरी**—भैरव ' प्रेत ' झाला होता हेंच मुळीं शाबीत केलेलं नाहीं, मग पत्ता कोणाचा लागायचा ?

**स. वकील**—( गौरीस ) मधेंच बोलूं नका; खालीं बसा. भैरव जिवंत होता व तो नाहींसा झाला--म्हणजेच मयत झाला.

**रमणगौरी**--वारे अर्थ ! अशा अर्थ लावण्यानं चांगलाच अनर्थ ओढवेल. मनुष्य परागंदा झाला--घरांतून, गांवांतून नाहींसा झाला म्हणजे तो ' मयत ' झाला असं समजायचं कीं काय ?

**स. वकील**-- ( गौरीस ) पुन्हां सांगतों खालीं बसा; आतां मधें बोलाल तर ' ऑर्डर ' बद्दल रूलिंग मागण्याचा प्रसंग येईल. शिवाय तंट्याचे जागीं रक्त सांडलं होतं.

**कोर्ट**— तें कदाचित् जनावराचं असेल !

**आरोपी**— मी सांगतों तें माणसाचं होतं–भैरवाचं होतं. मला खोटं खप-णार नाहीं.

**स. वकील**— जास्ती सांगायचं कारण उरलं नाहीं. भैरवाचं रक्त म्हणून आरोपी सांगतो. पंचनामा तेंच बोलतो. भैरव दिसत नाहीं. सबब आरोपीनं गुन्हा केला हें सिद्ध होतं आहे.

**रमणगौरी**-- ज्यूरींतील सभ्यगृहस्थ हो, आरोपीच्या प्राणांचा हा प्रश्न आहे. गुन्हा पूर्णपणें शाबीत झालेला नाहीं. पांचामुखीं परमेश्वराची भूमिका घेऊन तुम्ही बसलांत. तेव्हां निरपराधी इसमाला ' दोषी ' ठरविण्याचं पाप करूं नका. संशयाचा फायदा आरोपीस द्यावयाचा असतो. भैरव मयत झाला ही गोष्ट शाबीत नाहीं. अशा स्थितींत आरोपीला ' दोषी ' ठरवून, त्याच्या हत्येचं पातक घेऊं नका.

**कोर्ट**— ज्युरी लोक, आरोपीचे गुन्ह्याबद्दल तुमचा काय निर्णय आहे ?

**सरपंच**— एकमती निर्णय ' दोषी. '

**कोर्ट**— ज्यूरीप्रमाणेंच माझें मत; आरोपीस मी फांशीची शिक्षा फर्मावतों. विजेच्या खुर्चीवर बसवून त्याचा मरेपर्यंत निकाल करावा.

---

## प्रवेश ६ वा.

( **स्थळ**—रस्ता वामदेव व चरणी वधुवरांच्या पोषाखांत येतात. )

**चरणी**— मी म्हणते आपलं लग्न रजिष्टर करून टाकूं ?

**वामदेव**— ते ग कशाला ? .

**चरणी**— अहो सप्तपदी झाली नाहीं म्हणून.

**वामदेव**— काय वेडी आहेस; लग्नमंडपांतून बाहेर पडल्यापासून तूं नि मी थोडीं कां पावलं चालून आलों ? सप्तपदीच काय, पण सप्त–शत–पदी देखील झाली असेल. सात पावलांतच सज्जनांची मैत्री होते असं शास्त्र सांगतं. मग हा सातशें पावलांचा सेतू आपण ओलांडल्यावर लग्नांच्या लंकेंत आपण पोहोंचणार नाहीं असं तुला वाटतं तरी कसं ?

**चरणी**— इच्छेविरुद्ध झालेलं आईला मुळींच खपत नाहीं. तिचा राग मोठा कठीण आहे.

**वामदेव**— पण माझा तुझ्यावरचा अनुराग त्याहूनही बळकट आहे. लग्न लावलेली नवरी हातांतून गमवायला हा वामदेव कांहीं लेचापेचा नाहीं. तूं मुळींच भिऊं नको. करूं देत सावित्रिबाईला हवं तें.

**चरणी**— अहो, ती दावा लावील आपल्यावर–आपलं लग्न तंट्यांत घालील पण कुठं करीत बसायचं कोर्ट नि कचेरी ? मला त्याचा चांगला अनुभव आहे. लोकांचीं भांडणं खुशाल भांडावींत व मनमुराद दलाली मिळवून त्यावर चरावं. पण कोर्टांतलं शहाणपण अंगीं आल्यावर स्वतःचीं भांडणं लोक क्वचित भांडतात तेव्हां ऐकायचं होतं माझं–चला लग्न रजिष्टर करूं या.

**वामदेव**— काय बुवा तुझी कटकट–म्हणे लग्न रजिष्टर करा. असला कसला हट्ट ? बोहोल्यावरून मी पुरता उतरलों नाहीं तों लागलीस मला फिरवायला.

हें पहा, खरं सांगायचं म्हणजे आपल्याला लग्नाचं एकच रजिष्टर ठाऊक आहे; आणि त्याला माझी ना नाहीं.

**चरणी**— कोणचं ठाऊक आहे ?

**वामदेव**— आपल्याला नाहीं बोवा बोलतां येत-तें नाहीं मी तोंडानें सांगणार.

**चरणी**— म्हणजे मुके होणार कीं काय ?

**वामदेव**— अं हं; तुझे घेणार-

**चरणी**— हा काय चारगटपणा भर रस्त्यांत-मला नाहीं हो खपायचा !

**वामदेव**— अग अशी रागाऊं नकोस; जुन्या शास्त्रपद्धतीनें वागायचं म्हणजे तुझ्या कपोल-कागदावर माझ्या दंतभक्तीनें निशाणी करून आपलं लागलेलं लग्न रजिष्टर करायचं असतं ! मग करूं का तसं ?

( इतक्यांत कोर्टाचा बेलिफ येतो. )

**बेलीफ**— हं थांबा, वामदेवभट दूर सरा. भर रस्त्यांत उल्लू बनूं नका. त्या पोरीला पळवून कुठें चालविलीत ? व्हा माझ्या ताब्यांत ?

**चरणी**— कुणाला रे पोरी म्हणतोस ?

**वामदेव**— इकडचं थोबाड तिकडे करून टाकीन समजलास--या माझ्या पत्नीला ‘ एकेरी ’ हाक मारतोस ?

**बेलीफ**— हें पहा-असे एकेरीवर येऊं नका. मी कोर्टाचा दूत आहे-सरकारी अधिकारी आहे. माझा जर पाणउतारा कराल तर याद राखून ठेवा !

**वामदेव**— गळ्यांत पट्टा अडकवला आणि बनला अधिकारी-केवढा तुझा अधिकार ! कुत्र्याच्या देखील गळ्यांत पट्टा असतो.

**चरणी**— पण तो बिचारा मालकाजवळ इमानदारीनें तरी वागतो. नाहीं तर हे मेले कोर्टांतले कुत्रे, दोन्ही बाजूकडचे तुकडे चघळायला चटावलेले असतात. प्रतिवादीचे पैसे घेऊन वादीला चावतील; तर लगेच वादीनें तोंडाला तोब्रा दिला कीं त्याच प्रतिवादीला जाचतील. यांची दुतोंडी जात फार भयंकर असते हो.

**बेलिफ**— रमणगोरी साहेबांची तूं कारकून होतीस तेव्हां लांब जीभ काढून

बडबड करायची तुला संवयच आहे. हं आटपा ही बडबड; हा बेलिफ बहाद्दर, या कोर्टाच्या हुकमानें ( वारन्ट दाखवतो ) तुम्हा दोघांना अटक करीत आहे. खबरदार जागचें एक पाऊल हलवाल तर ! मुकाट्यानें माझ्या मागें या–करा या वारन्टावर सह्या. ( कागद वामदेवाजवळ देतो )

**वामदेव**— ( कागद हातांत घेऊन तुकडे करतो ) ह्या घे सह्या आणि आतां हो चालतां इथून.

**बेलिफ**— हा कोर्टाचा अपमान झाला–याला भयंकर शासन आहे.

**वामदेव**— ( बेलिफाची मान धरतो ) जातोस नीट इथून कीं मुरगाळूं तुझी ही मान–लांब जाऊन भुंक !

**चरणी**— त्याचे कान लांब करा आणि चांगले ओढा !

**बेलिफ**— ठीक आहे. हा अस्सा जातों, कोर्टांत जाऊन रिपोर्ट देतों. पोलीस आणून तुम्हाला चतुर्भुज करून नेतों !

**वामदेव**— चल नीघ, आम्ही अगोदरच चतुर्भुज झालोंत ! तुझी कशाला मधेंच लुडबुड ?

**चरणी**— मीं म्हटलं नाहीं आई दावा लावील आणि वारंट काढील म्हणून ? मी नाहीं ऐकायची ! लग्न रजिस्टर झालंच पाहिजे. चला हपीसाकडे. उचला पाऊल लवकर ! ( त्याला ओढते. )

**वामदेव**—अग हो अशी ओढूं नकोस. नवरा म्हातारा आहे हें ध्यानांत धर.

**चरणी**— चांगलं लक्षांत आहे हो ! चला म्हणतें ना लवकर? हा काय बाई चेंगटपणा ?

**वामदेव**—तरुणी–आणि कोर्टकचेरींतली तूं शहाणी–तूं नेशील तिकडे मला येणं ओघानंच आलं–चला ! ( दोघे जातात. )

## प्रवेश ७ वा.

[ **स्थळ**—तुरुंगांतील अंधारकोठडी. पायांत साखळदंड अडकविलेल्या कैद्याच्या वेषांत हिम्मतराव बसला आहे असा देखावा. ]

**हिम्मत**—विविध वासना व हरतऱ्हेचे विकार यांच्या उपाधींनीं जखडून गेलेला जीवात्मा देहाच्या या भीषण बंदिवासाला असाच कंटाळलेला असला

पाहिजे! आजची रात्र म्हणजे माझी इहलोकची शेवटची निशा, मग मला नीज कशी येणार! उद्यां सूर्योदयाबरोबर माझ्या प्राणांचा अस्त होणार आहे! उरलेला हा अल्पकाळ जाता जात नाहीं! माझ्या आयुष्याची अमावास्या तर संपत नाहींना आली? पण माझी जगांतली संपत–माझा बाळ, माझा लाडका दौलत मी इथें ठेवून कसा जाणार? दौलत दौलत–माझ्या प्राणा, तुला आतां कोण जतन करणार? दौलत, अरे तुझी आठवण झाली कीं जीव कासावीस होतो–हें जग सोडून जायची कल्पना दुःसह वाटते! बाळा, तुझें कायरे होणार! मित्रा चंदना, ये दौलतला घेऊन ये! माझे पंचप्राण उद्यां फासावर लटकण्यापूर्वी माझा तो एकच प्राण मला एकदां या डोळ्यांनीं शेवटचा पाहूं दे! त्याला कडकडून भेटल्याशिवाय माझ्या जिवाची शांतपणानें या देहांतून सुटका होणार नाहीं. चंदन, चंदन लवकर ये व मला एकदांच भेट दे. नाहीं म्हणूं नको! पुन्हां तुला मी त्रास देणार नाहीं. पण आज मला निराश करूं नको!

[ दौलत व चंदन येतात–हिम्मतरावच्या हातांत जाऊन दौलत त्याला कडकडून भेटतो. ]

**दौलत**-- ( रडत, रडत ) बाबा, हें काय हो असं? माझ्यावर रागावलात आँ! मी नाहीं तुम्हांला सोडायचा.

**हिम्मत**--चंदना, तूं इथें आलास तरी कसा?

**चंदन**-- पैशानें भरलेला कसा कंबरेला बांधला आणि त्याच्या जोरावर आलों! पण मित्रा, हें काय केलंस, शेवटीं? कोणरे ही तुझी दशा! 'निर्दोष देहाची' परमेश्वरा, कसली दशा आरंभलीस?

**हिम्मत**-- काय? 'मी निर्दोषी?' मित्रा, मी 'निर्दोषी' आहे नारे! तुझी तर खात्री आहे ना!. म्हण, म्हण–पुन्हा एकदां. तुझ्या पावन वाणींतून उगम पावणारा तो 'निर्दोष नाद' मला पुन्हा ऐकूं देत म्हणजे मी धन्य होईन!

**चंदन**— तूं पूर्ण 'निर्दोषी' आहेस.

**हिम्मत**— अहाहा! मी कृतार्थ झालों! आतां मला साऱ्या जगाची परवा नाहीं. माझ्या जीवाचा पडसाद 'पूर्ण निर्दोषी' म्हणून मीं ऐकला

छायेप्रमाणें आपल्या प्रेममय सहवाससुखाचा आजपर्यंत आसरा देणारा माझा जिवलग चंदन माझ्याबद्दल भलता समज बाळगीत नसतां, आतां मला माझ्या दौलतबद्दल काळजी करायचं काय कारण आहे ? बाळ ऊठ, मला सोड. मी आतां तुझा कोणी नाहीं —हं दूर हो कसा— ( त्याला दूर करावयाचा प्रयत्न करतो. )

**दौलत**— बाबा ! मला मारा हवं तर—पण मी नाहीं दूर व्हायचा व दुसऱ्या कोणालाही माझ्या बावांच्या अंगाला हात लावूं देणार नाहीं.

**हिम्मत**— बाळा, असं काय वरं करतोस ? माझं नाहीं कां तुला ऐकायचं !

**दौलत**— मला नाहीं कांहीं ऐकूं येत. आणि मी नाहीं कांहीं ऐकत जा.

**चंदन**— पितापुत्रांचीं ही करुणपूर्ण लीला पाहून प्रत्यक्ष काळाचें काळीज दयेनें वितळून जाईल ! माझ्यानें हा प्रसंग नाहीं पहावत— ( तोंड झांकतो. )

**हिम्मत**— मित्रा, संभाळ माझी ही संपत— रात्र संपली ! ऐकलंस ? या हतभागी जिवाचा जगांतला प्रवास सरला म्हणून योग्य वेळीं सूचना करणाऱ्या पहांटेच्या प्रहरीं आपल्या सौम्य रवानें निजलेल्यांना जागे करणारे हे आवाज पुन्हां ऐक. मला आतां पुढची ओढ लागली ! फटफटलेल्या पूर्वेकडे पाहिलंस कीं गतकालाच्या अंधारांत घुटमळणारा माझा जीवात्मा प्रारब्धाच्या धांवत्या दरडीवर तात्पुरता हात ठेवून भविष्याला भेटण्याकरितां मोठ्या लगबगीनें चाललेला तुझ्या नजरेस पडेल ! रोजच्यारोज बालरवीला जन्म देणारी ही शांत उषा मला डोळेभरून पाहूं दे ! तेजस्वरूप सूर्यनारायणाची ही मनोहर माता, म्हणजे ‘ पुनर्जन्माची ’ मूर्तिमंत कल्पनाच होय ! मित्रा, ‘ पुनर्जन्माची ’ कल्पना या आल्हादकारक समयीं मला किती इतका नामी वाटत आहे म्हणून सांगूं ?

**चंदन**— हिम्मत, तुझ्याजवळ माझं एक मागणं आहे.

**हिम्मत**— बोल, माग—काय वाटेल तें माग— तुला देण्यासारखं माझ्याजवळ आतां उरलयं तरी काय ? माझी सारी दौलत ही एवढीच ती तर तुझ्या जिवावर मी टाकून चाललों ! तूं दौलतचा आजपासून बाप झालास

म्हणून तर मला मरण्याचा धीर आला – आनंदानं मी मृत्यूला भेटायला चाललों. मला आतां परमात्म्याचं नामस्मरण करूं देत.

**चंदन** — माझ्यावर तुझ्या असलेल्या लोभाचं स्मरण कर व मला मी जें मागेन तें देईन असं वचन दे.

**हिम्मत**— हें घे वचन ( वचन देतो ). परलोकच्या प्रवासाला निघालेला हिम्मत तुझं कोणतं मागणं नाकारील ? चंदना, हें तुझं म्हणणं मी कबूल केलं-तुझं मागणं ऐकलं म्हणजे तुझ्या रिणांतून मुक्त झालों नाहीं ! पुनर्जन्माची व्यवस्था जर परमात्म्यानं करून ठेवली नसती तर संस्मृतीच्या पाशांत गुरफटून गेलेल्या जीवात्म्याची भेट त्याला केव्हांही घेतां आली नसती. अनेक जन्मांच्या संसर्गानं सांचलेलें बरें वाईट संचित संपवायला, एक मानव जन्म जर पुरा पडला नाहीं तर पुनर्जन्माशिवाय दुसरी तारक गतीच उरत नाहीं. शुभ व अशुभ कृतींनीं बेजार झालेल्या अशुद्ध देह नाशाबरोबरच जर चित्कला नामशेष होऊन जाती, तर अपूर्ण जीवात्म्याला प्रारब्धाच्या प्रणयशील भूमिकेवर शुद्ध क्रियमाणाचीं बीजें पेरून पूर्णावस्था प्राप्त करून घेण्याचा सुंदर व सरळ मार्ग कायमचा खुंटला असता ! मित्रा, पुनर्जन्मावर माझा पूर्ण विश्वास आहे. मला मरणाला ' प्रियसखा ' म्हणून प्रेमानं अलिंगन द्यायला काय बरं हरकत आहे ?

**चंदन**— हिम्मत, तूं मला वचन दिलंस— बोल दिलंस नां ?

**हिम्मत**— मी कुठें नाहीं म्हणतों ?

**चंदन**— मला तुला बंधमुक्त करूं दे.

**हिम्मत**— देहमुक्त होणाऱ्या हिम्मतला अर्ध्या अवकाशाची बंधमुक्तता काय आनंद देईल ? ( त्याला बंधमुक्त करतो. )

**चंदन**— दौलत बरोबर घेऊन इथून जा व स्वतःला ' चंदन ' या नांवानं ओळख व दुसऱ्याला तुला ' चंदन ' याच नांवानं ओळखूं देत—

**हिम्मत**— तुला वेड तर नाहींना लागलं चंदन ! अरे हें काय करतोस ?

**चंदन**— वेळ घालवण्याचा हा प्रसंग नाहीं. मित्रा, हें तुला ऐकलंच पाहिजे.

दौलतला घेऊन इथून जा! मला तुझ्या प्राणाची ही भीक घाल. 'नाहीं म्हणून मी कदापि ऐकणार नाहीं!

**हिम्मत०**— म्हणजे? मरायचं आहे वाटतं तुला माझ्या ऐवजीं? खासा रोजगार. भलती भिक्षा कोण घालील! वा चंदना, हें असलं वचन घेतलेस काय? जा दौलतला मुलगा म्हणून सांभाळ–

**चंदन**— माझ्याकरतां नव्हे तर याच्याकरतां–ह्या अर्भकाकडे पाहून तरी माझी विनवणी तुला मी नाकारूं द्यायचा नाहीं. अरे, चंदनाच्या देहाचें चीज होऊं दे. मला काय पोर ना बाळ! मी गेलों तर तुझ्याशिवाय कुणालाहि वाईट वाटणार नाहीं. पण तुझा हा लाडका प्राण तुझ्याशिवाय या जगांत क्षणभर देखील टिकणार नाहीं. कांठावर आणून टाकलेल्या माशाप्रमाणें लवकरच नाहींसा होईल! म्हणून म्हणतों कीं तुझ्याबद्दल मला मरूं देत –

**हिम्मत०**— ( चंदनाचे पाय धरतो ) फासावर माझा देह टांगण्यापूर्वींच या तुरुंगाच्या अंधारांत भेटण्याची देवा कशाला तसदी घेतलीत?

**चंदन**— अरे, हें काय आरंभलंस? मी काय देव कां आहें? नादीपणा बस कर. मलाच तुला इथून घालवून दिलं पाहिजे. हं हिम्मत इथून चल जा! बाळ दौलततुझ्या बाबाला लवकर ने ह्या बघ कसा!

**दौलत**— बाबा चला कीं हो घरीं? आणि चंदनकाका, तुम्ही कशाला बसतां इथें –तुम्ही चला आमच्याबरोबरच.

**चंदन**— बाळ, बाबांना घेऊन तूं किनई लवकर पुढें हो–बघ मी आलोंच तुमच्या मागोमाग!

**हिम्मत०**— देवा, या पतिताकरितां तुम्ही चंदनाचा अवतार घेऊन आलांत हें मला कळत का नाहीं? पण मी नाहीं ऐकणार तें – स्वतःचा जीव बचावूं म्हणतां? पण तुम्ही काय म्हणून ही शिक्षा सोसावी? 'ज्याचा संसार त्याचाच भार' असा न्याय असतांही अन्यायाची अफरातफर ही दोन जीवांची बिलक्षण देवघेव मी केव्हांही कबूल करणार नाहीं! चंदना, परमेश्वरा, मी मृत्यूला भ्यालों असा तुमचा समज झाला कीं काय? मानवी न्यायासनासमोर, हिम्मत 'दोषी' असा निकाल झाला असतां, फासावर

चंदनाचा निकाल लागलेला मी कोणत्या डोळ्यानें पाहणार ? चंदना, तुझा देह मित्रकार्याकरतां नाहींसा झाल्यावर, माझा जीव कोणत्या शिलकी आशे-वर मी टांगून ठेवायला समर्थ होईन ? देवा, हें तुमचें नवीन अवतारकार्य तुरुंगाच्या कोठडींतच संपवा व ही माझी दौलत संभाळा !

**चंदन**— मित्रा, मी मरण मागतों–तें देखील देत नाहींस ना ?

**हिम्मत०**— चंदना, तुला मरण्याची परवानगी मी कशीरे देऊं ?

**चंनद**— जा, मित्रा जा– या तुझ्या दौलतसाठीं जग.

**हिम्मत०**— माझी हिम्मत खचली ! देवा, तुमचा आधार तुटला. चंदना, तुम्ही जगांतून जाणार म्हणतां ?– माझ्यासाठीं गळफास लावून घेणार ? केवळ या लाडक्या प्राणासाठीं ना ? ही तुमची खटपट—

**चंदन**— तुझ्या मी पायां पडतों–करच एवढी दया माझ्यावर ! तुझे माझे फक्त देह दोन, तर मग मी मेलों काय, आणि माझ्याकरतां तूं जगलास काय, दोन्हीही सारखींच ! माझी तुला शपथ आहे. शेवटची आज्ञा – अंतःकाळची ही माझी तीव्र व अनिवार इच्छा — इहलोकची एकवटलेली ही आशा— परलोकांत पुनर्जन्म घेऊन पाऊल टाकतांना या माझ्या दृष्टीला दिसणारी ही माझी पूर्व दिशा मी अनिमिष नेत्रांनीं अवलोकन करणाऱ्या समाधिसुखांत विलीन होऊं पहात असतांना मित्रा हिम्मता, या साऱ्या पसाऱ्यावर स्वतःच्या स्वार्थी हट्टाचें विरजण घालून, माझा रसभंग करूं नकोस ! हीच माझी शेवटची प्रार्थना—चंदनाची ही अमोल वाणी ऐका ! ! परमेश्वर–तो मंगलमय परमात्मा माझ्याकडून हें आत्मार्पण घडून आणो ! सज्जनांच्या कार्यीं झिजला जाणारा माझा देह तुलाही अन्तीं पावन करील हें ध्यानांत धर व इथून जा !

[ पडदा पडतो. ]

# अंक ५ वा.

## प्रवेश १ ला.

( **स्थळ**— भोळ्या रामाच्या देवळाजवळ योगिनीच्या वेषांत गजरा प्रवेश करते.)

**गजरा**— ही सृष्टीदेवीची प्रार्थना पाहिली, मनाला समाधान वाटलं. महाराष्ट्राच्या काशीला गेलें, विटेवरचा विश्वनाथ मीं पाहिला. उदरीं जन्माला आलेला जीव आश्रमांतल्या पाळण्यांत टाकून, जगाच्या पालन-वाल्याला भेटण्याकरतां मी चंद्रभागेच्या पुलावरून खालीं उडी घेतली. पतीनें टाकलेली व देहानें पतित झालेली गजरा पावन सरितेच्या उदरांत केव्हांच नाहींशी होऊन पुनीत झालेली निर्गुणा मी आज बाहेर आलें. तसल्या वेराळीं पोहायला आलेल्या एका पुण्यवंतानें मला वाचवून कांठाला आणून सोडली. मीं जिवाची आशा सोडली पण जिवानें मला पुन्हा जगांत आणून सोडलें—तें केवळ पतितोद्धार करण्याकरतां. पतितांच्या वेदना मला दुसऱ्या का कोणी सांगायला पाहिजेत ? पंढरपुरीं जातांना मी बाबांना भेटलें नाहीं; त्यांचं दर्शन घ्यायला मी परत आलें; पण ते मला ओळखायचे देखील नाहींत—

[ इतक्यांत घाईघाईनें भैरव व रमणगौरी प्रवेश करतात. ]

**भैरव**— [ गजरेचे पाय धरतो ] मीं तुला ओळखलं. भूलोकच्या देवते, या ग्या पतिताचा उद्धार कर. त्याशिवाय मी हे पाय सोडणार नाहीं.

**गजरा**— भैरव उठा, हें काय ? मनानें मानलेल्या एक वेळच्या पतिदेवा, जनाची रीत सोडल्यामुळें मीच पतित झालें होतें. एका पतितानें दुसऱ्याचा उद्धार करायचा म्हणतां ?

**रमणगौरी**— आपण सारेच पतित; एकमेकांना हात देऊन संसाराचा प्रवास संपवायचा.

**भैरव**— क्षमा केल्याशिवाय मी पाय सोडणार नाहीं.

**गजरा**— उठायचं; मीं क्षमा केली--न करणारी मी कोण ? दुःखी, कष्टी

जीवांना समाधानाची सात्त्विक भिक्षा वाढण्याकरतां मी दारींची दरवेशीण बनलें आहे.

**रमणगौरी**— भिकारीण आणि लोकांना भीक वाढणार ! आश्चर्यच आहे म्हणायचं ?

**गजरा**— त्यांत कसलं आलं आहे आश्चर्य ? जगाकडून मला ' वहावा ' मिळवायची नाहीं; ' नांव ' गमवायला मजजवळ राहिलं नाहीं. तालासुरावर गाईलेल्या करुणरसाच्या रागानें कठोरशा अंतःकरणावर आघात करायचं व हृदयस्थ दयेला वाट मोकळी करून देऊन तिचे पाट अनाथ व पतित जनतेवर अखंड सोडायचे. हीच'या गजरेच्या उरलेल्या आयुष्याची इतिकर्तव्यता !

**भैरव**— रमणगौरी, लौकर चलायचं; मी इथेंच काय उभा राहिलों ? या देवतेनं माझा उद्धार केला; पण तिच्या महाभाग पित्याच्या आयुष्याची दोरी तुटण्यापूर्वी आपल्याला कारागृहांत जाऊन पोहोंचलं पाहिजे व निर्दोषी जीव कायद्याच्या गळफासांतून सोडवायला पाहिजे--पाय उचलायचा होता, गौरी.

**गजरा**— काय सांगतां ? बाबांच्या प्राणावर संकट ! बोला, काय झालं तें ! सारं सांगा– मी जगलें, जगाच्या उपाधींत पुन्हा सांपडलें–सांगा हो लवकर !

**भैरव**— काय सांगू ? हिम्मतची व माझी झटापट होऊन मीं खालीं पडलों; माझी रक्तनलिका फुटून स्त्राव झाला–खालची जमीन तांबडी झाली; मी बेशुद्ध पडलों; एका गुराख्यानें उचलून मला त्याच्या खोपटांत कसें नेलें हें मला मागाहून कळलें. हिम्मतवर माझ्या खुनाचा आरोप येऊन, खटला झाला व फाशीची शिक्षा फर्मावली गेली. गुराख्याच्या झोपडींत मी बरेच दिवस पडून काढले; ' एक इसम फाशी जाणार ' म्हणून तो रात्रीं बोलल्याबरोबर माझ्या मनांत चर्र झालें व संशय आला कीं खुनाच्या खऱ्या नसलेल्या आरोपावरून, हिम्मतला तर फांशी देत नसतील ना ? लगेच निघालों व आमच्या वकील गौरी यांना भेटलों. सेशन कोर्टात हिम्मत तर्फे त्याच होत्या; मानवी न्यायदानाचा घातुकपणा घालवायला आणि निरपराधी जीव वांचवायला आम्ही या पहांटे चाललोंत. वाटेंत देवता भेटली. शुभशकुन झाला. गौरी, गजराबाई लवकर चला–आपण वेळेवर फाशी देण्याच्या जागीं पोहोंचलों तरच हिम्मत वांचेल—

**गजरा—** नाम मंगला, निरपराधी पित्याला भेटायला हा जीव व्याकुळ झाला आहे. तुझी करुणा भाकतें—आम्ही जाईतों त्यांना जिवंत ठेव.

**हा, गमे, रुचिरा ! सारा**
**त्याग तरुचि फुले फेंकिली, या गगनीं पसारा ॥ ध्रु० ॥**
**नाहक लागे डाग पित्याला**
**व्याकुल माझा जीव जाहला**
**शुभाशुभांचा डाव संपला**
**द्या सदनीं निवारा ॥ १ ॥** ( सर्वजण जातात. )

---

## प्रवेश २ रा.

[ **स्थळः**—तुरुंगामधील विजेचा धक्का देऊन फांशी देण्याची खोली ( Electrocution room ). दोन अधिकारी चंदनला 'हिम्मत' समजून घेऊन येतात. ]

***१ ला***— चोराची सुटका आणि सावाला फटका असा जगाचा न्याय चालला आहे!

***२ रा***— व न्यायी म्हणून नांवाजलेला परमेश्वर हें सारं नाटक उघड्या डोळ्यांनीं पहात आहे !

**आरोपी—** मित्रांनो, सारी तयारी झाली ना ? मग आंवरा, लागा आपल्या कामाला; मला त्या खुर्चीवर बसवा, व विजेचा प्रवाह सोडून द्या; म्हणजे एका निमिषांत माझा जीव देह सोडून जाईल. मरायचं—विजेच्या धक्यानं मरायचं असं आतां ठरलं. न्यायदेवतेनं ठरविलं. मग उगीच दिरंगाई कां ?

***१ ला***— काय चमत्कारिक प्राणी आहे ? जगांतून जायची कोण ही विलक्षण घाई! मी अगदीं पहिल्यांदा पहातों आहें.

***२ रा***— तुकारामबुवा विमानांतून संदेह वैकुंठाला गेले असें म्हणतात. मींही ह्या काचेच्या खुर्चीवरून, कैकांना वर पाठविले असतील. पण ह्या आरोपीची तऱ्हा मला मुलखावेगळी दिसते ! मारायच्या वेळेला लोक कोण घाबरतात, कांहीं रडतात, कुणी देवाचं नांव घेतात—पण हा तर मरणाला कवटाळायला धांवतो आहे. असला कसला बुवा आरोपी !

**१ ला—** हा मुळीं आरोपीच नाहीं असंच माझं मन सांगतं.

**आरोपी—** फार शहाणं आहे तुझं मन ! न्यायदेवतेनं मला मरण्याची शिक्षा दिली तरी तूं मला ' आरोपी ' नाहीं म्हणून म्हणतोस ?

**२ रा—** न्यायदेवता आंधळी असते. चोर सुटून सावाला शिक्षा होते. काय असेल तें असो. मला या भल्या माणसाची दया येते.

**१ ला—** काय करावं ? याला द्यावं इथून सोडून असं वाटतं. पण-पण काय ? पोट जाळण्याकरतां ही मारेकऱ्याची नोकरी नशीबाला आली आहे त्याला काय करणार ?

**२ रा—** न्यायाधिशाला आरोपी सोडून द्यायचा अधिकार असून, तो कलमाच्या फटकाऱ्यानें फांशीची शिक्षा फर्मावतो; तर हुकुमाबरहुकूम आरोपींचा जीव घ्यायची संवय झालेल्या आम्हां मुरलेल्या मारेकऱ्यांना दयेचे पाझर फुटूं लागतात. विधिघटनेचा हा खोडसाळपणा असा अव्याहत चालायचा कीं काय ? का त्याला कांहीं उपाय सांपडणार आहे ?

**आरोपी—** बाबांनो, ' दया ' हा कांहीं मारेकऱ्यांचा धर्म नव्हे. बसवा मला त्या अखेर करणाऱ्या शुभासनावर; बटन दाबा, व या माझ्या देहांत कोंडलेल्या जीवराजाला अमर्याद अनंतांत विलीन होऊं द्या.

**१ ला—** ठीक आहे बाबा ! लोकांचा जीव घ्यायची आम्हीं नोकरीच पत्करली. आतां ना म्हणून जायचं कुठें ?

**२ रा—** वाटतं, स्वतःच बसावं त्या खुर्चीवर आणि म्हणावं ' राम ' ! बस झाली ही असली ओंगळ नोकरी. ए आरोपी, तूं हो दूर; मीच बसतों त्या खुर्चीवर. नगाला नग, जिवाला जीव दिला गेला म्हणजे झालं न्यायदेवतेचं समाधान !

**आरोपी—** मारेकऱ्याच्या स्वरूपांत वावरणाऱ्या महात्म्यांनो, तुम्हीं आपल्या त्यागबुद्धीनं व दयाशीलपणानं आपलं थोर हृदय व्यक्त केलंत. व्यक्तींचा दर्जा त्यांच्या नोकरीवर नाहीं, तर अंतरींच्या शीलावर अवलंबून आहे हें तुम्हीं मला दाखविलं. आवरा, आपलं कर्तव्य विसरूं नका. तो पहा सूर्यनारायण उगवला. त्याचे कोमल कर मला न्यायला पुढें सरसावले आहेत. त्यावर स्वार होऊन मी स्वर्गांत गेल्यावर, तुमच्या थोर अंतःकरणाचें चित्र मी माझ्या अंतरात्म्यावर ठसवून घेतलं आहे, तें परमेश्वराला नेऊन दाखवीन.

**१ ला—** बेस बाबा त्या खुर्चीवर. हे पहा डॉक्टर व जेलसुपरिन्टेन्डेट आले.- ( चंदनला नेऊन खुर्चीवर बसवतात व विजेची तार त्याच्या अंगाला चिकट-वितात. )

**२ रा—** हं, घे देवाचं नांव; मी बटन दाबतों. एक, दोन, तीन म्हटलें कीं संपलें !

**जेलर—** कोण हा उशीर ? आवरा लवकर.

**आरोपी—** पतितांच्या परमेश्वरा, सद्गति हीच जर वस्तुजाताची अखेर स्थिति तर माझ्या पतित बंधूनाही तीच गति मिळो अशी माझी अखेरची प्रार्थना आहे. ( डोळे मिटतो ) मित्रांनो, झाली अं माझी तयारी—श्रीहरी, श्रीहरी, श्रीहरी. [ पडद्यांत—" थांबा, थांबा, आरोपीस फांशी देऊं नका; ज्याच्या खुनाबद्दल हा जीव घेताहांत तो हा भैरव जिवंत आहे. म्हणून थांबा, हात आवरा. " ]

( सर्वजण आश्चर्यचकित होतात व जागच्या जागीं थबकतात. )

( गजरा, गौरी व भैरव प्रवेश करतात. )

**गजरा—** ( साश्चर्य ) बाबा, बाबा ! हे तर चंदनकाका !

**भैरव—** म्हणजे हिम्मत कुठें आहे इथें ?

**रमणगौरी—** भलत्यालाच फांशी देत होतांत कीं काय ?

**जेलर—** हा काय प्रकार ? आरोपी नव्हे, तर हा इसम कोण ?

( हिम्मत व दौलत येतात; चंदन व हिम्मत एकमेकांला कडकडून भेटतात. )

**हिम्तम—** जेलरसाहेब, हा पहा तुमचा आरोपी—

**जेलर—** काय तूं पळून गेला होतास ? तोंही एक गुन्हाच आहे.

**रमणगौरी—** पण भैरव जिवंत असतां, त्याचा खून झाला असं कायद्यानं धरून, कोणा का होईना निरपराधी माणसाला फांशी द्यायला तुम्ही सजलां होतां ना ? न्यायदेवतेकडून घडला म्हणजे तो ' गुन्हा ' नव्हे, असं तर कांहीं नाहीं ना होत ? ह्या खटल्यावरून तरी ह्यापुढें फांशीची शिक्षा काढून टाकणं किती जरूर आहे हें सिद्ध झालं. गुन्हेगाराला दुसऱ्याचा जीव घेतांना कदर वाटली नाहीं, तरी त्याचा जीव घ्यायला न्यायदानाच्या पद्धतींत स्थान रहातां उपयोगी नाहीं.

**गजरा**— ( हिम्मतचे पाय धरते ) बाबा, मी परत आलें—

**हिम्मत**— तूं पतित आहेस असं मी कसं म्हणूं ? ऊठ; बाळे, चंदनदेवांचा अवतार झाला. त्यांच्याजवळ असल्यावर कोण बरं पतित राहील ?

**भैरव**— खराखुरा पतित मी आहें ! चंदनदेवा, मला त्या खुर्चीवर बसवा व मरणाची शिक्षा करा अशी मी भीक मागतों. त्यांतच माझा उद्धार आहे. गजरादेवींचा मी धिःकार केला, घरीं चालत आलेली लक्ष्मी मी लाथाडून लावली, भोळ्या रामाच्या देवळाचं दार बंद करून, चंदनदेवासारख्या महात्म्याला अपवित्र लेखलं व देवदर्शनाला मुकविलं. आणखी काय केलं—काय करायचं ठेवलं ? हिम्मत, तुझ्या कुळाची कीर्ति मीं भ्रष्ट केली होती पण तिनेंच मला पुन्हा पुनीत केलें—**पतित पुण्यवंत होऊन तिनं माझा हा उद्धार केला**—म्हणून हा '**पतितोद्धार**' झाला. माझे डोळे उघडले—पण ते आतां कायमचे मिटले तरच बरं ! नाहीं तर त्याची पापी छाया या उगवत्या तेजोनारायणावर पडून तो देखील काळा ठिक्कर होऊन जाईल !

**गजरा**— पतिपदाला तुमच्या हातून नकळत लागलेला कलंक या पश्चात्तापानें धुवून गेला ! निर्गुण नियंत्याचा नाममहिमा गाणारी ही कालची पतित पण आजकालची पुनीत झालेली गजरा साऱ्यांच्याच पुढें पदर पसरून मागणें मागते आहे, कीं, कोणी कुणाला पतित समजूं नका. बाबा, चंदनकाका, भैरवांचा भोळा राम तुम्हाला बोलावतो आहे. पतितपावन राम हा **सर्वांचा सारखा व प्रत्येकाचा सखा** झालेला आज तुम्हांला दिसेल.

**भैरव**— हें मंगलमय दृश्य मोठ्या महाराष्ट्रांत यापुढें दिसो अशीच इच्छा मी यापुढें करीन. भोळ्या रामाचें देऊळ आतां तुम्हां सर्वांचें समजा.

**गजरा**— पतितोद्धाराशिवाय, आर्यांचा सनातनी धर्म पुरा होणार नाहीं व पुराण हिंदुधर्माच्या अभिनव स्वरूपांत, पतितोद्धार विरोधाशिवाय राही ! साऱ्या हिंदभूमीवर नवधर्माची द्वाही फिरवीत गजरा आपल्या राहिलेल्या आयुष्याचा मार्ग चालून जाणार आहे.



भैरवः— चंदन देवा, मला त्या खुर्चीवर बसवा अशी मी भीक मागतों. [ पृष्ठ ९४ ]

**सर्वजण**— आम्हीही पण त्याच वाटेनें येणार !

**गजरा**— हा नवधर्माचा जयजयकार, म्हणजेच ‘ **पतितोद्धार !** ’

भरत वाक्य

**अभिनव वर जन, राष्ट्रकाज ।**
**मधुर मधुर फल भरत होय तरूं**
**पतित पुनित करि, हरि राखि लाज ॥ ध्रु०**
**निज धामी रत घे अवतारा ।**
**वितरी सुगती सकल जना ॥**
**भुवन भाव मम करुनि सदा रत ।.**
**सुजन सुमनवर, सुख होइ आज ॥ १ ॥**

ॐ शांतिः शांतिः शांतिः

---

**समाप्त.**

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा,
वा. क्र. ... नों दि ...
दि ...

# शुद्धिपत्रक.

| अंक | प्र. | पान. | पद. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १ | १ | | १ | मान | माव. |
| ,, | ,, | ,, | ,, | ,, | कळा | कला. |
| ,, | ,, | ,, | ,, | ५ | प्रभु | ये प्रभु |
| अंक | प्र. | पान. | पद. | ओळ. | | |
| १ | २ | ६ | | १ | या मा | रे ना. |
| ,, | ,, | ८ | पद | ओळ | | |
| | | | | २ | शिवा | शिवा या |
| ,, | ,, | ,, | पद. | ओळ | | |
| | | | | ६ | फुलवी | खुलवी |
| , | ,, | ९ | पद | ओळ | | |
| | | | | ३ | परिसोनि | पर्णोनि |
| अंक | प्र. | पान | पद | ओळ | | |
| १ | ४ | १४ | | ३. | परि | पर |
| ,, | ,, | १६ | पद | ओळ | | |
| | | | | ४ | दानी | दीनां |
| अंक | प्र. | पान. | पद | ओळ | | |
| २ | २ | २९ | | १ | निदांध | निदाघ |
| ,, | ,, | ,, | पद | ओळ | | |
| | | | | ४ | बोला | वेला. |
| अंक | प्र. | पान. | पद | ओळ | | |
| ३ | ४ | ५८ | | ६ | आज | शब्द जास्त पडला. |